# माणूस

शनिवार । १ जुलै १९७२ । पन्नास पैसे




"अहो, ही नोट चांगली आहे काय जरा बघा म्हटलं तर युनियनचा आदेश नाही म्हणून काय सांगताय् ?......"

माणूस
शनिवार
१ जुलै १९७२
पन्नास पैसे

वर्ष : बारा
अंक : पाचवा

वार्षिक वर्गणी
पंचवीस रुपये

परदेशची वर्गणी
पासष्ट रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव
पुणे ३०.

दूरध्वनी : ५७३५९

# माणूस

## सप्रेम नमस्कार....

२२ जून १९७२

□ कालच 'अनुभव' बघितला आणि आज माणूसमधील श्री. देविदास बागूल यांचा 'अनुभव' वाचला. राष्ट्रपती पदकाने पुरस्कृत झालेला व सर्व लोकांकडून प्रशंसा होत असलेला चित्रपट आपणास आवडला नाही हे सांगण्याची हिंमत मला होत नव्हती. परंतु वरील लेखात माझ्याच विचाराचे पडसाद बघून बराच धीर आला. श्री. बागूलांनी अप्रिय विचार स्पष्टवक्तेपणाने मांडण्याचे धैर्य केलेले पाहून मलाही माझे विचार चार लोकात मांडण्याचे धैर्य आले आहे. त्या लेखाबद्दल धन्यवाद.

दत्तात्रय कुलकर्णी, मुंबई

२३ जून १९७२

□ २४ जूनचा अंक वाचला. सर्वच अंक वाचनीय आहे. अपवाद फक्त 'अनुभव'चे परीक्षण. फारच एकांगी आणि रुक्ष वाटले. त्याउलट 'लव्ह स्टोरी'च्या परीक्षणात लेखकाने अत्यंत तरल शब्दात कथेचा आशय प्रेक्षकांपर्यंत पोचवला आहे. असो. 'फिडेल'चे आणि क्रांती' दर लेखांकागणिक वाचकांच्या मनात दृढ स्थान मिळवित जातील यात शंका नाही. मध्यंतरी घोषित केलेली विजय तेंडुलकरांची नवीन लेखमाला केव्हा सुरू करणार ?

अरुण पाटील, पुणे

# मुंबई वार्ता

## चार अब्ज रुपयांची होळी ! अबब !

**प्रतिनिधी**

बँकांच्या बँकेत म्हणजे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियात सध्या बैठा संप चालू आहे. केंद्रिय अर्थखात्याचा सारा कारभार जरी दिल्लीत होत असला तरी देशाच्या चलनासंबंधीच्या साऱ्या आर्थिक घडामोडींचे केंद्रस्थान असलेल्या रिझर्व्ह बँकेची मुख्य कचेरी मुंबईत आहे. साहजिकच मुंबईतील संपाचे परिणाम साऱ्या देशभर होणार. मुंबईचाच विचार केला तरी सहज दिसणारी गोष्ट म्हणजे थंडावलेला आर्थिक व्यवहार. मुंबईतील बँकांत येणारे चेक्स यामुळे वटू शकत नाहीत. संपामुळे या न वटू शकणाऱ्या चेक्सची रक्कम १० कोटी रुपयांपेक्षा कितीतरी अधिक आहे. या साऱ्याचे परिणाम उद्योगधंदे, व्यापार एवढेच नव्हे तर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात ज्यांचे पगार होतात त्या सर्वांवर झाले आहेत. खुद्द रिझर्व्ह बँकेचा पगार २५ तारखेच्या सुमारास होतो. पण पे स्लिप्स तयार नसल्याने (संपाचा परिणाम म्हणून) त्यांचाही पगार होणार नाही. व्यापारी क्षेत्रातील सारी आर्थिक व्यवस्थाच कोलमडून पडली आहे.

बैठ्या संपाचे कारण काय ? नोटा कशा जाळाव्यात यासंबंधीचा वाद हेच त्याचे कारण. मग नेहमीप्रमाणेच बँकेचा संचालकवर्ग आणि नोकरवर्ग यांच्यातील वादासंबंधी मतभेद असणारच.

ऑल इंडिया रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया एम्प्लॉइज असोसिएशनने संपाचा आदेश दिला. खराब चलनी नोटा तपासणी केल्याशिवाय नष्ट करू नयेत, अशी त्यांची मागणी आहे. तर अधिकारी या मागणीविरुद्ध आहेत. हे या तंटयाचे मूळ कारण.

सध्याच्या नोटा नष्ट करण्याच्या पद्धतीमुळे अनेकांना काम मिळण्याची संधी वाया जाते. कर्मचाऱ्यांची बढतीची संधी हुकते. हे वादातील दुसरे महत्त्वाचे मुद्दे कर्मचारी संघटनेने मांडले आहेत. सध्याच्या पद्धतीमुळे नष्ट करावयाच्या नोटां-

बाबत अफरातफर व भ्रष्टाचार होण्यास भरपूर वाव आहे, असेही संघटनेचे म्हणणे. नोटा नष्ट करणारा त्यातील काही नोटा यामुळे पुन्हा चलनात पाठवू शकतो. नष्ट करावयाच्या नोटांबाबत भ्रष्टाचाराला कशी जागा राहू शकते, याचे एक उदाहरण कर्मचारी संघटनेच्या मुंबई शाखेचे चिटणीस श्री. चोकशी यांनी दिले. महाराष्ट्रातील एका बँकेने नष्ट करण्यासाठी काही नोटा पाठविल्या. पण त्या पाठविताना कमी पाठविल्या होत्या. त्यात अफरातफर झाली होती. या अफरातफरीत ५० हजार नोटा कमी होत्या. फक्त खराब नोटाच नष्ट केल्या जातात हे खरे नाही, असेही असोसिएशनचे म्हणणे. नोटा नष्ट करण्यापूर्वी त्यांची चाचणी होते. त्यात ९५ टक्के नोटा चांगल्या आढळतात, असेही चिटणीसमहाशयांचे म्हणणे. बरं, नोटा नष्ट करणे आणि नव्या छापणे यात अधिक खर्चिक काय? बँक अधिकाऱ्यांचे म्हणणे पुढे पाहूच. असोसिएशनच्या म्हणण्याप्रमाणे नव्या नोटा छापण्याची किंमत अधिक द्यावी लागत असली तरी त्या नष्ट करण्यासाठी लागणारी किंमतही खूपच असते. मुंबईत निरनिराळ्या केंद्रातून नष्ट करण्यासाठी तीस लक्ष नोटा एका दिवसात येत असतात. रिझर्व्ह बँक दरवर्षी ४ अब्ज नोटांची होळी करते. त्या पुन्हा छापण्यासाठी ६४ हजार रुपये खर्च करते पण त्यापेक्षा अधिक खर्च त्या नष्ट करण्यासाठी येतो. ही झाली असोसिएशनची भूमिका.

## अधिकाऱ्यांची बाजू

बँक अधिकाऱ्यांचे म्हणणे अगदी वेगळे आहे. बँक अधिकारी म्हणतात, की सध्या अस्तित्वात असलेल्या नोटा नष्ट करण्याची पद्धती नवी नाही. ती १९६४ सालापासून अस्तित्वात आहे. यामागची भूमिका जुन्या मळलेल्या नोटा आवश्यक त्या प्रमाणात चलनातून काढून घेऊन त्याऐवजी नव्या नोटा चलनात समाविष्ट करणे ही आहे. ३७ सालापासून ही पद्धती जवळ जवळ अशीच चालू आहे. दर वर्षी चलनी नोटांचे वितरणातील प्रमाण वाढते आहे. (या संदर्भात जरा मागचा आढावा घेणे मनोरंजक ठरेल. सुमारे ७० वर्षांपूर्वी रिझर्व्ह बँकेने आर्थिक व्यवहाराची सूत्रे हाती घेतली, तेव्हा वितरणात फक्त १८३ कोटी रुपये होते. सध्या ही रक्कम ५ हजार कोटी रुपये एवढी आहे.) तेव्हा मूळ व्यवस्थेत योग्य ते बदल केल्याशिवाय जुन्या, मळक्या, फाटक्या वगैरे नोटा नष्ट करण्याचा हा प्रचंड व्याप करणे शक्य नाही. यासाठी टक्केवारी पद्धती तत्त्वावर तपासणी केली जाते. यात गैरव्यवहाराला बिलकूल वाव नाही. शिवाय त्या नोटांची त्वरित विल्हेवाट लावणे शक्य होते ते वेगळेच.

या तपासणीसाठी ४ हजारांहून अधिक व्यक्तींची बँकेने नेमणूक केली आहे आणि वाढत्या कामाचा विचार करून तपासनिसांच्या नेमणुकांची व्यवस्था आहे.

पूर्वीचा एक काळ असा होता की त्यावेळी धकाधकीचा मामला नव्हता. कामाचा व्यापही कमी होता. नष्ट करण्यासाठी आलेल्या प्रत्येक नोटेची दोन वेळा तपासणी

करणे सहज शक्य होते. आजच्या पालटलेल्या जमान्यात हे केवळ अशक्यच आहे.

कर्मचारी संघटनेचे म्हणणे आहे की या पद्धतीत बदल करण्याच्या योजनेमुळे त्यांचा एक 'ओव्हर टाईम' बुडतो. या गोष्टीला त्यांचा कडाडून विरोध आहे. शिवाय अनेक वाईट नोटांबरोबर काही चांगल्या नोटा नष्ट होतात त्याचे काय? हाही त्यांचा प्रश्न आहेच.

अधिकारी म्हणतात त्यात काय झाले? एक नोट छापायला फक्त दोन ते चारच पैसे खर्च येतो. उलट दोनदा तपासणी करण्याचा खर्च अधिक आहे.

दुसरे म्हणजे बँक नेहमीच सुरक्षिततेच्या प्रश्नाचा विचार प्रथम करते. तपासणीत वितरण योग्य नोटा किती मिळतात यांची बँकेची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे. १९७१ साली नष्ट करायला आलेल्या ९५,५७,००,००० नोटांमधून फक्त ०·५ टक्के नोटाच तपासणी कर्मचाऱ्यांना पुन्हा वितरण करण्यायोग्य वाटल्या. याचा अर्थ ९९·५ टक्के नोटा या नष्ट करण्यालायक होत्या असा होतो.

ही सारी या प्रश्नातील गुंतागुंत आहे. अजूनही प्रश्न मार्गी लागलेला नाही. केंद्रिय मजूरमंत्री श्री. रघुनाथराव खाडिलकर संपात मध्यस्थी करण्यासाठी मुंबईत येत आहेत अशी बातमी आहे. त्याआधी विभागीय मजूर आयुक्तांनी संप मिटण्यासाठी केलेले सारे प्रयत्न फसले. या प्रकरणी चौकशीसाठी एका मंडळाची स्थापना केंद्र सरकारने करावी अशीही एक मागणी पुढे आली आहे. कालांतराने योग्य तडजोड होऊन संप मिटेल. नोटा तपासण्याच्या पद्धतीत कदाचित बदल होईलही. आपण फक्त एवढेच म्हणू या. बापरे! रिझर्व्ह बँक ४ अब्जांपेक्षा अधिक (जुन्या) नोटांची दरवर्षी होळी करते? कमालच आहे. ☐

## शानदार समारंभ

'मुंबई मराठी पत्रकार' संघाचा एकोणीसावा वर्धापन दिन काल शानदारपणे साजरा झाला. महनिय प्रवक्ते होते, पुण्याचे सुप्रसिद्ध पत्रकार श्री. वि. स. माडीवाले.

श्री. माडीवाले यांचे भाषण म्हणजे मिस्किलपणा आणि खुसखुशीतपणा यांची मेजवानी. जुन्या काळातील वृत्तपत्र व्यवसाय कसा होता, पत्रकाराची त्यावेळी काय अवस्था होती, त्याच्या अडीअडचणी, सारे काही त्यांनी खुमासदारपणे सांगितले. त्यांच्या काळातील वार्ताहर कसा होता?

—'त्याकाळी पुण्यातील वर्तमानपत्रात एकुलता एक वार्ताहर असे. फरासखान्यात जाऊन पोलिसवार्ता त्याने आणायच्या. संध्याकाळी शनिवारवाड्यापुढील राजकीय नेत्यांच्या भाषणाचा वृत्तांत त्यानेच द्यायचा. काँग्रेस भवनात जाऊन, काका गाडगीळ, जेधे, मोरे यांच्याबरोबर खमंग भेळ खात खात खमंग वार्ताही मिळवा-

यच्या. गांधीजी पर्णकुटीवर आले तर सायकलसारखे वाहन भाड्याने घेऊन त्या राजकीय वार्ताही आणायच्या आणि पुन्हा दुसरे दिवशी सकाळी अमुक एक वार्ता का चुकली म्हणून संपादकाच्या माऱ्याला निगरगट्टासारखे तोंड द्यायचे. वार्ताहराचे त्या काळातील आयुष्य डोंबाऱ्यासारखे होते. दोरावर त्यानेच चढायचे. तोल न जाता दोरीवरून चालत जायचे. बापाशी कुस्ती खळतो का ? बापाला पाडतो का ? हे प्रश्न आपणच विचारायचे. ढोलकी आपणच बडवायची व शेवटी थाळीही आपणच फिरवायची. 'जो देगा उसका भी भला. जो न देगा उसका भी भला' असे म्हणून पुढील चौकातील खेळाची तयारी करायची. पगार जर वेळेवर मिळाला तर त्या महिन्यातील ती मोठी बातमी. दोन-तीन महिने पगार मिळाला नाही की व्यवस्थापकाच्या खोलीत भीत भीत जाऊन पगाराबद्दल विचारले तर व्यवस्थापक म्हणायचे, माडीवाले तुझी निकडीची अडचण काय आहे ? तेव्हा हळू आवाजात 'घरात पातळं घ्यावयाची आहेत' असे केविलवाणा चेहरा करून सांगितले की व्यवस्थापक कापड व्यापाऱ्याला चिठ्ठी द्यायचे व आलेल्या इसमास दोन पातळे द्यावीत म्हणून माझी बोळवण करायचे. त्या चिठ्ठीवर दोन पातळे मिळायची व मी लूट करून आलेल्या सरदारासारखा घरी खुशीत जायचो. ती माऊली भाबडेपणे म्हणायची, पैसे नव्हते तर एकदम दोन पातळे कशाला आणलीत. परंतु थोड्याच दिवसात ती पातळे विटून जायची. या मामल्यात वृत्तपत्राच्या जाहिरातीचे पैसे वसूल होत. दुकानदाराची दोन विटकी पातळे संपत आणि वार्ताहर मात्र पुढील विवंचनेच्या विचारासाठी सज्ज होई.'

श्री. माडीवाले यांनी मिश्किल शब्दात त्या काळच्या वार्ताहराची अडी-अडचणीने भरलेली अशी ही कहाणी सांगितली.

याचवेळी संघातर्फे जेष्ठ पत्रकार प्रा . न. र. फाटक, धुळ्याचे श्री. सुधाकर मदाने, 'नवाकाळचे'चे संपादक श्री. निळकंठ खाडिलकर आणि श्री दत्ताराम बारस्कर यांचा सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना श्री. मदाने म्हणाले, 'धुळयाचे कलेक्टर श्री. देशमुख यांनी माझ्यावर भरलेल्या खटल्यांना १२ वर्षे सतत तोंड देऊन मी विजयी झालो याचे श्रेय मराठी पत्रकारांच्या लढाऊ बाण्याला द्यावे लागेल.'

प्रा. फाटक यांनी पत्रकाराने मजकूर देण्यापूर्वी त्याची अचूकता पडताळून पहाण्यावर आपल्या भाषणात भर दिला. वर्धापनदिनाचा एकूण कार्यक्रम चांगल्या रितीने पार पडला.

□ □ □

# मुक्काम पुणे

## खरी कसोटी शिक्षकांची....

**शरद कृष्णन**

नेहमीप्रमाणेच शाळा जून महिन्यात सुरू झाल्या. शाळकरी मुलांमध्ये उत्साह नेहमीचा असला तरी आठवीतील विद्यार्थी-विद्यार्थिनींवर गणित व सायन्सच्या अभ्यासक्रमाचे दडपण असल्याचे जरूर जाणवले. मधुकरराव चौधरी शिक्षण खात्याचे प्रमुख असताना अभ्यासक्रम बदलण्याचा हा धाडसी निर्णय घेण्यात आला. झालेल्या उलटसुलट टीकेला जराही भीक न घालता सरकारही घेतल्या निर्णयाला चिकटून राहिले. असे क्वचितच घडते पण ते या वेळी घडले आणि नवीन अभ्यासक्रम अमलात आला. अभ्यासक्रमामध्ये करण्यात आलेल्या बदलाचे स्वरूप तिहेरी आहे असे मत येथील नू. म. वि. हायस्कूलमधील गणिताचे शिक्षक श्री. वाय. जी. काळे यांनी बोलून दाखवले. यासंबंधी स्पष्टीकरण करताना ते म्हणाले, की निरनिराळ्या विषयामध्ये जी पुनरुक्ती होत असे ती टाळून अभ्यासक्रम अधिक आटोक्यात करण्यात आला आहे. यंदा आठवीमध्ये असलेली मुले दहावीमध्ये आल्यावर एस. एस. सी ला बसतील. म्हणजेच जुन्या अभ्यासक्रमाप्रमाणे बसणाऱ्या मुलांपेक्षा शालेय शिक्षणाचे त्यांचे एक वर्ष कमी होईल.

गणित व शास्त्र या विषयांमध्ये मूलभूत स्वरूपाचे फेरबदल करण्यात आले आहेत. आठवीमध्येच शास्त्राची फिजिक्स, केमिस्ट्री, बॉयॉलॉजी अशी सुस्पष्ट फोड करण्यात आली आहे. तर गणिताचा संपूर्ण नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

गणिताच्या बदलत्या अभ्यासक्रमासंबंधी जी ओरड होते त्यात कितपत तथ्य आहे, या प्रश्नाला उत्तर देताना श्री. काळे म्हणाले, हे बदल होणे अपरिहार्य होते. जुन्या पद्धतीचे गणित चालू ठेवून आपण आपल्या विद्यार्थ्यांचे नुकसानच करत होतो. गणित हे सतत प्रगत होणारे शास्त्र असल्याने त्यातील बदलत्या स्वरूपाप्रमाणे ते विद्यार्थ्यांसमोर ठेवणे आवश्यक आहे. आज ना उद्या अभ्यासक्रमातील

हा बदल होणे अपरिहार्य होते. मग जे उद्या करायचे ते आज का नको, याला काही उत्तर नाही. आणि एकदा बदल स्वीकारायचे म्हटले, म्हणजे त्याविरुद्ध ओरड करण्यात काहीही अर्थ नाही.

श्री. वाय. जी. काळे हे तरुण उत्साही शिक्षक असून गेल्या दोन वर्षांपासून नू. म. वि. सारख्या प्रथम श्रेणीच्या शाळेमध्ये गणित शिकवत आहेत. नवीन अभ्यासक्रमाबाबत विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन काय आहे, असे विचारले असता ते म्हणाले, की विद्यार्थी अतिशय जागरूक असून नवीन अभ्यासक्रमाला आत्मविश्वासाने सामोरा जात आहे. कित्येक वेळा शिक्षकाला अपेक्षित नसतील अशा शंकाही विद्यार्थी विचारतात आणि शिक्षक अधिक बुचकळ्यात पडतो.

नू. म. वि. ही प्रथम श्रेणीची शाळा. त्यात तुम्ही इंग्रजी माध्यम घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिकवता, म्हणजे महाराष्ट्रातील सर्वोत्तम विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थी तुमच्यासमोर आहेत, असे म्हणावे लागेल. कोणताही बदल पचवण्यांचे सामर्थ्य या विद्यार्थ्यांमध्ये असते. परंतु तिसऱ्या श्रेणीत उत्तीर्ण होणारा ज्याला आपण सामान्य वकुबाचा विद्यार्थी म्हणतो, अशा विद्यार्थ्याला हा बदल पचवणे शक्य आहे का ?

श्री. काळे म्हणाले, "नू. म. वि. मध्ये येण्यापूर्वी सुट्टीच्या काळात मी एका खाजगी वर्गामध्ये शिकवत होतो. तिथे सर्व प्रकारचे विद्यार्थी माझ्यासमोर होते. बहुसंख्य विद्यार्थ्यांना नवे गणित समजत होते. आलेल्या अडचणी ते सुस्पष्टपणे विचारत होते."

नवे गणित व जुने गणित यामध्ये निश्चित फरक काय ? हा प्रश्न मी या संदर्भात ज्या मंडळींना भेटलो त्या सर्वांना, म्हणजे श्री. काळे यांच्या खेरीज श्री. नाना आगाशे (खाजगी वर्गाचे नामवंत संचालक) श्री. डी. जी. केळकर (शिक्षक, आदर्श विद्यालय) श्री. रामभाऊ अभ्यंकर (अभ्यंकर क्लासचे संचालक) यांना विचारला. त्यांनी दिलेल्या उत्तराचा गोषवारा असा : नवीन् गणिताला तर्कशास्त्रीय बैठक आहे. केवळ आंधळेपणाने गृहीत तत्त्वे धरलेली नाहीत. जितक्या तांत्रिक पद्धतीने जुन्या गणितामध्ये गुण मिळवणे शक्य होते, तितक्या आंधळेपणाने नवीन गणितामध्ये गुण मिळवता येणार नाहीत. नवीन गणित जास्त जनरलाइज्ड केलेलं आहे.

## सेमिस्टर पद्धत

विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रम पचवणे सोपे जावे म्हणून नू. म. वि. मध्ये सेमिस्टर पद्धत प्रयोगादाखल चालू केल्याचे श्री. काळे यांनी सांगितले. या पद्धतीप्रमाणे पहिल्या सहामाहीत भूमितीचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यात येईल. दुसऱ्या सहामाहीत अर्थातच हा विषय पूर्णपणे संपलेला असेल. बीजगणित ३०, भूमिती ३०

व अंकगणित २०, अशी गुणांची फोड राहील. त्याखरीज विद्यार्थ्यांच्या वर्षभरातील कामगिरीला २० गुण राहतील.

आदर्श विद्यालयामध्ये येणारा विद्यार्थी हा प्रामुख्याने श्रमजिवी वर्गातला. या शाळेतील गणिताचे शिक्षक श्री. डी. जी. केळकर म्हणाले : " मुलांच्या दृष्टीने अभ्यासक्रम जड नाही. खरी कसोटी शिक्षकांची आहे. प्रत्येक शिक्षकासमोर येणारा विद्यार्थीवर्ग वेगळ्या कुवतीचा असल्याने समोरचा विद्यार्थी पाहून शिक्षकाला आपली शिकवण्याची पद्धत ठरवावी लागेल. स्वतः श्री केळकर आतापासूनच जादा तास घेण्याच्या मनःस्थितीत आहेत. श्री. केळकर आणि अभ्यंकर क्लासचे श्री. रामभाऊ अभ्यंकर यांच्या बोलण्यात एक मुद्दा समान आला. बदललेल्या गणिताला उत्तम मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. पुण्या-मुंबईसारख्या शहरात शाळेतील मार्गदर्शन अपुरे वाटले, तर खाजगी वर्गाचा आधार मिळतो. खरा प्रश्न ग्रामीण भागात निर्माण होणार आहे. नवीन गणितासंबंधी तेथील शिक्षकच इतका अनभिज्ञ आहे, की तो विद्यार्थ्यांना काय समजावून सांगणार हा प्रश्नच आहे. ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांची गंभीर कुचंबणा होणार आहे. या संदर्भात बोलताना श्री. केळकर म्हणाले, की नवीन गणिताचे, ते शिकवण्याच्या पद्धतीचे शिक्षकांना मार्गदर्शन व्हावे म्हणून शासनामार्फत शिक्षकांसाठी मार्गदर्शक शिबिरे घेण्यात आली. त्यात हजेरी लावलेले २०० शिक्षक होते. त्यातील पदवी परीक्षेला गणित असलेले केवळ ४५ शिक्षक होते. म्हणजेच ज्यांना स्वतःलाच गणिताचा आधार नाही असे १५५ शिक्षक आपापल्या शाळेत जाऊन गणित शिकवणार. शिक्षक कमी पडला तरी त्याची कसर भरून काढणे शहरातील विद्यार्थ्यांना शक्य आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्याला हा पर्याय फारसा उपलब्ध नाही आणि एखाद्या ठिकाणी उपलब्ध असला तरी पालकांच्या आर्थिक कुवतीच्या मर्यादा त्याला पडणारच आहेत."

नवीन गणित पचवण्यासाठी शिक्षकाला पहिली दोन वर्षे तरी दररोज किमान दोन तास तयारी करणे आवश्य आहे, असे श्री. केळकर यांचे मत आहे. शिक्षक कमी पडला तर हजारो विद्यार्थ्यांचे कायमचे नुकसान होण्याची शक्यता नजरेआड करून चालणार नाही.

नवीन गणिताच्या उपलब्ध पुस्तकासंबंधीही फारसे समाधान आढळले नाही. श्री. काळे म्हणाले, " विद्याप्रकाशनाचे श्री. बापट यांचे पुस्तक पुष्कळ समाधानकारक आहे. श्री. चं. रा. जोशी यांचे पुस्तकही चांगले आहे. चांगली आणि भरपूर पुस्तके उपलब्ध झाली तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा आणि शिक्षकांचाही ताण कमी होईल. कारण उत्तम पुस्तके हाच त्यांचा खरा आधार राहणार आहे."

नाना क्लासचे संचालक श्री. नाना आगाशे– त्यांना भेटायला गेलो

असताना स्वत:च नवीन गणिताचे पुस्तक घेऊन बसले होते. नवीन गणित हे अतिशय सोपे व तर्कशुद्ध केल्याचे सांगून या गणितासाठी, या विषयाचा पूर्ण अभ्यास असलेल्या शिक्षकांची नितांत गरज आहे हे त्यांचे मत. जन्मभर धोतर वापरलेल्या माणसाला एकदम पँट वापरायला सांगितली तर तो कुरकुर करणारच. नवीन शिकून ते शिकवण्याची तयारी नसलेला शिक्षकच नवीन गणिताविरुद्ध ओरडतो. नवीन गणित शिकवणे ज्यांना शक्य नाही अशा मंडळींना उचलून बाजूला काढले पाहिजे. स्वत: नाना आगाशे त्यांच्या वर्गामध्ये नवीन गणित शिकवत नाहीत. ही जबाबदारी त्यांच्या मुलाने उचलली आहे. नाना म्हणतात—आठवीतील विद्यार्थी एस. एस. सी.ला येण्यास अजून दोन वर्षे अवधी आहे. तयारी करून मी नवीन गणित उत्तम प्रकारे शिकवू शकेन असा आत्मविश्वास निर्माण झाला तरच मी या फंदात पडेन. अथवा निवृत्ती स्वीकारीन.

## दोन वर्षांनी गंभीर प्रश्न

अभ्यंकर क्लासचे श्री. रामभाऊ अभ्यंकर म्हणाले 'आज नववी मध्ये असलेला विद्यार्थी आणि आठवीमध्ये असलेला विद्यार्थी एकाच वेळी शालान्त परीक्षा उतीर्ण होतील. म्हणजे एकाच वर्षी दुप्पट विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाची सोय करावी लागेल आणि जुना आणि नवीन असे दोन्ही अभ्यासक्रम महाविद्यालयीन पातळीवर चालवावे लागतील. अकरावी शाळेमध्ये न आणल्यास महाविद्यालयावर चांगलाच ताण पडून गंभीर प्रश्न निर्माण होतील.

अभ्यंकर क्लासेस हे प्रामुख्याने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आहेत. यावर्षी अभ्यासक्रम बदलल्याने त्यांनी प्रथमच क्लासेस सुरू केले. आणि त्यांना उत्तम प्रतिसाद मिळाला यावरून विद्यार्थी वर्गावर नवीन अभ्यासक्रमाचे दडपण असल्याचे स्पष्ट होते.

## विद्यार्थ्यांशी बातचीत

नवीन अभ्यासक्रमाबाबत तीन-चार विद्यार्थ्यांशीही बातचीत केली. बदललेल्या अभ्यासक्रमासंबंधी बाहेर जितका बाऊ केला जातो, तितके विद्यार्थी बिचकलेले नाहीत. बाहेरील मार्गदर्शन ते घेत असले तरी त्यांच्यामध्ये आत्मविश्वास जरूर आहे. किशोर शंकर भट हा भावेस्कूलमधील विद्यार्थी—त्याला सातवीपेक्षा आठवीतील बदललेले गणित जास्त रुचते. नवीन अभ्यासक्रम त्याला सोपा वाटतो. वडिलांच्या सल्ल्याप्रमाणे तो खाजगी वर्गाला जातो. सुशिल शंकर सावंत—हा सातवीमध्ये ६५ गुण मिळवून उत्तीर्ण झाला आहे. शाळेत उत्तम मार्गदर्शन असल्याचे तो मान्य करतो. परंतु अभ्यासक्रम बदलला असल्याने आपल्याला तो उत्तम प्रकारे समजावा, कोणताही भाग कच्चा राहू नये म्हणून तो खाजगी वर्गाला जातो. मंजिरी रत्नपारखी—डेक्कन भावेस्कूलमधील विद्यार्थिनी सातवीची परीक्षा उत्तम प्रकारे उत्तीर्ण झाली आहे. गणितामध्ये अधिक प्रगती व्हावी म्हणून ती खाजगी वर्गाला जाते.

कांचन गजानन म्हाळवदे-सेवासदनच्या शाळेत जाणारी विद्यार्थिनी. गणित आधीच कच्चे. त्यात बदलेला अभ्यासक्रम त्यामुळे तिच्यावर दडपण आहे. त्यातून गणित सक्तीचे झालेले, कोणत्याही परिस्थितीत ते शिकलेच पाहिजे अशा भावनेने ही ही मुलगी वर्गाला येते. आता गंमत अशी, की सर्व विद्यार्थ्यांना शाळेतील मार्गदर्शन उत्तम वाटते आणि तरीही वर्गाची गरज भासतेच.

नवीन गणिताला विद्यार्थी उत्साहाने सामोरा जात आहे. जागरूक राहून शिकून घेण्याची त्यांची तयारी दिसते. स्वाभाविकपणेच त्यांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी शिक्षकांवर पडते. शिक्षक या कसोटीला कितपत उतरतात ते येत्या वर्षा-दोन वर्षांत स्पष्ट होईल. ◘

## पदवीधर मतदार संघ–निवडणूक निकाल

या मतदार संघामध्ये झालेल्या निवडणुकीचे निकाल तसे अपेक्षेप्रमाणेच लागले. जनसंघाचे दोन उमेदवार उभे असल्याने ग. प्र. प्रधानांना पहिल्या क्रमांकाची जास्त मते मिळाली. प्रधानही पहिल्या फेरीत आवश्यक मतांचा कोटा पूर्ण करू शकले नाहीत. विजयी होण्यासाठी आवश्यक असलेली मतसंख्या चौथ्या फेरीत त्यांनी पूर्ण केली. प्रधानांच्या जोडीला अपेक्षेप्रमाणेच उत्तमराव विजयी झाले.

जनसंघाने या वेळी प्रथमच दोन उमेदवार उभे केले. त्यांचा दुसरा उमेदवार सौ. मालतीबाई परांजपे पराभूत उमेदवारांमध्ये अग्रेसर होत्या. त्यांनी पहिल्या क्रमांकाची ३,७४२ मते मिळवली. पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाची मिळून त्यांची मतसंख्या ४,४८६ झाली. जनसंघाचा एक उमेदवार येणार हे सुस्पष्ट होते. त्यांनी केवळ उत्तमरावांची उमेदवारी लढवली असती तर पहिल्या फेरीतच उत्तमराव आवश्यक कोटा सहज पूर्ण करून विजयी झाले असते. जनसंघाचा पराभूत उमेदवार तिसऱ्या क्रमांकावर असल्याने दोन जागा लढवण्याचा जनसंघाचा निर्णय अयोग्य होता असे म्हणता येणार नाही. या मतदार संघामध्ये जनसंघाला भरपूर पाठिंबा असल्याचे सुस्पष्ट झाले. 'जर–तर'च्या भाषेत समाधान मानायचे असेल, तर प्रधानांची उमेदवारी नसती तर जनसंघ दोन्ही जागा जिंकण्याची शक्यता भरपूर वाढली असती.

प्रा. प्रधान यांचा विजय हा प्रामुख्याने त्यांचा व्यक्तीगत विजय आहे. शैक्षणिक व वृत्तपत्रीय क्षेत्रातून मिळालेला प्रचंड पाठिंबा, विधान परिषदेमध्ये त्यांनी बजावलेली मजबूत कामगिरी ही त्यांच्या विजयाची प्रमुख कारणे आहेत. मतदारांनी ते संसोपा आहेत. का समाजवादी आहेत हे फारसे तपशीलामध्ये जाऊन पाहिलेले नाही. ते अपक्ष म्हणून उभे राहते तरी निकालात फारसा फरक पडला नसता.

पृष्ठ १४ वर


# अय्ययो मद्रास्स

## ना तुला, ना मला, घाल कुत्र्याला !

नलिनी अंबाडे

१९४३ ची गोष्ट ! सुप्रसिद्ध अमेरिकन लेखक मि. लूईस फिशर (L. FISCHER) हे अध्यक्ष रुझवेल्ट यांचे प्रतिनिधी म्हणून भारताचा दौरा करीत होते. मद्रासला ते चक्रवर्ती राजगोपालाचारी यांस भेटण्यास गेले. राजगोपालाचारींनी नुकताच मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिलेला होता. भल्या सकाळी फिशर महाशय चक्रवर्तींच्या घरी पोहोचले, तो हा साठीचा म्हातारा परसातल्या विहिरीवर स्वतः पाणी शेंदून, भराभर बादल्या डोक्यावर ओतून घेत होता. स्नानानंतर पंचा न् धोतर स्वतःच पिळून वाळत घातलेले पाहून फिशर महाशय थक्कच झाले. नंतर झालेल्या बोलण्यात, चक्रवर्तींचे अचूक अंदाज अन् सफाईदार वक्तृत्व पाहून ते तर अवाक्च झाले. अमेरिकेत परतल्यावर त्यांनी महात्मा गांधींवर पुस्तक लिहिले. त्यात ही आठवण सांगताना ते म्हणतात, 'कुशाग्र बुद्धीमत्ता, राजकारणाचे अचूक अंदाज असणारी, धूर्त अशी आज एकच व्यक्ती भारतात आहे व ती म्हणजे चक्रवर्ती राजगोपालाचारी' अर्थात बाकीची नेहरू, गांधी मंडळी तेव्हा तुरुंगात होती म्हणा ! ते काहीही असो. आमच्या राजगोपालाचारींना फिशर महाशयांचे एवढे शिफारसपत्र पुरेसे आहे.

असे हे राजगोपालाचारी, आज ९३ वा वाढदिवस साजरे करूनही काय गप्प बसलेत म्हणता ? भारतीय संघराज्यास तुम्ही आम्ही काँग्रेसचे राज्य म्हणतो, कुणी लोकांचे राज्य म्हणतात, कुणी खादी टोपीचे राज्य म्हणतात. राजगोपालाचारी म्हणतात, 'हे परमिटांचे राज्य आहे. जिथे तिथे परमिट. उठायला परमिट. बसायला परमिट. अरे, जितकी परमिटे जास्त तितकी लाचलुचपत जास्त. कारभार सुधारायचा असेल तर परमिटे कमी करा. आपोआप भ्रष्टाचार कमी होईल'


मुलायम
नि नरम,
पण अतिशय
टिकाऊ
स्वस्तिक
एअर-ओ-फिल
चप्पल
तुमच्या
पाउलांची
शोभा वाढविते!
तुम्हाला चालताना मुळीच अडखळल्यासारखे वाटू नये, अवघडायला होऊ नये, उलट अगदी आराम वाटावा म्हणून खास कुशलतेने तयार केलेली स्वस्तिकची नवीन एअर-ओ-फिल रबर चप्पल तुमच्या पाउलांना कशी मऊमऊ वाटते नि सुखविते. तिची किंमतही किती माफक-सर्वांना परवडेल अशीच कुटुंबातील सर्वांची आवडती चप्पल!
पुढील साइझेसमध्ये मिळते.
पुरुषांसाठी: ७/१०,
स्त्रियांसाठी: ३/६,
मुलासाठी: १/२,
स्वस्तिक
स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लिमिटेड, चिंचवड, पुणे-१९.

अर्थात ९४ वर्षांचा हा तेजस्वी म्हातारा, कुणीही मंत्री नाही ना सत्तारुढ पक्षाचा नेता नाही. त्याच्या वक्तव्याला विचारतो कोण ? पण तरीही आम्ही सामान्यजन ते विचार वाचतो, कौतुकाने डोळे विस्फारतो अन् सोईस्करपणे विसरून जातो. पण असा काही प्रसग घडला की, त्यांच्या शब्दांची पुन्हा तीव्रतेने आठवण होते.

मद्रास दिल्ली मार्गावरील नेलोर हे जिल्ह्याचे ठिकाण. मद्रास नंतरचे मेल-एक्स्प्रेसचे दुसरे स्टेशन. असेल जेमतेम शे सव्वाशे मैलांवर, पण नकाशांत मात्र आहे आंध्र प्रदेशात. नेलोरचा तांदूळ दक्षिणेत सुविख्यात. तुमच्या महाराष्ट्रात आंबेमोहोर, चंपाकळी, वसुमती म्हणतात ना ? त्याचप्रमाणे इकडे नेलोर तांदळास भाव आहे. हा सुरेख भात खाण्याची सवय मद्रास, म्हैसूर, केरळ ह्या शेजाऱ्यास नसली तरच नवल ! पण मागेच सरकारी धोरणान्वये प्रांतबंदी झालेली आहे. एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतात, मग शंभर मैलावर का असेना, धान्याची 'निर्यात' गुन्हा ठरू लागली. अर्थात व्यापार थांबला नाहीच ! दिवसाऐवजी रात्री अन् 'मूठ दाबून' तो चालूच राहिला. पोलिसांना नवे काम मिळाले. सायकलचे कॅरीयरला पाच किलोचे गाठोडे दिसले की नाक्यावरच्या खास चौकीवाल्यांनी धरलेच म्हणावे. तेवढ्यात एखादी लॉरी न थांबता निघूनही जाई ! अर्थात तो ड्रायव्हर एक 'कसलीतरी पुडी' फेकत असे म्हणा !

.. आणि नेलोर जवळच्या 'बिट्रुगुंटा' स्टेशनवर पोलिसांनी एक पुरी माल-गाडी अडविली. पाहातात तो नेलोर तांदूळ भरलेली जणू 'राईस स्पेशल' गाडी होती अन् बुकिंग होते केरळाचे ! म्हणजे आंध्रचा तांदूळ केरळला ! भलतंच ! भराभर वायरलेसवरून कट्टकडकट्ट् झाले अन् गाडीचे इंजीन काढून घेण्यात येऊन अख्ख्या गाडीचा पंचनामा झाला. बिट्रुगुंटा स्टेशनवर तो सारा तांदूळ 'राईस मुव्हमेंट कंट्रोल ऑर्डर' कायद्याचा भंग झाला म्हणून जप्त झाला. किती ठाऊक आहे ? २४००० पोती ! म्हणजे आजच्या बाजारभावाने अठ्ठावन्न लाख रुपयांचा ! बिट्रुगुंटाची गुदामे भरली, तेव्हा तो शेजारच्या कोडावलूर गावी पाठविण्यात आला. वॅगन्स रिकाम्या झाल्या अन् ही सारी हमाली त्या त्या व्यापाऱ्याचे नावे घालण्यात आली. बिचारे व्यापारी ! सगळे मिळून एकत्र येऊन अख्खी गाडी बुक केली अन् हे मध्येंच संकट उभे राहिले !

व्हिजिलन्स खाते अन् रेव्हयून्यू खाते दोघांची खलबते झाली अन् डिस्ट्रिक्ट रेव्हयून्यू ऑफीसरने निर्णय दिला "फक्त ३०% माल परत मिळेल व ७०% माल जप्त केला आहे असे समजण्यात येईल !' व्यापारी कसले खमंग ! त्यांनी डिस्ट्रिक्ट कोर्टात धाव घेतली. सुनावणी झाली अन् कोर्टाने रेव्हयून्यू खात्यास इंजेक्शन दिले, की केसचा फेरविचार व्हावा ? कारण तांदळाची प्रतवारी लावलेलीच नाही. ती न लावताच पंचनामा-खटला म्हणजे व्यापाऱ्यावर अन्याय आहे. झाले ! आता ही केस म्हणजे संबंधित सरकारी अधिकाऱ्यांनी 'प्रेस्टीज इश्यू' बनविला, आणि ह्या

विरुद्ध हायकोर्टात सरकारतर्फे अपिल दाखल करण्यात आले.

तिथला जिल्ह्याधिकारी कलेक्टर बिचारा साधा-सरळ असावा. तो मग मधे पडला. त्याने सूचना मांडली की, 'गेले नऊ दहा महिने तांदूळ गुदामांमध्ये पडून किडे-अळ्या खाताहेत त्याऐवजी विकून टाका. व्यापारी लोक त्या त्या रकमेचा जामीन देतील, केस चालू देत सावकाश. त्यामुळे गोडाऊन्स मोकळी होतील, खराबी वाचेल...' पण अशांचे बोलण्याचा कधी उपयोग असतो काय? अर्ज, विनंत्या, सूचना प्रपोजल्स सारे व्यर्थ ठरले. राज्य सरकार म्हणते 'हायकोर्टाचा निकाल लागू दे'

पुढे काय झाले? काहीही नाही! पंचनामा झाला आक्टोबर १९७१ मध्ये आणि १९७२ चा आक्टोबर महिना जवळ येत आहे. केसचे कागद हायकोर्टात तारीख कधी पडते त्याची वाट पाहात आहेत. तिकडे गुदामात घुशी, उंदीर (दोन पायांचे व चार पायांचेही!) मंडळींची चंगळ चालू आहे. राष्ट्रीय एकात्मतेच्या वल्गना सारे नेते, मंत्री करीत आहेत. इतका सुंदर तांदूळ – २४००० पोती – ५८ लाख रुपयांचा – लौकरच कण्या होऊन अळ्या पडून खराब होईल. त्याचा लिलाव होईल, तेव्हा हमाली देखील वसूल होणार नाही! पण नाही! प्रांतबंदी म्हणजे प्रांतबंदी! ना मला, ना तुला...ना आंध्राला, ना केरळला...

□ □ □

---

## मुक्काम पुणे...

पृष्ठ १० वरून

त्यांचा विजय हा या निवडणुकीतील अपेक्षित भाग होता.

या निवडणुकीवरून आणखीही काही निष्कर्ष निघतात.

१ : पदवीधर मतदार संघ असूनही जेमतेम पन्नास टक्के मतदान झाले. एकूण ४०१ मते बाद झाली. दोन्ही गोष्टी भूषणावह नाहीत.

२ : जनसंघाचे मतदान पक्ष-आदेशाप्रमाणे झाले नाही. उत्तमरावांबाबत धोका पत्करण्याची मतदारांची तयारी नव्हती.

३ : जनतेमध्ये प्रचंड स्थान मिळवलेल्या नव काँग्रेसला बुद्धिजीवी वर्गामध्ये स्थान नाही.

४ : प्रधान यांचा विजय-व्यक्तीगत स्वरूपाचा असून या मतदारसंघामध्ये अन्य कोणत्याही पक्षापेक्षा जनसंघ निर्विवादपणे जास्त प्रबळ आहे.

५ : ग. प्र. प्रधान व उत्तमराव पाटील हे दोघेही विद्यमान आमदार निवडून आल्याने नवीन उमेदवाराला संधी नाकारली गेली.

□ □ □

# शतपावली

## भ्रमभग्न

रवींद्र पिंगे

अचानकपणे लाभलेला हा नरजन्म जर लौकिकदृष्ट्या सफल करून घ्यायचा असेल, तर इच्छा असो वा नसो, काही गोष्टी मनाजवळ मंजूर करून घेतल्याच पाहिजेत. उदाहरणार्थ, माया, ममता, जिव्हाळा, त्याग, करूणा, वगैरे अमूर्त बाबीं-वरून मन दूर वळवायलाच पाहिजे. आपला मांसल देह हेच एकमेव परमसत्य आणि आपलं देहसुख हीच ह्या जन्माची इतिकर्तव्यता, ह्या अपर्यायी प्रमेयाची कोनशिला आपण आपल्या मनात थडग्याच्या थंड चिऱ्यांसारखी घट्ट बसवली पाहिजे. पुढचा असंभाव्य जन्म मिळायचा असेल तेव्हा मिळो वा न मिळो बापडा, चालू जन्माच्या कठोर संदर्भात बेभरंवशाचा पुनर्जन्म हे शुद्ध थोतांड आहे, आणि भोगीत असलेला हा मनुष्यजन्म हेच खणखणीत वाजणाऱ्या नाण्यासारखं रोकडं सत्य आहे, हे व्यावहारिक वास्तव गळयात अडकवून घेतलं पाहिजे. शुचिता वगैरे पौष्टिक गोष्टी वर्षातून एखाद-दुसऱ्यांदा गळा काढून रडायला रुचिपालट म्हणून ठीक आहेत. व्यवहारात गाठ फक्त पैशांशी असते. यापुढेही असेल. म्हणून त्या अमाप वर्धिष्णू शक्तीच्या नाड्या आपण आपल्या दहाही बोटात गुरफटून ठेवल्या पाहिजेत. चंद्रबिंबाच्या सभोवती तेजोवलय गरगरत असतं, तसं पैशांच्या सभोवार अचाट शक्तीचं आणि अतर्क्य शक्यतांचं वलय आज आहे. उद्याही असणार आहे. जो पैशाची ही ताकद मानेल आणि त्यानुसार पवित्रा घेईल, तो अक्षय सुखाला लागेल. मग, गुलमोहोराच्या प्रत्येक डहाळीला फुलांचे गुबगुबीत गेंद लगडावेत तसे आपल्या प्रत्येक कृतीला, ऐहिक सुखाचे झेले लागलेले दिसतील. आपण थेट सुखमय होऊ.

नेमकं हेच होत नाही.

बाब इतकी सरळ, सोपी असूनही फक्त आपल्यापुरतंच पहावयाला आपण कुठे तरी तोकडे पडतो. डोंगराच्या पलीकडे सूर्योदयाच्या किरणांचे पाट असावेत त्या-

प्रमाणे आपल्या देहसुखाच्या पलीकडे कुठेतरी सुखाचे झरे आहेत, हे आपण नकळत मानतो. मग वास्तवाची वेस ओलांडून अदृश्य अशा अमूर्तांचा पाठलाग सुरू होतो. आपण मारे परिवार गोळा करतो. त्या परिवारासाठी आपली खपाखप सुरू होते. एका बाजूने आपलं स्वतःबरोबरच दुसऱ्यासाठी जगणं सुरू होतं. मन भलाई जोडीत जातं. भलाई ही अमूर्त कल्पना. त्या अमूर्त कल्पनेची सुकी वाळू जमवून आपण घट्ट मूर्ती बनविण्याचा फोल अट्टाहास करतो. अरे, चिमूटभर भलाई गाठीशी बांधून देहसुख लाभेल ? नाव सोडा. हे नीट कळतं. न कळल्यासारखं ते किचकट नाही. चंद्रकिरणांचं दूध पिऊन पोट भरत नाही हे न कळण्याइतकं दूधखूळं कोण आहे ? भलाईसुद्धा चंद्रकिरणांसारखीच आहे. ती ओंजळीत साठवून पोट भरत नाही. तरीही भलाईचे चंद्रकिरण ओंजळीत जमविण्याचा माणसं जन्मभर अट्टाहास करतात. ज्याची त्याची धाव आकाशासारख्या कक्षा सतत रूंदावत जाणाऱ्या परिवाराची अमूर्त अशी भलाई जोडण्याकडे असते.

इथून फजितीचा प्रारंभ होतो.

हे सर्व घडाभर ताक नमनालाच घुसळण्याचं कारण बापटकाका !

आता प्रकार काय झाला ते सविस्तर सांगतो. त्या अगोदर एक महत्त्वाचा बारकावा सांगतो. आमच्या चरित्रनायकाचं नाव बापटकाका नाही. त्यांचा तोंडवळा आपल्या सेनापती तात्या बापटांसारखा एकदम घरगुती नि खंगलेला दिसला. म्हणून म्हटलं हेही बापटच की ! ते तात्या नि हे काका. दोघेही खादीवाले.

माझ्या एका रुग्ण नातेवाईकाच्या समाचारासाठी मी इस्पितळात गेलो होतो. इस्पितळ अगदी लख्ख होतं. दालनं प्रकाशानं उजळली होती. औषधी वास दरवळत होते. सफेत गणवेषात उठून दिसणाऱ्या सावळ्या केरळीय परिचारिका भरभर कामं उरकीत होत्या. त्यांच्या वाळलेल्या हेडबाई चांदीच्या काड्यांच्या चष्म्यातून त्या चपळ मुलींवर सक्त नजर फिरवीत होत्या.

मी खाटेवर पहुडलेल्या आजारी नातेवाईकाशेजारी टेकलो. सफेद चादरीने लपेटलेल्या त्याच्या पायांवरून हात फिरवला. कुशल विचारलं. त्यावर तो म्हणाला,

'काय मजा आहे पहा, ऑफीसमध्ये मी मद्राश्यांवर नेहेमी जळफळलो. आमच्या पोटांवर पाय देणारे म्हणून त्यांचे टांगे मोजले. शिव्या घातल्या. पण आता अनुभव अगदी वेगळा आला. ह्या मद्राशीणींनीच औषधं पाजून आम्हाला जगवलंय.'

'त्या मद्राशिणी नव्हेत, त्या केरळच्या आहेत.' मी दुरुस्ती सुचवली.

'म्हणजे एकच रे ! मुद्दा त्यांनी आम्हाला जगवलंय हा आहे. तुला सांगतो, ह्या केरळी मुलींनी आठवडाभर संप केला, तर हजारो मराठी माणसं हॉस्पिटलांतून औषधपाण्याविना तडफडून मरतील. शंभरात नव्व्याण्णव जणी त्या आहेत आणि वर सगळ्याजणी दिसायला सारख्या !'

त्याच्या म्हणण्यात तथ्यांश दिसला. त्या प्रशस्त दालनात पंचवीस-तीस तरी

रुग्ण असतील. मी सर्वांकडे पाहून घेतलं. बहुतेकांच्या चेहरेपट्टीचा घाट मराठी दिसला. पाखरांसारख्या भिरभिरणाऱ्या स्वच्छ परिचारिकांकडे पाहिलं. प्रत्येकजण केरळीय वाटली ! अनेक चमत्कारिक प्रश्नांची वटवाघुळं मनात फडफडली. ह्या सुखी असतील ? ह्यांची लग्नाची वयं टळली असतील ? ह्यांचे गावाकडचे आईबाप पस्तावत असतील ? खुद्द ह्यांना आयुष्यात निर्धास्त वाटत असेल ? मतलबशून्य जिव्हाळ्याची चव ह्यांनी चाखली असेल ? ह्यांना प्रियकर असतील ? ह्या परिचारिकेच्या कठोर पेशाला कंटाळल्या असतील ? घर सोडून दूर देशात एकाकी रहाणं हा शाप आहे ? ह्यांचा अनुभव काय सांगतो ? ह्या एकमेकींवर शारीरिक प्रेम करीत असतील ? असतील की नसतील ? इथल्या रोग्यांना प्रेमाने भेटायला येणारी त्यांची गहिवरलेली बायकामुलं पाहून ह्यांना आपला जन्म ओसाड झाल्यासारखा वाटत असेल ? ह्यांचे देह म्हणजे ह्यांच्या स्वप्नांचे वधस्तंभ ठरले असतील? पुरुष फक्त लुटारूंच्या रूपातच ह्यांना भेटत असतील ? ह्यांच्यातल्या एखादीचं लग्न झालं तर उरलेल्यांच्या हृदयात काय कालवाकालव होत असेल ? आत्मपीडेतला आनंद उपभोगण्यासाठी ह्या बेछूट उंडगेपणा करीत असतील ? ह्यांना अटळ म्हातारपण भेडसावीत असेल ? की, ह्यांना आता आगापिच्छा नसलेल्या एकटयाच्या खुशालचेंडू आयुष्याची चटक लागली असेल ? ह्यांच्यातल्या कुणी आत्महत्तेचा प्रयत्न करीत असतील ? दुसऱ्याला कुरवाळण्याचं भाग्य ह्यांना लाभलं असेल ? ह्यांना कुणी कुरवाळीत असेल ? नसेल ?

आशंकांना अंत नव्हता. मी नातेवाईकाचा निरोप घेतला. इस्पितळातल्या दालनातल्या सर्वांच्या नजरेमधले इतिहास-भूगोल वाचण्यासाठी पाऊल उचललं.

एक दालन मागे पडलं. दुसरं आलं. दुसरं मागे पडलं. तिसरं आलं. तिसरं मागे पडलं, चौथं आलं......

चौथ्या आणि पाचव्या दालनाच्या मधल्या चिचोळ्या बोळकंडात जमिनीवर अंथरलेल्या गादीवर म्हातारबोवा पडलेले होते. एरव्ही माझं लक्ष त्यांच्याकडे जातंच ना. कारण असे खाटेवर जागा मिळू न शकलेले अनेक रोगी खाली जमिनीवर गाद्या पसरवून सामावून घेतलेले होते. पण म्हातारबोवा माझ्याकडे पाहून बोटांनी काही तरी खूण करताहेतसं मला वाटलं. मी ओळखलं, की गृहस्थांना पाणी वगैरे काही तरी हवं असणार. मी जवळ गेलो. म्हटलं,

'काय म्हणता बाबा ?'

उत्तर देण्यासाठी त्यांनी तोंड उघडलं. पण शब्द फुटेना. म्हातारबोवांची जीभ लुळी पडलेली दिसली. म्हणजे हे प्रकरण अर्धांगवायूचं आहे, हे मी ओळखलं. त्यांचा एक हातही थरथरत होता. त्यांना अधिक क्लेश देण्यात माणुसकी नव्हती. मी तडक एका परिचारिकेकडे गेलो. सांगितलं,

'त्या म्हाताऱ्या गृहस्थांना काही तरी हवंय. त्यांच्याकडे जरा पाहाता काय ?'

पार्क-डेव्हीसचा

# त्रिविध फायदे देणारा

# निको साबण

## इतर कोणत्याहि साबणापेक्षा तुमच्या त्वचेची अधिक काळजी घेतो

१ निको जंतूंचा नाश करतो

२ निको शरीराचा घामटपणा घालवितो

३ निको कातडी निर्मळ करून तिचे रक्षण करतो

निकोनें केलेले स्नान म्हणजे आरोग्यमान, नितळ कांतिकरिता घेतलेली परमावधीची काळजी! निकोच्या जंतुनाशक फेसामुळे कातडीवरील जंतूंचा नाश होतो आणि तिचे आरोग्य राखले जाते निकोच्या औषधी गुणधर्मामुळें शरीराचा घामटपणा व दुर्गंधी दूर होतात. निकोच्या प्रभावी जंतुनाशक क्रियेमुळे कातडीच्या साधारण रोगांपासून रक्षण होते व त्वचा निर्मळ धुतली जाऊन ती तजेलदार, कांतिमान व टवटवीत होते. निको पुटकुळ्या व घामोळें यापासूनही रक्षण करतो. निकोच्या नियमित वापराने डोक्यांतील खवड्यापासून बचाव होतो तुमच्या कातडीचा तजेलदारपणा व आरोग्य राखण्यासाठीं त्रिविध फायदे देणाऱ्या निकोचा वापर आजच सुरू करा.




निकोची संवय लावून घ्या
आपल्या त्वचेसाठीं तो आवश्यक आहे

® Regd. Trade Mark. Regd. Users—Parke Davis (India) Ltd., Bombay-72 AS.

JAISONS

'त्याची तुम्ही काहीही काळजी करू नका.'

परिचारिकेचं वाळूसारखं कोरडं उत्तर. तिची अजिजी करावीशी वाटली. कारण पोलीसठाण्याखालोखाल इस्पितळातल्या परस्वाधीन आपण कुठेच नसतो.

'काळजीचा प्रश्न नाही, पण त्यांना तहान लागली असणार. म्हणून तुम्हाला विनंती.'

'आमची कामं आम्ही देवाला साक्षी ठेवून चोखपणे करीत असतो. मी पाहून घेईन त्यांचं. तुम्ही काळजी करू नका. यू मे प्लीज गो.' एवढं माझ्याकडे नजर न उचलता बोलून ती आपल्या कामात दंग झाली. मनातल्या मनात मी तिला शिव्या मोजल्या. अरे, इकडे पेशंट तहानेने तळमळतोय नि ही मला थंडपणे देवाच्या साक्षीचा हवाला देतीय? ते काही नाही, ह्या एकेकीची पार्सलं उलट टपाली केरळला पाठवली पाहिजेत.

क्षणात मला कल्पना सुचली. मी बोवांच्या शेजारच्या रुग्णाकडे गेलो. त्याचा पाण्याचा तांब्या होताच. म्हटलं त्यातलं थोडंसं पाणी तहानेलेल्या बोवांना द्यावं. काम फारच सोपं होतं. मी तत्काळ म्हातारबोवांच्या शेजारच्या माणसाला म्हटलं,

'तुमचं थोडंसं पाणी घेऊ का? ह्या बोवांना तहान लागलीय.'

'पाण्याला नाही कोण म्हणेल? पण त्यांना पाणी नको असणार.'

'त्यांनीच खूण केली मला.'

'अहो, हा म्हातारा अशी खूण आल्या गेलेल्या सर्वांनाच करतो. तुम्ही जरा उशीरा आलात. पंधरा दिवसापूर्वी ह्यांची वाचा इतकी खोल गेली नव्हती. त्यावेळी हे प्रत्येकाला खुणेने जवळ बोलावून घ्यायचे नि सांगायचे, 'अहो, मला मदत करा. मी स्वातंत्र्यसैनिक आहे. आता हा लाख स्वातंत्र्यसैनिक असेल. पण इथे प्रत्येकालाच स्वताचं झालंय थोडं तिथे आणखी ह्यात्तं कोण करीत बसणार? बरं, ह्यांना मदत करायची म्हणजे काय कारायची? ती अम्मा ह्यांचं अगदी लेकीसारखं करते. आणि ह्यांची पोटची पोरं मात्र बापाकडे बघायला तयार नाहीत. म्हणतात, हे देशासाठी झिजले, तेव्हा देशानेच ह्यांच्याकडे परस्पर पहावं. ऐंशी वर्षांचा हा हा गोळा आता इथे येऊन पडलाय!'

'हे बुवा स्वातंत्र्यसैनिक आहेत?'

'असं सर्वांना सांगायचे बुवा. नि असतीलही. कारण कपडे एकजात खादीचे होते आले तेव्हा. शिवाय, सुरुवातीला तुरुंगातल्या आठवणीसुद्धा सांगायचे.'

'केव्हा आले हे?'

'तरी, तीन महीने झाले असतील.'

'कुणी आणलं ह्यांना?'

'असाच कुणी तरी सोम्यागोम्या ह्यांना घेऊन आला. पोराबाळांना निरोप पाठवले, तर मोठ्या मिनतवारीने एक लेक आली नि बापाला एक संत्रं देऊन गेली.

ह्यांच्यापाशी एक पैसा नाही. अहो, मुलंबाळं कुठपर्यंत ? तुमच्याकडे दोन दिडक्या आहेत नि तुमचा प्रत्यक्ष त्रास त्यांना सोसावा लागत नाही, तिथपर्यंत. प्रेमबीम सगळे भ्रम आहेत.'

'छे – छे ! प्रेम भ्रम कसं असेल हो ? पण केस नीट हाताळावी लागते. मी सगळा बदल घडवून दाखवतो. नाव काय ह्याचं ?'

'काका म्हणतात ह्यांना. इथे आस्थेने नावगाव कोण विचारणार हो ? त्यांच्या उशाजवळ ह्यांचं हॉस्पीटलाचं कार्ड असेल. त्यावर सर्व नोंदी असतील पहा.'

आमचं हे सर्व बोलणं पायाजवळच पडून राहिलेल्या म्हातारबोवांच्या कानापर्यंत गेलं असणार ? मुळात वृद्धापकाळी श्रवणशक्ती मंदावतेच. तशात हे चिरंजीव अर्धांगाचे पेशन्ट. मी सरळ खाली वाकलो; नि म्हातारबोवांच्या उशाला कार्ड होतं ते वाचलं. कार्यावर नाव होतं, 'काकासाहेब देवभक्त.' कार्डावर थोडी खोडाखोड होती. अगोदर 'देशभक्त' असं लिहिलेलं होतं. 'श' खोडून 'व' केला होता. पुन्हा 'व' खोडून 'श' केला होता. नि पुन्हा 'श' खोडून 'व' केला होता ! पत्त्याची जागा कोरीच सोडली होती !

आता ह्या म्हातरबोवांच्या नातेवाईकांना कुठे हुडकणार ? कसं हुडकणार ?'

'ह्यांची काळजी घेतात ना नीट ?'

'असं काय विचारता हो ? त्या अम्माच्या रूपाने ह्यांना देवच भेटलाय. ती ह्यांचं सारं आपलेपणाने करत्येय, म्हणून हे आजपर्यंत तरी टिकून आहेत. नाही तर ह्यांनी केव्हाच राम म्हटला असता. अहो, ह्या वार्डात दिवसाकाठी तीन तीन लोक मरताहेत. हिशोब ठेवलाय मी.'

'पण ह्या स्वातंत्र्यसैनिकाचं होणार काय ?'

'पहा, ह्यांच्या पोटच्या पोरांना जर त्याची पर्वा नाही, तर तुम्ही कशाला जीव त्रासून घेता ? हा अर्धांगाच्या रोग्यांचा वॉर्ड आहे. इथे महिनो न् महिने माणसे नुसती निपचितपणे पडून असतात. बरी झाली नि घरदार असलं तर गुपचूप परत जातात. नाहीतर देवालाच ह्यांची दया येते. तो खेळ आटपून टाकतो.'

अखेरीला सर्वांनीच हात टेकले की खेळ आटोपणं तर आहेच; ते कुणाला चुकलेय ? पण त्याच्या अगोदर हातपाय हलवून वल्ही मारलीच पाहिजेत. म्हातारअखेरच्या विटंबनेतून मोकळं करावं म्हणून मी कंबर कसली.

'ह्यांच्या मुलाबाळांचा पत्ता कसा मिळेल ?'

'मुलगे तर फिरकलेलेच नाहीत. तेव्हा प्रश्न मुलीचाच आहे. आडनाव काही तरी करंबेळकर असं म्हणाली होती. नक्की आठवत नाही. दादरच्या सोनजी तेजपाळ चाळीत राहाते म्हणाली होती. मात्र, मला नक्की काहीच आठवत नाही. बरं, ह्यांची वाचा आटलेली. ते माझ्याकडे नि मी त्यांच्याकडे नुसते बघत बसतो.'

आम्ही दोघं बोलत होतो. जमिनीवरल्या अंथरूणात वाचाहीन पडलेले म्हातार-

बोवा आमच्याकडे रिकाम्या नजरेने टक लावून प्रहात होते. त्यांचे पांघरूणाखालचं अर्धं अंग थरथरत होतं. मी त्यांच्या शून्य नजरेचा निःशब्द निरोप घेतला.

दादरची आडरस्त्यावरली सोनजी तेजपाळ चाळ भूमितीतल्या आडव्या तिडव्या तोल झुकलेल्या आकृतीसारखी गेली शंभर वर्षं उभी आहे. मी तिथे गेलो. करंबेळ-करांचं नाव सांगितलं. रामा शिवा गोविंदा! स्वातंत्र्यसैनिकाचा हवाला दिला. तेव्हा विनोद पिकला. मग एकजण म्हणाला, 'वर चौथ्या मजल्यावर ताराह-बादकरबाई आहेत. त्यांचे वडील मागे आजारी पडले होते. त्यांना विचारा.' ताराहबादकरांचं दार ठोठावलं. म्हटलं,

"मी जे. जे. हॉस्पीटलातून आलो आहे.'

'वरं, मग?' पन्नाशी ओलांडलेल्या निर्धन स्त्रीमुखातून बर्फासारखी थंड निरुत्साही चौकशी.

'तिथें काकासाहेब नावाचे रुग्ण आहेत. त्यांच्यावतीने आलो. आपला त्यांच्याशी नातेसंबंध आहे काय?'

'हो. ते माझे वडील. कसे आहेत?"

'त्यांची वाचा गेली आहे.'

'माहीत आहे.'

'वयही झालंय.'

'हो. ऐंशीवं वर्ष गुदस्ताच ओलांडलं.'

'आता त्यांनी असं हॉस्पीटलात किती काळ लोळायचं?'

'देवाची इच्छा असेल तिथपर्यंत.'

'ते तर खरंच. पण म्हातारपण आपल्याच मुलाबाळांच्या अंगणात घालवलं म्हणजे ते बरं असतं.'

'म्हणजे तुम्हाला नेमकं काय सांगायचं आहे?'

'त्यांना इस्पितळातून घरी आणून तुम्हा भावडांनी त्यांना आश्रय द्यावा. हॉस्पीटलात आपलेपणाने करणारं कोण असणार आहे?'

'आम्ही त्यांची मुलं. त्यांनी कधी आमचं आपलेपणाने केलं होतं? कधी संसाराकडे पाहिलं होतं?'

'मला त्यांचं सांसारिक जीवन अजिबात माहीत नाही. पण देशकार्य केलंय म्हणे त्यांनी.'

'असं काय करता? ते येरवड्याला होते, धुळ्याला होते, विसापूरला होते, नाशकाला होते. सगळे मोठमोठे जेल त्यांनी पाहिलेत. धुळ्याला तर ते विनोबांच्या समोरच्या कोठडीत होते.'

'मग अशा देशभक्ताचं म्हातारपण कसं शांत समाधानात जायला हवं.'

'ज्यांच्यासाठी ते खपले, त्यांनी पहावं त्यांच्याकडे. आम्ही गरीब माणसं. आम्ही काय करणार?'

'तें कुणासाठी खपले ?' मी मुद्दाम खोचून विचारलं.

'कुणासाठी वगैरे काही नाही. खपायचं म्हणून खपले. संसार, बायकामुलं, घरदार, सारं विसरून खपले. आमच्या आईचं मरण त्यांच्यामुळे लवकर ओढवलं. आता देव त्यांना न्याय करतोय.'

'तुमच्याकडून त्यांचं काहीच होण्यासारखं नाही काय ?'

'होण्यासारखंही नाही, नि व्हावं असंही नाही. आमच्या वडिलांना आम्ही नीट ओळखतो. जगाला ते देशभक्त आहेत. आमच्या हिशोबी आमच्या कुटूंबाचे ते काळ होते. जसं करावं, तसं भरावं.'

'प्रश्न मिटला. तुमच्या भावाचा पत्ता देता ?'

ताराहबादकरबाईंकडून पत्ता मिळवून मी दोन दिवसांनी त्यांच्या भावाकडे गेलो. नमस्कार-चमत्कार झाला. मग मी सरळ सरळ विषयालाच हात घातला,

'कुणाला आवडो वा नावडो, तुमचे वडील देशभक्तीत सरस होते हे उघडच आहे. त्यांनी अंगचोरपणा केला नाही.'

'पण हे मूर्खासारखे मागे-मागे राहिले. ह्यांच्याबरोबरीच्यांनी बंगले उठवले. ह्यांनी काय केलं ? आपल्याच बायकोपोरांना भरल्या ताटावरून उठवलं!'

'पण तो इतिहास आपण आता विसरला पाहिजे.'

'नाही. काय साधलं आमच्या वडीलांनी देशभक्ती करून ? आमचं मरो म्हणतो मी, निदान आपला तरी स्वार्थ साधायचा! रंगराव दिवाकरांना बंगाली ह्यांनी शिकवलं जेलमध्ये. तो रंगराव गव्हर्नर होऊन तोफांची सलामी घेतो, नि हे कोरा-पुटाच्या जंगलात जाऊन एक्झिमाचं विकतचं दुखणं घेतात! ह्यांचा धाकटा भाऊ म्हणजे आमचे काका डॉक्टर आहेत. ते म्हणाले, भाऊ, तू माझ्या घरी ये, तुझ्या एक्झिम्यावर मी दवापाणी करतो. पण ह्यांच्या नशिबात हवं ना प्रेम भोगायचं. हे हट्टून बसले. म्हणाले, माझा निसर्गोपचारावर विश्वास आहे. आता तुम्हीच सांगा की एक्झिमा काय उपास करून नि दूध पिऊन बरा होतो ? देशाची काळजी करणाऱ्याला हे कळू नये ? शेवटी दोन्ही पाय गुडघ्यापर्यंत सुजले — तरीही आज-पावेतो त्यांनी डॉक्टरी औषध केलेलं नाही. काही नाही हो, एकेकाचं नशिबच फुटकं असतं.'

'आता ते सांधण्याचे प्रयत्न करूया.'

'काहीही उपयोग होणार नाही! एक गोष्ट ह्यांनी धड केलेली नाही. हिंदी प्रचार झाला, खादी विक्री झाली, मद्यविक्री झाली, भूदान झालं, चलनशुद्धी झाली, अहो, मला नोकरी लावून देण्यासाठी हे साधी चिठीचपाटीही मिळवू शकले नाहीत—तर, हे काय देशसेवा करणार ? ह्यांनी फक्त चरखा फिरवला, 'गीताई' वाचली आणि साप्ताहीक झेंडावंदन केलं. आणि ह्या साऱ्याला खुळे लोक देशभक्ती

पृष्ठ ४६ वर

# पुस्तके

## ॥ शय्या ॥

### वेगळेपणाने भारलेल्या नाटिका

**निशिकांत मिरजकर**

रत्नाकर मतकरींच्या सहा एकांकिकांचा हा संग्रह आहे. सहाही एकांकिकांचे विषय, त्यातील अनुभव आणि त्यांची मांडणी यामध्ये विलक्षण नावीन्य आहे. वेगळेपणा आहे. या नाटिका वेगळेपणाने भारलेल्या आहेत. नाटचसंकल्पनाविषयीच्या पोथीनिष्ठ पारंपरिक समजुतींना धुडकावून लावणाऱ्या आहेत.

नाटकामध्ये सतत काहीतरी घडत असले पाहिजे, ॲक्शन पाहिजे, ही अशीच एक समजूत. परंतु 'शय्या' या पहिल्याच एकांकिकेत तसे काहीच प्रत्यक्षात घडत नाही. एका प्रशस्त शय्येवर रतिक्रीडेनंतर पहुडलेले तो आणि ती, हे यातले दृश्य. शेवटपर्यंत ते तसेच राहते. फक्त दोघांच्या संवादातून व्यक्तिमत्त्वाचे, भावनांचे पीळ उलगडत राहतात; आणि त्यातून नाटच उभे राहते. फक्त संवादातून. या दोघातला 'तो' एक विख्यात चित्रपट–कलावंत आहे आणि 'ती' एक सामान्य एक्स्ट्रॉ नटी आहे. केवळ एका रात्रीच्या उपभोगासाठी त्याने तिला येथे आणलेली आहे. हाती लागलेल्या या/स्वप्नक्षणावर ती तृप्त आहे. त्याला मात्र हळवेपणा आवडत नाही. तो बेचैन आहे. पण ती समजूतदार आहे. जीवनाला सरळपणे समजून घेण्याची तिची वृत्ती आहे; आणि 'त्या'लाही ती समजून घेऊ शकते. तिची स्वत:ची काही जीवनस्वप्ने आहेतच. पण ती व्यवहारात मुरवून घेण्याइतकी समज तिला आहे. 'त्या'चे जीवनाविषयी काही तत्त्वज्ञान बनलेले आहे. हे कठोर तत्त्वज्ञान आहे; आणि ते विफलतेतून जन्मलेले आहे. असे हे दोघेजण बोलताहेत. एकाच बिछान्यात पडून लग्नसंस्थेविषयी विचार करताहेत. परस्परांच्या विचार-भावनांच्या प्रतिक्रिया सोसत आहेत. त्यातून वरचे पापुद्रे निघून अंतरंगातल्या

ओल्या जखमा उघड होत आहेत. हळवेपणा आणि कठोरपणा, स्वप्नाची मधुर स्मृती आणि वास्तवाची निष्ठुर जाणीव, भास आणि सत्य, जिद्द आणि अगतिकता यांची आंदोलने त्यांच्या संवादातून उचंबळून येत आहेत. या संवादात जीवनातून अनुभवलेले काव्य आहे आणि काव्यातून रेखलेले तत्त्वज्ञान आहे. रत्नाकर मतकरींनी एका छोटचाशा अवकाशात फार मोठे विलक्षण आयुष्य पकडण्याचा यशस्वी प्रयत्न येथे केलेला आहे. यात सगळेच आहे. एक प्रकारचा संथ बेदरकारपणा, न सोसवणारी आर्त तळमळ आणि हृदयाला भिडणारे नाटचही. संथ आकृतीच्या रेखांकनातही केवढी विलक्षण रोखलेली गतिभावना भरलेली असते याचा प्रत्यय देणारी ही एकांकिका आहे.

## रणमर्द–अतिमानवी कल्पना

'रणमर्द' ही दुसरी एकांकिका. नाटकात हरवून जाणाऱ्या एका नटाची कहाणी. रणमर्दाची भूमिका करताना त्यात बेभानपणे समरस होऊन रणमर्दाच्या आत्महत्येच्या वेळी खरोखरीची आत्महत्या करणाऱ्या गुरुनाथांचा आत्मा दुसऱ्या नायकाच्या देहात संचरून पुन्हा रणमर्दाची भूमिका करतो. त्या नायकाच्या प्रेयसीला हे मंजूर नाही. त्याने कोणाच्यातरी प्रभावाखाली काम करावे, स्वत्व विसरून जावे हे तिला पटत नाही. पुन्हा त्या आत्महत्येच्या प्रसंगाचे भय आहेच. नायकाला पुनः पुन्हा प्रेरणा देऊन, ही प्रेयसी असल्या खुळचट लोकभ्रमाचे दडपण झुगारून देण्यास उद्युक्त करीत आहे. त्याचा झगडा चालू आहे, गुरुनाथांच्या आत्म्याशी. आत्महत्यच्या प्रवेशाची त्यालाही भीती वाटत आहे. जुन्या अनुभवी रंगभूषकाला या झगडचातील नायकाची तडफड पाहवत नाही. त्याची गुरुनाथांवर भक्ती आहे. त्यामुळे नायकाच्या प्रेयसीशी त्याचा वाद होतो.

मानसिक झगडचामध्ये नायक अपुरा पडू लागतो. गुरुनाथांच्या आत्म्याचा प्रभाव तो झुगारून देऊ शकत नाही. प्रेयसीचे मन हुरहुरते. "त्या दुष्ट सावलीतून तो सुखरूप बाहेर पडू दे" अशी परमेश्वराची प्रार्थना ती करीत राहते. तिच्या मनाचा तोल सुटू लागतो.

रणमर्दाच्या आत्महत्येच्या प्रसंगी नायकाच्या मनातील मानसिक संघर्षाचा क्लायमॅक्स होतो. आपल्यावर प्रभाव गाजवणाऱ्या गुरूनाथांच्या आत्म्याला ठार मारल्याचे समाधान त्याला खरोखरी आत्महत्या करताना लाभते; आणि त्यानंतर हतभागी प्रेयसीचा गुरूनाथांच्या आत्म्याशी प्रत्यक्ष संवाद होतो. आपल्या असफल जीवनाची आणि मरणाची कहाणी गुरुनाथांचा आत्मा तिच्यापाशी सांगतो. नायकाच्या मृत्यूमुळे आपणाप्रमाणेच गुरूनाथांचा आत्माही अनाथ झाल्याची जाणीव प्रेयसीला होते.

एक विलक्षण कल्पना या एकांकिकेच्या केंद्रस्थानी आहे. ही कल्पना अतिमानवी आहे. पण अगदी खरेपणाने अनुभवलेली आहे. त्यामुळे या एकांकिकेतला नाटचाचा

परिघच वेगळा बनला आणि या नाट्याचा परिणामही वेगळ्या प्रकारचा आहे. कल्पना आणि मांडणी या दोन्ही दृष्टींनी ही एकांकिका एक निराळी पातळी गाठणारी आहे.

'मधुवंती' ही एकांकिकाही अशीच शेवटी अतिमानवी पातळीवर उतरणारी आहे. प्रारंभीच एक विशिष्ट वातावरण उभे केले आहे. एक भावनात्मक अपेक्षा आधी त्या वातावरणातूनच निर्माण होते. अशा पार्श्वभूमीवर साठे आणि मधुवंती यांची दिग्दर्शक नंदनच्या बंगल्यावर भेट होते. साठे हा होतकरू कथालेखक आणि मधुवंती सुप्रसिद्ध अभिनेत्री. साठेचे मधुवंतीवर एकेतर्फी भाबडे प्रेम, उलट मधुवंती दिग्दर्शक नंदनवर मनापासून उत्कट प्रेम करणारी. साठे तिला नंदनबद्दल सावध करण्याचा प्रयत्न करतो; पण मधुवंती ते मनावर घेत नाही. नंदनशी एकांतात झालेल्या संभाषणात, मधुवंतीचा भ्रमनिरास होतो. आपल्या एकनिष्ठ प्रीतीला नंदनकडून केव्हाही प्रतिसाद मिळणे शक्य नाही हे तिला कळून चुकते.

## भडकपणा नाही

नव्या चित्रपटाच्या कथेचा शेवट कसा करावा, याविषयी चर्चा सुरू होते. प्रियकराकडून वंचित झालेली नायिका आत्महत्या करते; नंतर भूत होऊन येते आणि प्रियकराचा खून करते, असा शेवट नंदन सुचवतो. अवास्तव म्हणून साठेला तो पसंत पडत नाही. परंतु नंदन आणि निर्माता शेटजी त्याच शेवटाचा आग्रह धरतात. दरम्यान भूत झालेल्या नायिकेसाठी म्हणून आणलेला पोशाख पेहरून मधुवंती आतल्या खोलीतून बाहेर येते. नंदनच्या गळ्यात हात टाकून ती बोलत असता नंदनचा प्राण जातो. मधुवंती बाहेर जाते आणि आतल्या खोलीत मधुवंतीचे प्रेत साठेला सापडते.

या एकांकिकेत संवादातून स्वभावाचे बारकावे अतिशय मार्मिकपणे दाखविले आहेत. तसेच संवादांतील खटकेबाज नाट्यमयताही आकर्षक आहे. मधुवंतीचे स्वभावचित्रण अत्यंत परिपूर्ण आणि सहजरीतीने बांधलेले आहे. भावनात्मक अनुभवाला भडक रंग न देता त्यातील व्याकुळ आर्ततेची जपणूक केलेली आहे. एकीकडे सिनेमाच्या चंचल सृष्टीत राहूनही एकनिष्ठ व हळूवार राहिलेले मधुवंतीचे प्रेम आणि दुसरीकडे व्यावहारिक कठोरपणाने वागणारा नंदन, यांच्यातील विरोध तीव्रतेने जाणवणारा आहे. निष्कारण भडकपणाचा पाल्हाळ न लावता संयमित परंतु अतिशय भेदकतेने परिणाम करणारा असा विरोध आहे. या कथेत मतकरींनी सुपरनॅचरल एलेमेंट आणले आहे. परंतु त्यातील नाट्यमयता इतकी प्रभावी आहे, की ते असंभाव्य वाटले तरी ते अतिरेकी वाटत नाही. या एकांकिकेची मर्यादा म्हणजे मधुवंती जेव्हा विषाची वाटली घेऊन आत जाते, तेव्हाच पुढील कथेची संपूर्ण कल्पना येऊन जाते. सस्पेन्स टिकून राहात नाही.

'मी तुमचं भूत!' ही या संग्रहातली चौथी एकांकिका. या एकांकिकेची घडण

अगदीच निराळ्या प्रकारची आहे. त्यातील सगळे नाट्य वास्तव व कल्पित यांच्या मनोरंजक मिश्रणातून उभे राहिले आहे. पतिपत्नींचा गमतीदार संघर्ष, प्रेमळ परंतु वैताग आणणाऱ्या पत्नीच्या स्वभावातले बारकावे, हे या एकांकिकेच्या आकर्षक-पणाचे महत्त्वाचे घटक आहेत. स्वतःच्याच गतायुष्यातील गत व्यक्तिमत्त्वाचे प्रतिक असलेले स्वतःचेच भूत स्वतःला भेटणे, ही कल्पना मोठी विलक्षण आहे. पण तिच्यामागील योजकता फार मोठी आहे. माणसाचा ठरवलेल्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेण्याचा फुसका प्रयत्न, प्राप्त जीवनक्रमाने केलेल्या फसवणुकीतून आलेली अगतिकता, संसाराच्या रुळांची आखीव मर्यादा आयुष्याला पडल्यानंतरही टिकून राहिलेले प्रौढ सुजाण प्रेम, जुन्यानव्यांचा अटळ झगडा आणि त्यातील सहज सांकेतिकता अशा कितीतरी गोष्टी या प्रतिकात्मक कल्पनेच्या नाट्यमय विस्तारातून लेखकाने प्रभावीपणे सांधल्या आहेत. वेगळ्या परिमाणातील कल्पनांची वास्तवाशी भेट घडवून मतकरींनी यातील नाट्याला दुहेरी पातळी प्राप्त करून दिली आहे. विशेष म्हणजे स्वतःचे भूत स्वतःला भेटण्याची कल्पना आकलनाच्या चौकटीत बसविण्यात मतकरी यशस्वी झाले आहेत; आणि अशा आकलनाच्या चौकटीत बसवूनही त्या कल्पनेतले प्रतिकार्थ ताजे राहिलेले आहेत. केवळ गंमतीखातर सुचावी तशी कल्पना प्रत्यक्षात आणून त्यातून नाट्यमय प्रकाशझोत त्यामुळे उधळले गेले आहेत.

'सत्य' या एकांकिकेत दोघेजण आपापल्या व्यक्तीची प्रतीक्षा करीत असतात. 'एका स्फटिकाच्या कारंजाच्या पायथ्याशी ऊन अर्धवट कललं होतं आणि कारंजाच्या थुईथुई नाचणाऱ्या पाण्यात इंद्रधनुष्यं पडली होती. 'ती 'च्या आणि त्या कारंजाच्या भोवती पारवे उडत होते आणि मावळत्या किरणांनी त्यांचे पंख सोनेरी झाले होते. तिच्या उंचावलेल्या गोऱ्यापान मानेवरही तो सोनेरी प्रकाश पडला होता आणि



ती देखील पारव्यासारखीच सुंदर दिसत होती.' अशा स्वप्नील दृश्यात भेटलेल्या प्रेयसीची प्रतीक्षा 'पहिला' करतो आहे; तर "ही पोरगी फर्स्ट क्लासच आहे अपॉइंटमेंटसुद्धा अगोदर घ्यावी लागली. पोरगी मात्र मारू आहे." अशा वेश्येची वाट 'दुसरा' बघतो आहे. त्यांच्या संभाषणातून परस्परांना छेद देत हळुवार उत्कट काव्य आणि मिस्किल रोखठोक व्यवहार, प्रामाणिक निष्ठा आणि चेष्टेखोर रंगेलपणा, आवेश आणि छद्मीपणा यांची विरोधलय वळशावळशाने गडद बनत जाते. ही गडद विरोधलय हेच या एकांकिकेचे पोत आहे. शेवटी दोघांचीही प्रतीक्षाविषय झालेली व्यक्ती एकच निघणे हा क्लायमॅक्स संभाषणातील सर्व धाग्यांना पीळ देऊन स्वतःकडे ओढून घेणारा आहे.

'कहाणी कुणा प्रेमिकांची' ह्या एकांकिकेची थीम कुठेही घडू शकणारी असली, तरी तिच्या बांधणीत सर्वत्र एक वेगळेपण आहे. यात एक सूत्रधार आहे. तो पात्रांची ओळख करून देतो, त्यांच्याशी संभाषण करतो, त्यांच्या बोलण्यावागण्यावर टीकाटिप्पणी करीत राहतो. नाटकाचे आणि त्यातील कथानकाच्या अपरिहार्य खरेपणाचे असे दुहेरी भान हा सूत्रधार सतत जागे ठेवतो. पुन्हा या सगळ्यामध्ये इथूनतिथून सर्वत्र एक उपरोधाचा सूर कायम राखला आहे. बोचरा आणि कडवट उपरोध नव्हे, पण मार्मिक आणि अंतर्गामी उपरोध. "नाटकाचं नाव 'कहाणी कुणा प्रेमिकांची' असं आहे. ते आपलं द्यायला हल्लीची फॅशन म्हणून दिलेले नाव आहे.

---

## 'जिज्ञासा'चे स्वागत

'जिज्ञासा' हा जुलैमध्ये प्रसिद्ध होत असलेल्या मासिकाचा प्रथम अंक वाचला. नवीन जगाचा परिचय करून घेण्याची उत्सुकता असलेल्या कुमार-कुमारींना एक फार चांगल्या प्रकारचं खाद्य मिळाल्यासारखं वाटलं.

इतिहास-भूगोल, राजकारण, विज्ञान, युवकांच्या प्रश्नांसाठी व्यासपीठ, सामान्य ज्ञान अशा एक ना दोन अनेक विषयांची आकर्षक झलक 'जिज्ञासा'तून विद्यार्थीवर्गाला मिळणार, याची हा प्रथम अंक बघून खात्री पटते. मुलांना वाचायला काय द्यावं, या संभ्रमात पडलेल्या पालकांना 'जिज्ञासा'नं बराच दिलासा दिला आहे.

संपादक श्री. गजानन क्षीरसागर यांच्या तळमळीच्या प्रयत्नांचं मनःपूर्वक अभिनंदन.

[जिज्ञासा किमत १·५०, वार्षिक वर्गणी १५रुपये, १४९३ क सदाशिव, पुणे ३०]

---

मला विचाराल तर या नाटकाचं नाव 'प्रेमा तुझा भंग कसा' असं हवं होतं आणि बिलकुल लुच्चेगिरी किंवा नखरे न करता नाव द्यायचं तर 'एक बुवा आणि एक बाई यांची गोष्ट' असं द्यायला हवं. चच्–पण ते फार लांब वाटतं. आणि साला उगाच 'कुत्रा आणि भाकर यांची गोष्ट' असं वाटतं. तेव्हा तो मुद्दा निकालात जाऊ दे. आहे तेच नाव छान आहे." अशा थाटात सूत्रधाराची उपरोधिक टीकाटिपणी हसतखेळत सारखी चालू आहे. यातली पात्रेही सामान्यांचे प्रतिनिधित्व करणारी आणि त्यात स्वतःच्या व्यक्तित्वाच्या आकारातली एखादी चमक सांभाळून असलेली. यात प्रेमाचा त्रिकोण आहे, प्रेमभंग आहे, पैशाची चण-चण आहे, नोकरीची अपरिहार्यता आहे, बरेच काही आहे; आणि या सगळ्यातून उपरोधाचे नर्म सूत्र गुंफत एक विस्कटलेली कथा सांधली आहे. जीवन हेच एक विलक्षण नाटक आहे, या सत्याचे हे एक उलट प्रतिबिंबच मतकरींनी या एकांकिके-तून चित्रित केले आहे. सामान्य माणसांचे सामान्यपण आणि त्यातून वेगवेगळे आकार घेणारी वेगवेगळ्या प्रकारची अगतिकता यांचे हे कलात्मक चित्रण आहे. सूत्रधाराचे भाष्य यातल्या प्रत्येक व्यक्तीवर आणि प्रत्येक घटनेवर आहे; पण ते स्पष्टीकरणार्थ आलेले नसूनं कलाकृतीचा एक धागा म्हणूनच आलेले आहे.

रत्नाकर मतकरींच्या या सहा एकांकिका आपली एक पृथगात्मता प्रस्थापित करण्यास समर्थ आहेत. ◻

**शय्या : रत्नाकर मतकरी : मॅजेस्टिक : मूल्य पाच रुपये : पृष्ठे १११**

---

## 'स्वस्तिक'चा सुभाष अंक

बडोदे येथील श्री. महाराणी चिमणाबाई हायस्कूलने 'स्वस्तिक' या आपल्या वार्षिकात या वेळी देशगौरव सुभाषचंद्र बोस यांचा जीवनपट दाखवला आहे.

श्री. निरंजन खेर, कु. वैजयंती रास्ते व कुमार प्रकाश मनोहर या विद्यार्थ्यांनी नेताजींच्या जीवनावरील खूपच तपशील काळजीपूर्वक व वेग-वेगळ्या पुस्तकांचा आधार घेऊन सादर केला आहे. विविध छायाचित्रांच्या व लेख, दैनंदिनीच्या साहाय्याने नेताजींच्या आयुष्याचा हा एक भावपूर्ण असा आलेखच झाला आहे. लेखांच्या संपूर्ण संपादनात, 'नेताजी पुन्हा केव्हातरी प्रकट होणार आहेत,' ही आशा सतत डोकावत असल्याचा भास होतो. सुरेख अंक प्रसिद्ध केल्याबद्दल संपादक मंडळाला मनःपूर्वक धन्यवाद.

---



तू ज्या हिरव्या भूमीवर प्रेम करतोस तिला मुक्त करण्यास
चल, निघू या.
अनंत अन्याय पुसून काढण्यास,
आपल्या मस्तकात फुटतात बंडखोर तारे,
मृत्यू वा विजय – शपथ घेऊन निघू या.
आणि जेव्हा पहिल्या गोळीच्या आवाजाने,
झोपेतून दचकून जागे झालेल्या तरुणी प्रमाणे,
ती भूमी खडबडून उठेल,
तेव्हा आम्ही तुझ्या साथीला असू,
निश्चयाने, हाती बंदुका घेऊन.....

आणि खरोखरच एका वर्षाच्या आत
चे गव्हेरा बंदूक हाती घेऊन
फिडेल आणि त्याच्या साथीदारांच्या
खांद्याला खांदा लावून क्यूबन क्रांतीसाठी
त्या भूमीवर उतरला....

# फिडेल चे आणि क्रांती

अरुण साधू

लेखांक पाच

मेक्सिकोत जाताना फिडेल कास्ट्रोने एकच योजना तयार केली होती. जमेल तेवढ्या क्यूबन क्रांतिकारकांना एकत्र जमवायचे. त्यांना गनिमी युद्धाचे शिक्षण द्यायचे. जमेल त्या मार्गाने पैसे गोळा करायचे. शस्त्रास्त्रे विकत घ्यायची. एक लहान बोट विकत घ्यायची आणि योग्य संधी साधून क्यूबाच्या किनाऱ्यावर उतरायचे. त्याच सुमारास सव्वीस जुलै चळवळींच्या मार्फत क्यूबात सार्वत्रिक संप घडवून आणायचा. सार्वत्रिक संप आणि सशस्त्र उठाव एकसमयावच्छेदेकरून झाल्यास बाटीस्टाचे भ्रष्ट सरकार कोसळून पाडायला फार काळ लागणार नाही असा त्याचा हिशेब होता.

परंतु ही सगळी कामे कठीण होती. मेक्सिकोत सर्व क्रांतिकारकांना एकत्र जमविणे हीच जिकीरीची बाब होती. कारण कास्ट्रो आणि त्याच्या अनुयायांमागे मेक्सिकन पोलिसांचा ससेमिरा तर होताच. पण अमेरिकन सी. आय. ए. चे एजंटस आणि बाटीस्टाचे गुप्तहेरदेखील त्यांच्या मागावर होते. या सगळ्यांच्या नजरा चुकवून त्यांना हालचाल करावी लागे.

खुद्द क्यूबामध्ये फिडेलच्या मोंकाडा प्रकरणापासून स्फूर्ती घेऊन क्रांतिकारी हालचाली करणारे अनेक छोटे मोठे गट तयार झाले होते आणि ठिकठिकाणी ते उठावाचे अयशस्वी प्रयत्न करीत होते. हॅवानामधील काही तरुण लष्करी अधिकाऱ्यांनी सत्ता काबीज करण्याचा रचलेला कट बाटीस्टाने मुळापासूनच उखडून टाकला होता. वर डोके काढू लागलेल्या अनेक क्रांतिकारी गटांपैकी मोन्ते क्रिस्ती या एका संघटनेने फिडेलचेच तंत्र वापरून एका लष्करी ठाण्यावर अयशस्वी हल्ला चढविला. अशा तऱ्हेने सर्व क्यूबन द्वीपकल्पातच एक तऱ्हेचे अस्थिर, अशांत आणि धुमसते वातावरण तयार झाले होते. फिडेलच्या योजनांसाठी ते आवश्यक होते. योग्य क्षणी आणि योग्य ठिकाणी ठिणगी टाकण्याचा अवकाश की अवघा क्यूबा पेटून उठेल असा फिडेलचा अंदाज होता.

मेक्सिकोत जमलेले सगळे क्रांतिकारक कफल्लक होते. कुणाजवळ दिवस भागविण्यापुरतेदेखील पैसे नसत. तेथे आल्यावर फिडेलने प्रथम सव्वीस जुलै चळवळीचा जाहीरनामा पुन्हा एकदा लिहून काढला. पण तो छापायला पैसे नव्हते. म्हणून त्याला आपला एक भारी कोट गहाण ठेवावा लागला. चळवळीसाठी पैसे उभारण्यासाठी फिडेल ऑक्टोबर १९५५ मध्ये अमेरिकेत गेला. प्रवासालाही पैसे त्याला उधार मागावे लागले. फिडेलचे वैशिष्ट्य हे, की तो पैश्यांच्या बाबतीत अत्यंत साधा आहे. संपत्तीविषयी त्याला कोणतेही आकर्षण नाही. त्याच्या आधीच्या राजकारणी पुढाऱ्यांचा पैसा हाच खरा केंद्रबिंदू होता. फिडेलच्या लोकप्रियतेच्या अनेक कारणांमध्ये हेही एक कारण होते. अमेरिकेला जाताना फक्त एकतर्फी भाडेच त्याने घेतले.

## पैशाची जमवाजमव

अमेरिकेत तो सात आठवडे राहिला. न्यूयॉर्क, फिलाडेल्फिया, मियामी येथे सभा घेऊन, भाषणे ठोकून, त्याने हजारो डॉलर्स चळवळीसाठी जमविले. अर्थात या रकमेतल्या एका पैश्यालाही त्याने स्पर्श केला नाही. स्वत: दरिद्री आणि अर्धपोटीच राहिला.

क्यूबामध्येदेखील सव्वीस जुलै चळवळीच्या कार्यकर्त्यांनी गुप्तपणे पैसा जमविण्यास सुरुवात केली होती. फेब्रुवारी १९५६ पर्यंत सुमारे आठ हजार डॉलर्स जमले तेव्हा फिडेलने प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. गनिमी शिक्षणासाठी आणि शस्त्रास्त्रे साठविण्यासाठी मेक्सिको शहराजवळचाच एक छोटासा मळा त्याने एकाच्या नावावर विकत घेतला. शस्त्रास्त्रे विकत घेण्यास सुरुवात केली. मिळतील त्या बंदुका, जुन्यापुराण्या मशीनगन्स या मळ्यात येऊन पडू लागल्या. काही क्यूबातून, काही अमेरिकेतून गुप्तपणे शस्त्रे येऊ लागली. गनिमी युद्धतंत्रात निष्णात असलेल्या एका जुन्या स्पॅनिश अधिकाऱ्याच्या हाताखाली बंडखोरांना शिक्षण दिले जाऊ लागले.

एवढी सगळी तयारी झाली, पण गनिमी युद्ध शिक्षण जोरात चालू असताना क्यूबन गुप्तहेरांना कशीतरी माहिती कळली. त्यांनी मेक्सिकन् पोलिसांना जागे केले. रातोरात बंडखोरांच्या माळ्यावर मेक्सिकन् पोलीसांची धाड आली. बंडखोरांना जीवानिशी पळ काढावा लागला. सगळी शस्त्रास्त्रे पोलीसांच्या हाती पडली.

एवढ्याने विफल न होता, फिडेल पुन्हा दुप्पट जोराने कामाला लागला. आता अधिक गुप्तपणे कामे करावी लागत होती. पुन्हा पैशयासाठी झोळ्या घेऊन हिंडणे, जागा विकत घेणे, शस्त्रास्त्रे जमविणे, सगळे प्रकार आले. यावेळी एकाच ठिकाणी मोठी जागा न घेता मेक्सिकोपासून दूर दूर अशा तीन छोट्या छोट्या जागा घेऊन तिथे बंडखोरांचे प्रशिक्षण सुरू झाले.

वेळ थोडा होता. शक्य तेवढ्या लवकर क्यूबात परतण्याची संधी घ्यायची होती. त्यामुळे प्रशिक्षणाची गती जोरदार होती. पुढे क्यूबामध्ये अनेक हालअपेष्टांना तोंड द्यायचे होते. त्याची तयारी करण्यासाठी मुद्दाम खडतर परिस्थितीत प्रशिक्षण चालू होते. दूरदूरचे मार्चेस, नद्या, जंगले, पहाड पार करणे, आकाशाखाली झोपणे, कमीत कमी अन्नावर दिवस काढणे; वगैरे तयारी सुरू झाली. गुप्तहेर वास काढीत होतेच.

एवढ्या सगळ्या गडबडीतही फिडेलचे वेगवेगळ्या वृत्तपत्रांसाठी, मासिकांसाठी लेख लिहिणे, जाहीरनामे काढणे चालू होतेच. क्यूबन स्वातंत्र्यासाठी, आर्थिक मुक्ततेसाठी आणि क्यूबन जनतेची परिस्थिती सुधारण्यासाठी समाजवादी ध्येय असलेली क्रांती होणे आवश्यक आहे; असा त्याच्या प्रचाराचा सूर होता. याच सुमाराला कास्ट्रोवर तो कम्युनिस्ट असल्याचे आरोप होऊ लागले. कोणावरही कम्युनिस्ट म्हणून शिक्का मारला, की अमेरिकेत त्याच्याविरुद्ध लोकमत जाते हे ओळखून बाटीस्टाच्या एजंटांनी हा प्रकार आरंभिला होता. वास्तविक पाहता त्या वेळी कास्ट्रोची कम्युनिझमशी पुरेशी तोंडओळखही नव्हती. पुढेही क्रांतीच्या विजयानंतर कास्ट्रोने स्वतःहून कम्युनिस्टांची मुळीही अपेक्षा नसताना स्वतःच्या चळवळीला कम्युनिस्ट पक्ष असे मुद्दाम नाव दिले ते पवित्र्यात्मक फायद्यासाठी. प्रस्थापित कम्युनिस्ट पक्षांच्या शिस्तबद्ध आणि कर्मठ सभासदांसारखा कास्ट्रो कधीच नव्हता आणि नाही. उलट कम्युनिस्टांच्या प्रस्थापित कर्मठपणाला आवाहन देऊन डाव्या विचारसरणीत त्याने नवी दिशा दाखविली, ही त्याची मोठी कामगिरी होय. हीच वस्तुस्थिती चे गव्हेराच्या बाबतीतही खरी आहे. या सर्व विषयाची चर्चा पुढे येईलच.

कास्ट्रोने स्वतः गनिमी युद्ध शिक्षणात भाग घेतला नाही. कारण तो इतर कामातच अडकलेला असे. पुढे गनिमी युद्धाचे माओचे तंत्र कास्ट्रोने वापरले असे काही पाश्चात्य तज्ञ म्हणू लागले. पण क्रांती विजयी होईपर्यंत कास्ट्रो आणि चे

यांनी माओ वाचलाही नव्हता. गनिमी-युद्ध हा युद्धाचा नैसर्गिक प्रकार आहे आणि जो तो आपापल्या तंत्राप्रमाणे लढतो हेच खरे.

फिडेलच्या अनुपस्थितीत क्यूबामध्ये सव्वीस जुलैच्या चळवळीची सूत्रे फ्रँक पेयस् या एका बुद्धिमान शाळामास्तराने सांभाळली होती. फिडेल आणि त्याचे साथीदार जेव्हा क्यूबन किनाऱ्यावर उतरतील तेव्हा सबंध क्यूबाभर उठाव घडवून आणण्याची कामगिरी फ्रँकवर होती. फ्रँकला वस्तुस्थितीची अधिक जाणीव होती आणि सबंध क्यूबाभर एकच उठाव घडवून आणणे शक्य नाही असे त्याचे मत होते. पण फिडेलच्या आग्रहाखातर आणि आत्मविश्वासापुढे तोही विरघळला. तो आणि मेल्बी हरनाडिझ हे दोघे गुप्तपणे मेक्सिकोत फेऱ्या मारून येत.

आपण सशस्त्र उठाव घडवून आणण्यासाठी समुद्रमार्गे क्यूबात परतणार आहोत याबद्दल मात्र कास्ट्रोने कधीच गुप्तता राखली नव्हती. क्यूबा सोडतानाच त्याने जाहीर केले होते, की आम्ही परतू आणि एक तर विजयी तरी होऊ, नाही तर हुतात्मे. वेळोवेळी तो या घोषणा करीत होता. शत्रूपासून आपल्या योजना गुप्त ठेवल्या पाहिजेत, असा सल्ला त्याची मित्रमंडळी देत. "मी माझ्या मार्गाने जात आहे. असे बोलणे हे लष्करी दृष्ट्या चुकीचे असेल. पण हा मानसिक युद्धप्रकार आहे—" असे त्यावर फिडेलचे उत्तर ठरलेले होते.

## फिडलने बोट मिळवली

सगळी तयारी होत आली होती. पण योग्य असे एखादे मोठे जहाज काही मिळत नव्हते. कारण तेवढे पैसे नव्हते. त्याच सुमारास मेक्सिकोच्या व्हेरा क्रूझ प्रांतात एका नदीत एका मोडतोड झालेल्या जुन्या लहानशा बोटीची दुरुस्ती सुरू असलेली कास्ट्रोने पाहिली. आपल्या कामासाठी ही बोट वापरायला हरकत नाही, असे त्याच्या मनाने घेतले. पण पैसे नव्हते. अखेर त्याला एकच वाट दिसली. माजी अध्यक्ष प्रियो सोकारास हा सव्वीस जुलैच्या चळवळीला मदत करण्यास उत्सुक होता. पण फिडेल ती नाकारीत होता. कारण त्याच्या मते प्रियो हा देखील बाटीस्टा-एवढाच भ्रष्ट होता. पण क्रांतीसाठी वाटेल ते करण्याची तयारी असताना एका बोटीसाठी अडून बसणे शक्य नव्हते. फिडेलने प्रियोकडून सुमारे चाळीस ते पन्नास हजार डॉलर्स घेऊन ती बोट विकत घेतली. प्रियोने मदत केली म्हणून क्रांतीच्या विजयानंतर प्रियोला कुठल्याही तऱ्हेची माफी मिळाली नाही. शेवटी प्रियो क्यूबा-तून पळून गेला.

बोटीतून क्यूबाकडे प्रस्थान करण्याची तयारी पूर्ण होऊ लागली आणि प्रयाणाचा दिवस जवळ येऊ लागला. एवढ्यात कास्ट्रोच्या विद्यार्थीदशेतील एका सहकाऱ्याने त्याचा घात केला आणि पोलिसांना माहिती दिली. सुदैवाने या इसमाला कटाची फारशी माहिती नव्हती. त्यामुळे एकदोघांना अटक होऊन थोडीशी शस्त्रे जप्त होण्यापलीकडे काही घडले नाही.

ही दुसरी धाड येताच पुढे मुळीच वेळ न गमाविण्याचे कास्ट्रोने ठरविले. मेक्सिकोत ठिकठिकाणी विखुरलेल्या सव्वीस जुलैच्या निवडक क्रांतिकारकांना त्याने ताबडतोब एकत्र जमविले. तीस नोव्हेंबरला क्यूबाचा किनारा गाठायचे ठरले. त्याच दिवशी क्यूबात सार्वत्रिक उठाव घडवून आणण्याची जबाबदारी फ्रँक पेयसवर सोपविण्यात आली. त्याच दिवशी ओरियेंते प्रांताच्या दक्षिण किनाऱ्यावरील एका अगोदर नक्की केलेल्या ठिकाणी सव्वीस जुलैचे सुमारे शंभर कार्यकर्ते जीप्स्, अन्न वगैरे घेऊन फिडेलच्या स्वागतासाठी हजर राहणार होते.

फिडेलने मिळवलेल्या बोटीचे नाव होते 'ग्राम्मा.' या छोट्याशा बोटीत अवघ्या बारा लोकांच्या प्रवासाची सोय होती. अद्याप ती पूर्ण दुरुस्त झालेली नव्हती. पण आता एकेक दिवस थांबणे धोक्याचे होते. बोटीवर अन्न, सैनिकी पोशाख, बंदुका आणि इतर शस्त्रे गुप्तपणे कोंबण्यात आली. बारा माणसे जाऊ शकतील अशा त्या बोटीत तब्बल ब्याऐंशी बंडखोर दाटीवाटीने बसले आणि २५ नोव्हेंबर १९५६ च्या पहाटे दोन वाजता वादळी वाऱ्यांना टक्कर देत हे चिमुकले जहाज तक्सुपान नदीच्या मुखातून धिमे धिमे गुप्तपणे मेक्सिकन् समुद्रात उतरले.

## विलक्षण प्रवास

समुद्रात तुफान वादळ होते. रात्र अंधारी होती. नदीत असताना एकही दिवा न लावता बोट चालवायची होती. तुफानी समुद्रातून एवढ्या लहान बोटीतून प्रवास करण्याची बहुतेक बंडखोरांची ही पहिलीच वेळ होती. सर्वांच्या पोटात ढवळू लागले. खोल समुद्रात प्रवेश केल्यावर बोटीवरचे दिवे लावण्यात आले. ओकारीच्या सागरी आजारावरील प्रतिबंधक गोळ्यांची शोधाशोध सुरू झाली. पण गोळ्या काही सापडेनात. बंदुकीच्या गोळ्या घेताना या गोळ्या बंडखोर विसरले होते.

समुद्रात प्रवेश केल्यावर बंडखोरांनी बरोबर पाच मिनिटे क्यूबाचे राष्ट्रगीत सांघिक रीत्या गायिले; आणि सहाव्या मिनिटाला सबंध बोटीला एखाद्या विनोदी चित्रपटातील दृश्यासारखे स्वरूप आले. जो तो पोट धरून, चेहरा वेडावाकडा करीत भडाभडा ओकतो आहे; काही बादल्यांमध्ये तोंड खुपसून ओकताहेत, काही गलित-गात्र होऊन आडवे पडून स्वतःच्या अंगावरच ओकतात, त्यांचे कपडे ओकारीने भरलेले आहेत...चे गव्हेराने या प्रसंगाचे मोठे मजेदार वर्णन केले आहे.

तीन खलाशी आणि चार-पाच इतर लोक सोडता बाकी सर्वजण या सागरी आजारामुळे चार किंवा पाच दिवस गलितगात्र पडून होते. हाती बंदुका घेऊन क्रांती करायला निघालेल्या या तरुण बंडखोरांना सुरुवातीलाच असा मोठा चमत्कारिक अनुभव आला. कदाचित पुढे वाढून ठेवलेल्या संकटाची ती नांदीच असावी.

पाचव्या–सहाव्या दिवशी सर्वजणांची परिस्थिती सुधारली. सहा दिवसात प्रवास आटोपून बरोबर ठरल्याप्रमाणे तीस नोव्हेंबरला आपण इच्छित स्थळी क्यूबाच्या किनाऱ्यावर लागू असा कास्ट्रोने हिशेब केला होता. पण समुद्रातल्या तुफानामुळे

ही लहानशी बोट योग्य मार्गाने वेगात चालविणे अशक्य होते. प्रवासात खूपच वेळ जात होता. अखेर तीस नोव्हेंबरच्या उठावाची बातमी ' ग्राम्मा 'मधील क्रांतिकारकांनी बोटीतच ट्रान्झिस्टरवर ऐकली. फ्रँकच्या अंदाजाप्रमाणे सबंध क्यूबात सार्वत्रिक उठाव झाला नव्हताच. स्वत: फ्रँक ओरियेन्तेमधील सान्त्यागो दि क्यूबा या शहरी होता. तिथे मात्र चळवळीने चांगलेच यश मिळविले. काही तास चळवळीचा सबंध शहरावर ताबा होता. पण नंतर बाटीस्टाचे सैनिक तिथे पोचताच त्यांना उठाव दडपून टाकण्यास फारसा वेळ लागला नाही. सागरी आजाराने मलूल झालेल्या बंडखोरांच्या दु:खात ही आणखी भरच पडली; आणि ते अधिकच नर्व्हस झाले. आता पूर्वी ठरलेल्या ठिकाणी बोट नेणे धोक्याचे होते.

पण दरम्यान आणखीनच एक संकट उभे राहिले होते. बोटीच्या तळातून हळूहळू पाणी वर येऊ लागले होते. प्रथम बारिकशा फटीतून पाणी येत असेल असे बंडखोरांना वाटले. पण पाण्याचा वेग वाढू लागला तेव्हा ध्यानात आले, की एका प्रचंड नळाच्या छिद्रातूनच पाणी झरझरा आत येते आहे. झाले. पाणी बाहेर काढून टाकण्याची तर कसरत करावी लागलीच. त्याचबरोबर ज्याची ज्याची जरूर नसेल असे सर्व भारी सामान समुद्रात फेकून देऊन बोटीचा भार हलका करावा लागला.

तीस नोव्हेंबरपर्यंत बोटीवरचे पाणी आणि अन्न संपले होते. सर्व बंडखोर विकलांग झाले होते. दुसरे दिवशी निकराचा प्रयत्न करून बोट सरळ क्यूबन किनाऱ्याच्या दिशेने निघाली. रात्र झाली तरी हवे ते दीपगृह दिसेना. हीही रात्र वादळीच होती. बोटीवरच्या डेकवरचे पहारेकरी चारी बाजूला क्षितिजावर कुठे दीपगृहाची शलाका दिसते का याकडे डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवीत होते. एकजण बोटीच्या सर्वांत उंच शिडीवर निरिक्षण करण्यासाठी चढला. बोटीला जोरदार हेलकावे बसत होते. तो तसाच तोल जाऊन समुद्रात पडला.

थोड्या वेळाने बोट पुन्हा पुढे निघाली; तेव्हा कुठे दीपगृहाची प्रकाश शलाका नजरेत आली. पण बोट एवढी हेलकावे खात होती की ती किनाऱ्यापर्यंत पोचायला दोन डिसेंबर १९५६ ची सकाळ उजाडली. बेलीक किनाऱ्याजवळ बोट लागली.

इथेही बंडखोरांचे दुर्दैव असे, की इथला किनारा म्हणजे महाभयंकर दलदलीची खाडीच होती. त्यामुळे बोट अगदी किनाऱ्यावर येणे शक्यच नव्हते. बोटीतून उतरावयाच्या लहान होड्या भार कमी करण्यासाठी केव्हाच फेकून दिल्या होत्या. त्यामुळे बंडखोरांना समुद्रातच पाण्यात उड्या माराव्या लागल्या. हाताला लागेल ते आणि वाहून नेणे शक्य होईल तेवढेच सामान त्यांना बरोबर घ्यावे लागले. अर्धी शस्त्रे बोटीतच राहिली. लाटांना आणि खाडीतल्या शेवाळांना तोंड देत, पोहत पोहत पुढे झाल्यावर दलदल. दलदलीतही झाडी होती.

कास्ट्रो बोटीतून क्यूबाकडे यायला निघाला आहे अशी गुप्त बातमी बाटीस्टाला आधीच लागली होती. त्यामुळे किनाऱ्यावर ठिकठिकाणी त्याने पहारेकरी ठेवले होते. एका पहारेकऱ्याने 'ग्राम्मा' बघितली आणि बिनतारी संदेश धाडला. थोडयाच वेळात एक फ्रिगेट तेथे हजर झाली आणि 'ग्राम्मा'वर गोळीबार सुरू केला. पण तोवर सर्वजण उतरले होते. दोन विमाने आली आणि त्यांनी बाँबवर्षाव सुरू केला. परंतु दलदलीतल्या झाडीमुळे बंडखोर वाचले. परंतु 'ग्राम्मा' दिसल्यामुळे बंडखोर कुठे उतरले हे सैन्याला आता कळून चुकले होते.

बंडखोर पक्क्या जमिनीवर पोचले तोवर पूर्ण थकून गेले होते. तहान–भुकेने बेजार झाले होते. चिखलाने आणि शेवाळाने बरबटून निघाले होते. परंतु विश्रांती घेणे शक्य नव्हते. सिएरा मेस्त्राचा पहाडी भाग लगत होताच. तिकडेच आश्रय घ्यावा लागणार होता. विश्रांतीसाठी कुठेही थांबण्याचा अवकाश की बाटीस्टाच्या फौजांनी केव्हाच घाला घातला असता.

त्यामुळे तशाच थकलेल्या जर्जर अवस्थेतही विलक्षण मानसिक निर्धाराने झपाटलेल्या अवस्थेत बंडखोरांची ती केविलवाणी फौज भुतासारखी पुढेच निघाली. वाटा माहित नव्हत्या. त्यामुळे काही ठिकाणी तर फौजेने गोलगोल चकराच मारल्या. बंडखोरांनी सात दिवस समुद्रावर उपवासात आणि सागरी आजाराच्या जाचात काढले होते. जमिनीवर ते तीन दिवस भयानक परिस्थितीत मार्गक्रमण करीत होते. अखेर मेक्सिको सोडल्यापासून बरोब्बर दहा दिवसांनी, म्हणजे ५ डिसेंबर रोजी क्रांतिकारकांची ती टोळी धडपडत, अर्धवट बेशुद्धावस्थेत, भुकेने जर्जर झालेल्या स्थितीत एका सुरक्षित ठिकाणी पोचली. या स्थळाचे नाव होते 'आनंद'.

दरम्यान अमेरिकन वृत्तसंस्थांनी हॅवानातून बातम्या पाठविल्याही होत्या, की बाटीस्टाच्या नेव्हीने आणि वायुदलाने 'ग्राम्मा'ला समुद्रातच गाठून बुडविले आणि त्यात फिडेल कास्ट्रो, राऊल आणि त्यांचे अडोतीस साथीदार ठार झाले. या प्रसिद्ध झाल्या तेव्हा ते थकलेले ब्याऐंशी बंडखोर विश्रांती घेत होते.

खरे म्हणजे सामान्य दृष्टीकोनातून पाहिल्यास फिडेलचे हे धाडस पार फसले. त्याचा प्रचंड पराभव झाला होता. परंतु तो निराश मुळीच झाला नव्हता. अल्जेरियो–दि–पियो या पहिल्या मुक्कामाच्या सुरक्षित ठिकाणी पोचताच, त्याचे पहिले उद्गार होते, 'आपण पोचलो. आपली क्रांती यशस्वी झालीच म्हणून समजा.'

तशा त्या अत्यंत निराशजनक परिस्थितीतही कास्ट्रोचा आत्मविश्वास विलक्षण होता आणि त्याच्या या आत्मविश्वासानेच सगळ्यांना हुरूप येत होता.

कशीही परिस्थिती आली तरी प्रबळ शक्ती म्हणून कुणापुढे वाकायचे नाही, ही कास्ट्रोची जिद्द होती. कास्ट्रोच्या लहानपणाची एक आठवण त्याचा भाऊ राऊल आणि इतर लोक सांगतात. हॅवानातल्या शाळेत असतानाची गोष्ट.

फिडेलचे एका वयाने मोठ्या, शरिराने त्याच्यापेक्षा कितीतरीपटीने आडदांड अशा विद्यार्थ्याशी भांडण झाले. मारामारी झाली. आणि फिडेल बेशुद्ध पडेपर्यंत त्या दाणगटाने फिडेलला ठोकून काढले. फिडेलने पराभव मान्य केला नाही. दुसरे दिवशी फिडेल पुन्हा भांडायला गेला आणि मार खाऊन परत आला. तिसरे दिवशीही हा प्रकार घडला. चवथे दिवशी फिडेल पुन्हा जेव्हा मारामारी करायला गेला तेव्हा मात्र त्या दुसऱ्या विद्यार्थ्याने हात टेकले आणि फिडेलला विजय कबूल केला.

विजय मिळेपर्यंत झगडत राहायचे हा फिडेलचा स्वभावच. आपण क्यूबात येऊन पोचलो ही आपल्या विजयाची नांदीच होती. आश्वासन दिल्याप्रमाणे तो विजयी होण्यासाठी किंवा शहीद होण्यासाठी येऊन पोचला तर होता. पराभव हा मानण्यावर असतो. पराभव हा शब्दच फिडेल कास्ट्रोच्या शब्दकोशात नव्हता आणि नाही.

## आपण पोचलो....

सव्वीस जुलैचा उठाव अयशस्वी झाला होता. किनाऱ्यावर बंडखोरांना मदत करण्यासाठी तयार असलेल्या सव्वीस जुलच्या कार्यकर्त्यांना पकडले होते. बाटीस्टाच्या लष्कराला आणि वायुदलाला फिडेलचा माग लागला होता आणि त्याची प्रचंड अत्याधुनिक लष्करी यंत्रणा कार्यान्वित झाली होती. आणि अशा अवस्थेत दहा दिवसांच्या भयंकर जीवघेण्या प्रवासाने अर्धमेले झालेले ते ब्याऐंशी बंडखोर अल्जेरिया–दि–पियो येथील एका उसाच्या झाडीत लपून विश्रांती घेत होते. त्यांच्याजवळ अगदीच तुटपुंजी शस्त्रे होती. अन्न जवळ जवळ नव्हतेच. भूक जबरदस्त लागली होती आणि फिडेल म्हणत होता, 'आपण पोचलो. क्रांतीचा विजय निश्चत आहे.'

पुढे काय वाढून ठेवले आहे याची फिडेल आणि त्याच्या साथीदारांना कल्पना नव्हती.

मेक्सिकोतून निघताना बंडखोरांनी पायात नवे बूट घातले होते. अगोदरच पायांना फोड आले होते. त्यात समुद्राच्या खाऱ्यापाण्यातून आणि नतर दलदलीतून पाय तुडवावे लागले. पायांच्या चिंध्या झाल्या होत्या. औषधे नव्हती. कारण ती केव्हाच समुद्रार्पण झाली होती. बंडखोरांमध्ये एकच डॉक्टर होता तो म्हणजे चे गव्हेरा. तो जमेल तेवढी वैद्यकीय मदत करीत होता. बंदुकांच्या गोळ्यांसकट जवळचे सगळे सामान ओलेगच्च झाले होते.

वाटेत चालताना तहान–भूक भागविण्यासाठी बंडखोरांनी रस्त्यातील मळ्यातले उस तोडून खाल्ले आणि त्यांचा चोथा वाटेतच टाकून दिला. बंडखोरांचा माग काढणे त्यामुळे लष्कराला सोपे गेले. पुढे ध्यानात आले, की माग काढायला उसाच्या चोयट्यांची गरज नव्हती. ज्या शेतकऱ्यांनी त्यांना वाट दाखविली त्यांनीच त्यांचा ठावठिकाणा पोलीसांना सांगितला होता. बंडखोरांच्या हातून पुढे अनेक वेळा ही

न्रूक झाली. पूर्ण अनुभव आल्यानंतर मग बंडखोर माहिती नसलेल्या खेडुतांच्या दृ ीस न पडण्याजी खबरदारी घेत. एखाद्या खेडुताने त्यांच्या हालचाली पाहिल्याच तर त्याला ताब्यात घेत आणि सुरक्षित स्थळी पोचल्यावर मगच सोडून देत. कारण बंडखोरांचा पत्ता विचारण्यासाठी पोलीस खेडुतांचे एवढे हाल करीत की इच्छा नसली तरी त्याला पत्ते सांगणे भाग पडे.

अल्जेरिया–दि–पियोच्या शेताजवळ बंडखोर पाच डिसेंबरच्या सकाळी पोचले तेव्हा एक पाऊल पुढे टाकण्याचे त्राण त्यांच्यात नव्हते. आठ-दहा पावलं टाकायची आणि विश्रांतीसाठी धरणीवर अंग टाकायचे. पुन्हा थोड्यावेळाने खुरडत खुरडत चालायचे, पुन्हा पडायचे अशा केविलवाण्या अवस्थेत बंडखोर तिथे पोचले होते. तेथेच विश्रांती घेण्याचा फिडेलने हुकूम दिला आणि सारे बंडखोर एका झाडीत निपचित पडून राहिले.

दुपारी बंडखोरांना जाग आली तेव्हा आकाशात जोरदार हालचाली सुरू झाल्या होत्या. लष्करी आणि काही खाजगी छोटी विमानेही आकाशात जवळपास घिरट्या घालत असलेली दिसत होती. बंडखोरांना हा काय प्रकार आहे याची फारशी जाणीव नव्हती. काहीजण तर अगदी उघड्यावर ऊस तोडून खात होते. पुढची घटना चे गव्हेराच्याच शब्दात सांगितली पाहिजे.

### चे सांगतो....

–"तुकडीचा डॉक्टर म्हणून बंडखोरांच्या सुजलेल्या पायावर उपचार करण्याची जबाबदारी माझी होती. त्यादिवशीचा माझा शेवटचा पेशंट मला अजूनही आठवतो त्याचा तो जगातला शेवटचा दिवस होता. मला अजूनही आठवते. थकला भागलेला आणि चिंताग्रस्त चेहऱ्याचा तो क्रांतिकारक पायात घालता येत नाही म्हणून हाती बूट घेऊन स्वतःच्या जागेकडे निघाला होता. त्याचा चेहरा अजून आठवतो.

–कॉम्रेड मोत्ताने आणि मी एका झाडाला टेकून उभे होतो. आपापल्या मुला-बाळाबद्दल बोलत होतो. थोडे अन्न–म्हणजे अर्धे सँडविच आणि दोन बिस्कीटे–होते. ते हळूहळू चघळीत होतो. एवढ्यात एक बंदुकीचा आवाज आला. काही सेकंदातच मशीनगनच्या गोळ्यांचा वादळी वर्षाव आमच्यावर होऊ लागला–ती माझी पहिलीच वेळ होती. त्यामुळे निदान त्या वेळी तरी तसं वाटलं. माझी बंदूक काही फारशी चांगली नव्हती. मीच मुद्दाम ती मागून घेतली होती. कारण वाटेमध्ये दम्याच्या जोरदार हल्ल्यामुळे मी हैराण झालो होतो आणि कुठे पडलो तर आपल्या-जवळची चांगली बंदूक वाया जाईल असे वाटत होते.

नेमकं केव्हा, काय आणि कसं झालं हे आता स्पष्ट आठवत नाही. कारण स्मृती धूसर झाली आहे. परंतु एवढे मात्र आठवते की तेवढ्या गडबडीतही कॅप्टन अल्मेंडा हुकुम घेण्यासाठी तिथे आला. पण हुकूम द्यायला कोणीच नव्हते. नंतर कळले की पुलीकडच्या एका उसाच्या मळ्यात आपल्या जवानांना एकत्र करण्याचा

निष्फळ प्रयत्न फिडेल करीत होता. एक लहानशी मोकळी जागा पार केली की त्या शेतात जाता आले असते. शत्रूचा अचानक हल्ला भलताच प्रचंड होता. चारी बाजूंनी गोळ्या सुटत होत्या. अलमेंडा त्याच्या गटाचा ताबा घेण्यासाठी निघाला. त्याचक्षणी एका जवानाने आपली काडतुसाची पेटी माझ्या पायाशी टाकली. मी जेव्हा हातानेच त्याला विचारले, तेव्हा त्याने चेहऱ्यावरच्या भावावरूनच दाखविले; 'गोळ्यांना आता उशीर झाला आहे' आणि तो साखरेच्या मळ्याच्या रस्त्याने पळू लागला. (पुढे त्याला बाटीस्टाच्या शिपायांनी ठार मारले.) वैद्यकीय व्यवसायावरील निष्ठा सांभाळायची की क्रांतिकारक सैनिक म्हणून कर्तव्य पार पाडायचे असा संभ्रम क्षणभरच त्यावेळी मला पडला. माझ्या पायाशी माझी औषधाची पेटी आणि ती काडतुसांची पेटी पडली होती. दोन्ही उचलणे शक्य नव्हते. मी काडतुसांची पेटी उचलली आणि ती मोकळी जागा पार करून मळ्यात धावत धावत प्रवेश केला. फोस्तिनो पेरेझ मळ्याच्या कड्याला गुडघ्यावर वाकून त्याची मशीनगन चालवत असल्याचे मला स्पष्ट आठवते. माझ्याबरोबरच आणखी एक साथी पळत होता. आम्हा-दोघांवरही एकदम मशीनगनच्या गोळ्यांचा वर्षाव झाल्यासारखे वाटले. माझ्या छातीवर आणि मानेवर भयानक प्रहार झाल्यासारखे वाटले. आपण मेलेलोच आहोत; असे मला निश्चितपणे वाटले. माझ्या साथीदाराच्या नाकातून आणि तोंडातुन रक्ताची धार लागली होती. अंगावर एक प्रचंड जखम झाली, 'मेलो; मारलं त्यांनी' असं काही तो मोठ्याने ओरडला आणि झपाट्याने तो आपल्या बंदुकीतून गोळ्या सोडू लागला. मी जमिनीवर आडवा पडलो होतो. मीही असाच काहीतरी ओरडलो. बंदूक चालवता चालवताच फोस्तिनोने माझ्याकडे नजर टाकली आणि 'हे काहीच नाही' अशा तऱ्हेचं काहीतरी तो ओरडला. पण माझा मृत्यू ठरलेला आहे हे त्याच्या डोळ्यात स्पष्ट दिसत होतं.

—मी जमिनीवरच पडून राहिलो. फोस्तिनोप्रमाणेच एक झटका येऊन जंगलाच्या दिशेने मी एकदा गोळ्या झाडून घेतल्या. सर्व संपल्यासारखे वाटत होते आणि सर्वोत्कृष्ट रीतीने मृत्यू कसा स्वीकारावा याचा मी विचार करू लागलो. जॅक लंडनची एक जुनी कथा- मला आठवली. ती मधील नायकाला ठाऊक झालेले असते की अलास्कातील बर्फाळ प्रदेशात मरणे हेच आता आपल्या नशिबी आहे. म्हणून तो एका झाडाला टेकून उभा राहतो आणि शानदारपणे मृत्यु स्वीकारण्याची तयारी करतो. तेच एक चित्र नजरे समोर येते. कुणीतरी खुरडत माझ्याजवळ आलं आणि आपण शरण जावं असं ओरडू लागलं. तेवढ्यात मागून गर्जना आली 'इथे कोणी शरण जाणार नाही' पाठोपाठ एक शिवी. हा आवाज कॅमिलो सियेनफुजोचा होता. घाबराघुबरा आणि दम लागलेला पोन्स माझ्याजवळ सरकत आला. त्याच्या फुफ्फुसात जखम झालेली दिसत होती. मीही त्याला माझी जखम

दाखवली. इतर काही माणसांबरोबर पोन्स तसाच खुरडत पुढे उसाच्या मळ्याकडे गेला. काहीक्षण मी एकटाच पडून होतो. मृत्यूची वाट पाहात.

तेवढ्यात अल्मैडा माझ्याजवळ आला आणि त्याने मला पुढे सरकण्यास सांगितले. असह्य वेदना होत होत्या. पण सरकलो आणि आम्ही मळ्यात प्रवेश केला. एकाचे बोट फुटले होते. आणि फोस्तिनो ते बांधत होता. नंतर आणखीनच गोंधळ झाला. लहान विमाने अगदी खालून जाऊ लागली आणि मशीनगन्सच्या गोळ्यांचा पाऊस पाडू लागली. त्या प्रचंड घरघरीतही एक बंडखोर सगळ्यांना ओरडून ओरडून शांत रहा म्हणून सांगत होता. कशाला कुणास ठाऊक; आणि एकजण तर एका उसाच्या काडीखाली लपण्याचा केविलवणा प्रयत्न करीत होता. मोठे विचित्र दृश्य होते ते.

अल्मैडाच्या नेतृत्वाखाली आम्हा सहाजणांचा गट तयार झाला आणि कसाबसा ऊसमळा ओलांडून आम्ही शेजारच्या जंगलात शिरलो. तेवढ्यात 'आग आग' असा ओरडा आला. सगळा ऊस मळा धगधगताना दिसू लागला. याची मला नक्की खात्री नाही. कारण माझे त्यावेळचे विचार होते पराभवाच्या कटुतेचे आणि आपली वाट पाहत असलेल्या मृत्यूचे. रात्र पडेपर्यंत आम्ही चालत राहिलो आणि शेवटी पुढे जाणे अशक्य झाले तेव्हा एकमेकाला चिकटून उघड्यावर पडून राहिलो. रात्री डासांनी आमच्यावर हल्ला केला. भूक आणि तहान यांनी तर आम्ही अत्यंत बेजार झालो होतो ...'

हा दिवस होता, ५ डिसेंबर १९५६ आणि सशस्त्र उठाव करण्यासाठी म्हणून मेक्सिकोतून बोटीतून आलेल्या बंडखोरांची या पहिल्याच लढाईत अशी वाताहात झाली,

उसाच्या मळ्याला आगी लागल्यानंतर वेगवेगळ्या ठिकाणी असलेले सगळे गटागटांनी पांगण्याचा प्रयत्न करू लागले. काही बंडखोर बाटीस्टाच्या सैनिकांनी वेढलेल्या सापळ्यात सापडले आणि पकडले गेले. त्यांच्यापैकी अनेकांना ठार मारले गेले. फारच थोडे कैदेत गेले. कोठल्याही गटाला इतरांचे काय झाले आहे हे माहीत नव्हते आणि तरीही सारेजण जिद्दीने तग धरून होते. जंगलातून लपून छपून चाल करीत, ऊस खात, खडकांच्या खबदाडीत साचलेले पावसाचे पाणी चाटीत कसे तरी सिएरा मेस्त्राच्या दिशेने भुतासारखे चालत होते.

हळूहळू एकेक गट दुसऱ्या गटाला जाऊन मिळू लागला. पंधरा वीस दिवसानंतर जिवंत उरलेले बंडखोर एकत्र जमले. सिएरा मेस्त्राच्या एका उंच पहाडीत त्यांनी आपली संख्या मोजून पाहिली. फिडेल धरून ते अवघे बारा जण होते !

[ क्रमशः ]

# क्रीडांगण

# भावी आट्यापाट्या

**मुकुंद मणूरकर**

पुण्याच्या पूर्व भागातील लोकांचा, विशेषतः कामगारांचा सर्वात आवडता खेळ कोणता असे विचारले तर 'भावी आट्यापाट्या' असे एकमुखी उत्तर येईल. कामगारांचा कबड्डीकडे विशेष ओढा असतो या गोष्टीला पुण्याचा पूर्व भाग अपवाद आहे.

हा अस्सल भारतीय खेळ पुण्यात गेली ६०–७० वर्षे नियमित खेळला जात आहे. पण या खेळाला सर्वमान्य नियम वगैरे काही नव्हते. त्यामुळे पंचांच्या निर्णयाविरुद्ध गोंधळ, हाणामाऱ्या होत. या सामन्यात पंच म्हणून उभे रहाणे म्हणजे जीवावर उदार होणे, अशी पूर्वी परिस्थिती होती. या सावळ्या गोंधळाला पायबंद घालण्यासाठी पूर्व भागातील आट्यापाट्याप्रेमी मंडळींनी पुढाकार घेऊन 'पुणे जिल्हा भावी आट्यापाट्या फेडरेशन'ची स्थापना केली. यासंबंधी घटना–नियम करण्यात आले आणि पहाता पहाता फेडरेशनचा विस्तार होऊ लागला. फेडरेशनला संलग्न असणाऱ्यांची संख्या आता शंभरापर्यंत पोहोचली आहे. व्यावसायिक संघातही या खेळाची आवड निर्माण होऊ लागली आहे. सध्या असे बारा संघ फेडरेशनचे सभासद आहेत. फेडरेशनच्या अंकुशामुळे या खेळात आता शिस्त निर्माण झाली आहे.

फेडरेडनच्या मान्यतेने काही संस्था दरवर्षी भावी आट्यापाट्यांचे सामने आयोजित करतात. यंदा तर पुणे महानगरपालिका, श्रीशिवराज मंडळ, जयभवानी, न्यू प्रकाश व चांदतारा संघ अशा पाच संस्थांतर्फे स्पर्धा आयोजित केल्या होत्या. यातील प्रत्येक स्पर्धेत साठच्या आसपास संघांनी भाग घेतला होता. व्यावसायिक गटातील दहा-एक संघही खेळत होते. दररोज रात्री नऊपासून पहाटे तीनपर्यंत हे सामने चालत. अशा रीतीने या खेळाची वाढ सुसूत्ररीतीने होत आहे.

पण अजूनपर्यंत या खेळाने पुण्याच्या पूर्व भागाची हद्द ओलांडून पश्चिम भागात प्रवेश केला नाही. प्रवेश असा सहजासहजी होत नसतो, त्याला पद्धतशीर प्रचाराची जोड दिली पाहिजे. दुर्दैवाने, या दृष्टीने आतापर्यंत कुणी प्रयत्नही केला नाही. भावी आट्यापाट्यापेक्षा जरा वेगळ्या तऱ्हेने आट्यापाट्या हा खेळ पुण्यात

बऱ्याच प्रमाणात खेळला जात असे. 'खेळला जात असे' असे मुद्दामच म्हटले, कारण या खेळाचाही आता पद्धतशीरपणे ऱ्हास झाला आहे. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेतून तर हा खेळ केव्हाच बाद झाला. आता केवळ काही विशिष्ट शाळां-मधूनच आटयापाटया खेळल्या जातात. तेव्हा केवळ वृत्तपत्रीय बातम्या वाचून या खेळाची आवड होणे अशक्य आहे. कार्यकर्त्यांनीच या बाबतीत पुढाकार घेणे जरुरीचे आहे. यासंबंधीचे एक कटु सत्य फेडरेशनचे एक कार्यकर्ते, नगरपिते श्री. बबनराव किराड यांनी सांगितले. पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण खात्याने ठराव केला की, खात्याच्या अखत्यारीतील शाळांमध्ये भावी आटयापाटया स्पर्धा घेण्यात याव्या. स्पर्धेसाठी एक ढालही मंजूर झाली. मग या शाळांचे चालक कोचिंगच्या मागणीसाठी फेडरेशनकडे आले. पण फेडरेशनकडून त्यांना कुठल्याही प्रकारे मार्ग-दर्शन, सहकार्य मिळाले नाही. परिणामतः ही स्पर्धा बारगळली !

आता फेडरेशनने जरा विधायक दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे. पुण्यात 'सन्मित्र' 'नवमहाराष्ट्र' हे देशी खेळाचे अभिमानी असे संघ आहेत. या संघांचे प्रमुख श्री. हरीभाऊ साने, शंकरराव पाटणकर यांना आटयापाटयाविषयी विशेष आस्था आहे. शिवाय आटयापाटयाची पूर्ण माहिती असलेल्या सुशिक्षित, तरुण कार्यकर्त्यांची मजबूत यंत्रणा या दोन्ही संघांमागे उभी आहे. तेव्हा फेडरेशनने या संघांशी संधान बांधावे, एकत्र बसून, चर्चा करून नियमात एकसूत्रता आणावी. थोडा फेरफार स्वीकारला तर महिलांनासुद्धा हा खेळ सहज आत्मसात करता येईल. प्रचाराच्या दृष्टीने आणखी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. या खेळाच्या स्पर्धा केवळ पूर्व-भागातच चालतात. तेव्हा काही स्पर्धा पश्चिम भागातील मध्यवर्ती ठिकाणी घेण्यात याव्यात. शिवाय पंचांसाठी परीक्षा आयोजित करून अधिकृत पंच निर्माण केले पाहिजेत.

नगरपिते श्री. बबनराव पडवळ, बबनराव किराड अशा धडाडीच्या व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली फेडरेशनचे कार्य चालले आहे. पुण्याव्यतिरीक्त भावी आटयापाटया जेजुरी, पंढरपूर, सोलापूर, बार्शी इ. ठिकाणी मोठ्या प्रमाणात खेळल्या जातात. मुंबईतही याचा प्रसार बऱ्याच ठिकाणी आहे. या सर्व ठिकाणी पुण्यातील ही संस्था संधान बांधून आता लवकर 'महाराष्ट्र राज्य भावी आटयापाटया फेडरेशन' स्थापन करणार आहे. सरकारची मान्यता मिळविणार आहे. यशवंतराव चव्हाण, मोहन धारियांपासून शरद पवारांपर्यंत अनेकांचा या खेळाला आशीर्वाद आहे. त्यामुळे ही गोष्ट सहज शक्य होणार आहे. पण केवळ सरकारी मान्यतेने भागण्या-सारखे नाही हे वर दिलेल्या उदाहरणावरून लक्षात येईल. आटयापाटया हा वस्तुतः बिनखर्चाचा भारतीय खेळ ! पण भारतीय खेळांच्या कर्मभूमीतच याचा प्रचार करावा लागत आहे, ही दुर्दैवाची गोष्ट असली तरी वस्तुस्थिती आहे. त्या दृष्टीने प्रयत्न झाले पाहिजेत.

असो. साठ-सत्तर वर्षांची परंपरा असलेला हा वृक्ष कुशल संगोपनाअभावी वठलेल्या अवस्थेत होता. या निष्पर्ण वृक्षाला आता हळूहळू पालवी फुटू लागली आहे, लवकरच त्याचे डेरेदार वृक्षात रूपांतर होईल; व्हायला पाहिजे ! □

## पं. नेहरू स्टेडियम !

सरकारी संस्थेत, त्या संस्थेला साजेसा असा अधिकारी नेमला जाणे ही गोष्ट दुर्मिळ ! आणि अशी दुर्मिळ गोष्ट नजरेला आल्यावर समाधान मिळते. पुणे महानगरपालिकेने पं. नेहरू स्टेडियम उभारले, तेव्हा केवळ क्रिकेटची मक्तेदारी या मैदानावर निर्माण झाली होती. इतर खेळांचे खेळाडू या मैदानाकडे अलिप्तपणे पहात. ही परिस्थिती नाहीशी करून, सर्व खेळाडूंनी या मैदानाचा लाभ घेतला पाहिजे या भावनेने स्टेडियमचे व्यवस्थापक श्री. सु. ज. करवडे हे सध्या काम करीत आहेत. खेळांची मूलतःच आवड, तरुण वय व पाठीशी भरपूर उत्साह यामुळे अत्यंत धडाडीने करवडे आपले कार्यक्रम अंमलात आणीत आहेत. यंदा त्यांनी अॅथलेटिक्सपासून कॅरम, बुद्धिबळांपर्यंत सर्व स्पर्धा आयोजित केल्या होत्या. त्यामुळे गेले दोन महिने स्टेडियम हे सर्व प्रकारच्या खेळाडूंनी गजबजून गेले होते. श्री. करवडे यांनी या सर्व स्पर्धा अतिशय रेखीवपणे आखल्या होत्या. बुद्धिबळाच्या स्पर्धेत त्यांनी केलेली व्यवस्था पाहून या क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी, येथे राष्ट्रीय स्पर्धाही आयोजित कराव्यात असा निर्वाळा दिला. सर्व खेळांच्या स्पर्धा झाल्या, पण खोखो व फुटबॉल यांच्या स्पर्धा मात्र होऊ शकल्या नाहीत. पण या गोष्टीनेही ते बैचेन झाले होते. त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन खोखोच्या स्पर्धा जुलै महिन्यात घेण्याचे ठरविले आहे.

थोडक्यात, श्री. करवडे यांच्या हाती पं. नेहरू स्टेडियम सुरक्षित आहे ! ¤ ¤

### हिसाबनीती

घटिका भरत आली आहे. वधू अंतरपाटापलीकडे उभी आहे. निमंत्रित उपस्थित आहेत. पण वर मात्र रिस्टवॉचपासून फ्लॅटपर्यंत कुठल्यातरी गोष्टीसाठी अडून बसला आहे, हे दृष्य भारतात बऱ्याच वेळा दिसते. असाच एक प्रसंग ऑस्ट्रेलियात नुकताच घडला. लग्नमंडपात नव्हे, तर क्रीडांगणावर ! ब्राझील व ऑस्ट्रेलियातील एक संघ यांच्यातील फुटबॉलचा आंतरराष्ट्रीय सामना होता. अधिकृत वेळेच्या केवळ दहा मिनिटे आधी ब्राझीलचा संघ मैदानावर उपस्थित झाला आणि नंतर अर्धा तास वॉर्मिंग अप् करीत होता. याचवेळी त्यांनी विलक्षण मागणी केली. ५२,८०० डॉलर्स आधी हातात टाका, तरच सामना सुरू करतो अशी त्यांनी व्यवस्थापकांना तंबी दिली. अखेर ऑस्ट्रेलियाच्या फुटबॉल फेडरेशनच्या अधिकाऱ्यांनी त्यांची मोठ्या मिनतवारीने समजूत घालून त्यांना बँकेचा ड्राफ्ट दिला व नंतर सामना सुरू झाला !

घरोघर मातीच्या चुली हेच खरे !

# पडदा

## बेकेट नाटकाचे वाचन

पुष्पा भावे

नाटक हे दृश्यश्राव्य माध्यम असूनही, अनेकदा त्यातील शब्दाच्या उच्चारित स्वरूपाकडे पुरेसे लक्ष न देता, दृश्यमाध्यमालाच प्राधान्य दिले जाते. अलीकडे प्रत्यक्ष प्रयोगामध्येही शब्द, त्याचे उच्चारण, नादाच्या किमयेने गहिऱ्या होणाऱ्या अर्थच्छटा याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. वस्तुत: नाट्यवाचन ही नटाच्या आवाजाची, नाट्यसंहितेच्या मूळ शक्यतांची आणि श्रोत्यांच्या कल्पनाशक्तीची कसोटी आहे. अनेक जुनी नाटके आज रंगमंचावर येत नाहीत; अशा नाटकांचे जर वाचन केले तर त्यातून आपला त्या नाटकांशी असलेला परिचय वाढेल. शिवाय अशा वाचनातूनच पूर्वीच्या नटांच्या आवाजाच्या फेकीच्या कारणांचे विश्लेषणही करण्याची शक्यता निर्माण होईल. देवल, खाडिलकर, गडकरी यातील प्रत्येक नाटककाराच्या भाषेला स्वतंत्र लय आहे; तिचा शोध व आस्वाद मूक वाचनातून नेमका होणे शक्य नाही. परंतु महाविद्यालयीन हौशी गट, हौशी नटसंघ यांनी अधूनमधून या नाटकांचे वाचन केले, तर त्यातून आपली नाट्यगत शब्दाची समज जरूर वाढेल. तसेच अनेक लक्षणीय परकीय नाटकांचे प्रयोग मराठी रंगमंचावर होऊ शकत नाहीत. आज इंग्रजीचा व्यासंग असणारा वाचकवर्गही कमी होऊ लागला आहे. अशावेळी त्या नाटकांच्या भाषांतरांचे वाचन कितीतरी फलदायी ठरेल.

श्री. माधव वाटवे व त्यांचे सहकारी गेले काही महिने, ज्यां अनुयीच्या 'बेकेट' या प्रसिद्ध नाटकाचे वाचन करीत असतात असे कानावर आले होते; परंतु ते प्रत्यक्ष ऐकण्याचा योग आला नव्हता. मध्यंतरी दादरच्या 'बहुरुपी' या नाट्य संस्थेने 'बेकेट'च्या वाचनाचा प्रयोग आयोजित केला होता. 'बहुरुपी' या संस्थेने हा प्रयोग वा कार्यक्रम आयोजित करण्यामध्ये काही औचित्य आहे, कारण

ही संस्था दरवर्षी एक आंतरमहाविद्यालयीन नाट्यवाचनस्पर्धा घेत असते. नाट्य-वाचनाचा कार्यक्रम दादर सार्वजनिक वाचनालयाच्या सहकार्याने धुरू हॉलमध्ये करण्यात आला. या स्थळाशेजारीच एक मंगलकार्यालय आहे; आणि नेमके त्या-दिवशी तिथे एक उत्साही लग्न होते. त्यांच्या उत्साहाचा जबरदस्त उपद्रव 'बेकेट' च्या वाचनाला होत होता. हा अपघात वा योगायोग म्हणून आपण सोडून देऊ. परंतु नाट्यवाचनासाठी सभागृहाच्या मध्यभागी वाचकनट व सभोवती श्रोते अशी योजना केली असती तर आवाज नाट्यपोषक तऱ्हेने वापरता आला असता. नाट्यवाचनाच्या कार्यक्रमात वाचक व श्रोते यांची जवळीक अत्यावश्यक असते.

नाट्यवाचनाच्या कार्यक्रमात शब्दोच्चाराला अपार महत्त्व असते, तसेच दृश्य माध्यमाशिवाय नाटक उभे करावयाचे असल्यामुळे पात्राचे व्यक्तिमत्त्व वृत्तीतील फेरबदल आवाजातून दर्शविणे हे अशा कार्यक्रमाचे मर्म असते. हेन्रीचे संवाद वाचणाऱ्या श्री. वाटवे यांनी हे मर्म नेमके ओळखले होते. यामुळे हेन्रीचा चवर विनोद त्याची असुसंस्कृत प्रभावळ आणि या सगळ्यापलीकडे असणाऱ्या बेकेट विषयीचे त्याचे प्रेम, या सर्व छटा त्यांनी आवाजात दाखवल्या. या तुलनेने श्री. प्रभाकर पाटणकरांचा आवाज कमी लवचिक, अस्पष्ट स्वर असलेला वाटला. श्री. अशोक साठे, श्री. कर्वे, कु. मीना सुखटणकर व सौ. रेखा कामत यांनी आपले छोटे छोटे संवाद समर्थपणे श्रोत्यांपर्यंत पोहोचवले. त्या तुलनेने श्री. कुलकर्णी, श्री. कोल्हटकर यांचे आवाज सदोष वाटले. नाट्यवाचनासाठी नाट्यसंहिता निश्चित करताना ती याहून काळजीपूर्वक संपादित करावयास हवी होती, असेही जाणवले.

हे सारे असले तरी श्री. वाटवे व त्यांचे सहकारी नट यांनी पुन्हा पुन्हा वेग-वेगळ्या पद्धतीच्या नाटकांचे नाट्यवाचन जरूर करावे. किंबहुना सर्व हौशी नाट्यसंधाना हा उपक्रम सुरू करता येईल. त्यासाठी भांडवलही फारसे लागणार नाही. शिवाय एखाद्या नाटकाच्या तालमीच्या वेळी आवाज वा उच्चारणाचे शिक्षण दिल्यामुळे येणारा कृत्रिमपणा टाळूनही उच्चारणात सफाई आणता येईल.

जाता जाता सहज एक वाटले. अलीकडे एकदोन नाटकात कामे केल्याबरोबर तरुण नटनटींना ग्लॅमरचा मोह आवरता येत नाही असे म्हणतात. कोणताही साज-शृंगार नसणारा नाट्यवाचनाचा कार्यक्रम हा त्यावर एक उतारा असू शकेल. डॉ. लागू, पु. ल. देशपांडे, याच्यासारख्या नटांनी नाट्यवाचनाचे प्रयोग छोट्या सभागृहातून केल्यास, जी नाटके रंगमंचावर येत नाहीत, ती श्रोत्यांपर्यंत पोहोचवता येतील. या श्रवणभक्तीचे श्रोत्यांच्या कानावरही काही इष्ट संस्कार होतील. नटांना थोडा इष्ट असा रियाझ घडेल.

□ □ □

म्हणतात ! देशभक्ती ही फार वेगळी गोष्ट आहे, राव. जो लोकांना पोटं भरण्यासाठी मार्ग दाखवतो, तो देशभक्त. तुरुंगात काय, वटवाघळंही वसती करतात. ह्यांना मित्रही कोण मिळाले ! तर, भाऊ तेंडूलकर. झीज झीज झिजले नि गुपचूप मेले ! पाठीवर कर्जाच्या गोणी घेऊन !'

'आता झालं गेलं गंगेला मिळालं. तुमच्या वडिलांची सोय काय लावता येईल ते पाहू या.'

'तुम्ही त्याची चिंता वाहू नका. कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहेत ! आमची आई अखेरी अखेरीस पराकाष्टेची आजारी होती. पण हा गृहस्थ आपल्या मागे संसाराची काय होळी झाली आहे ते बघायला एकदासुद्धा डोकावला नाही. हे म्हणे त्यावेळी ग्रामीण विद्यार्थ्यांना बागायतीचं शिक्षण देत होते. ह्यांचे हेच विद्यार्थी पुढे बडे बागाईतदार होणार. पैसे खाणार. सर्व प्रकारचे अनाचार करणार नि दोन ऑक्टोबरला बापूजींच्या नावाने हंबरडा फोडणार ! ही ह्यांची देशभक्ती नि आमचे वडील ह्यांचे गुरू ! त्यांनी जन्मभर जे पेरलंय, ते पुरतं उगवू द्या. तुम्ही मध्ये नका पडू.'

मी चक्रावून गेलो. मनाशी म्हटलं, मुलाचा हा राग चार दिवसांनी मावळेल. पहिल्या उमाळ्यातला डंख गळून पडेल. आकाश निरभ्र होईल.

चार दिवसांनी पुन्हा विषय काढला. त्यावर तो मुलगा म्हणाला,

'त्या दिवशी आपली पहिली भेट होती, म्हणून मी तोफ डागली नाही. पण आता दोन मर्माच्या गोष्टी सांगतो. ह्यांनी संसारावर तुळशीपत्र ठेवलं, स्वतःच्या बायको-पोरांचा अंत पाहिला, ह्या गोष्टी बाजूला ठेवू या. ह्यांनी स्वतःचा तरी फायदा पाहिला का ? हे लाहोरच्या कॉंग्रेसला गेले होते तेव्हाची गोष्ट. गाडीत ह्यांचा गडू चोरीला गेला. आता गडू, पेले, बशा ह्या वस्तूंना काय तोटा का आहे ? नाही. पण ह्यांनी डोक्यात राख घातली नि हे प्रवास मधल्या वाटेवर थांबवून पायीपायीच परत आले ! म्हणाले, ज्या वाहनात माणसाला चोरी कराबीशी वाटते, ते वाहनच मी माझ्या आयुष्यातून वर्ज्य करतो ! आणि महान आश्चर्य म्हणजे ह्या निर्णयाबद्दल खुद्द गांधीजींचेही ह्यांनी आशीर्वाद मिळवले ! पण आशीर्वाद काय चाटायचे आहेत ? गांधीजींपर्यंत पोहोचलेला हा माणूस जे. जे. हॉस्पिटलात तडफडावा ? नियती इतकी क्रूर नाही. आमच्या वडिलांमध्येच मिठाचे चार दाणे कमी आहेत. जन्मभर ते हेकट म्हणून वावरले. देशभक्ताने कसं नदीच्या पाण्यासारखं पसरत गेलं पाहिजे. हे बाभळीच्या झाडासारखे वाढले. पसरणं ह्यांच्या

नशिबातच नव्हतं. हे विनोबांबरोबर ओरिसात हिंडले. पण विनोबांच्या ताका-तूपाच्या बरण्या डोक्यावर सांभाळण्याव्यतिरिक्त ह्यांची कमाई शून्य आहे. हे कसले देशभक्त ? विनोबांनी विचारपूर्वक पदयात्रा केली. आमचे वडील नुसते हिंड-हिंड हिंडले. दोन्ही पायांना इसब, उन्हातून वणवण, नीरस जीवन आणि राजस वृत्तीचा संपूर्ण अभाव, ह्याचा नैसर्गिक परिणाम म्हणजे हे त्यांचं सध्याचं अर्धांगाचं दुखणं.'

'अगदी खरं. पण तुमच्या वडिलांच्या नाटकाचा हा शेवटचा अंक आहे.'

'अगदी खरं. आता हा शेवटचा अंक पहिल्या अंकांना साजेसा असा नैसर्गिक ओघानेच होऊ द्या. तुम्ही मध्ये पडून खेळाचा विचका करू नका. पेरलेलं उगवतंय. उगवू द्या.'

मी हरलो.

गांधीजींपर्यंत पोहोचलेल्या, विनोबांबरोबर फिरलेल्या, सहा तुरुंगातून फेऱ्या मारलेल्या, एका निर्धन-वृद्ध स्वातंत्र्यसैनिकांच्या नाकातोंडात इतकं नि असं पाणी जावं, ह्या विचाराने माझा जीव साक्षात गुदमरला. जे. जे. इस्पितळाचा मी रस्ताच टाळला. मग पंधरा दिवसांनंतर जीव घट्ट करून म्हातारबोवा पडून होते त्या दालनात गेलो.

---


प्रसिद्ध झाले

# एका पराभवाची कहाणी [ झुंड ]

लेखक : ब्रिगेडियर जॉन पी. दळवी

अनुवाद : अनंत भावे


---

म्हातारबोवा तिथे नव्हते. माझ्या काळजाचा एक ठोका चुकला.

मात्र ज्या रुग्णाने मला पूर्वी माहिती पुरवली तो मात्र तिथेच शांतपणे पडून होता. मी त्यांना म्हातारबोवांबद्दल विचारलं. त्यांनी सांगितलं,

'हं. ते खादीवाले म्हणता होय ? हं. त्यांची सुटका झाली. शेवटी त्या अम्मानेच सारं निस्तरलं. तुम्हीच पहा आता. ते म्हातारबोवा कुठले, ही अम्मा कुठची, नि नियती गाठ घालून देते कुणाची ! ह्याचं नाव ऋणानुबंध !'

मी त्या श्यामल परिचारिकेकडे चौकशीसाठी गेलो. खोदून खोदून विचारताना म्हटलं,

'म्हातारबोवांनी शेवटची इच्छा म्हणून काही सांगितलं ?'

'छे ? कसं सांगणार ? त्यांना वाचा होतीच कुठे ?'

'काहीही सुचवलं नाही त्यांनी ?'

'काहीही नाही. फक्त जाताना शून्य नजरेने माझ्याकडे पाहिलं. मला वाटलं त्यांना पाणी हवंय. पण खेळ संपला होता.'

'त्यांच्या देहाचं काय केलंत ?'

'त्याच्यावर कुणीच तावा सांगितला नाही.'

'त्यांना तुमचा ळळा का लागला होता ?'

'ते नाही सांगता येणार. पण मला मात्र त्यांचा लागला होता.'

'तो कसा काय ? तुमची भाषाही वेगळी.'

'ते माझ्या वडिलांसारखे दिसायचे. माझे वडील मी पाहिलेलेच नाहीत. पण त्यांचा फोटो आहे आमच्याकडे. त्यातला चेहरा नि म्हातारबोवांचा चेहरा मला खूपच मिळता-जुळता वाटे. शिवाय दुसरं एक साम्य आहे.'

'कुठलं ?' मी विचारलं.

'माझेही वडील तुरुंगात गेले होते.'


'का ?'

'त्यांनी खोटं बोलायचं नाकारलं म्हणून ! हे म्हातारबोवा कशासाठी तुरुंगात गेले होते, त्याची मात्र मला नक्की कल्पना नाही.'

'मी सांगतो. म्हातारबोवांनी बेइमान जीणं जगायचं नाकारलं, म्हणून ते तुरुंगात गेले होते.'

ती हसली...

तिच्या नजरेतलं खिन्न पाणी क्षणभर डचमळलं. त्यातले दोन-चार थेंब माझ्या अंगावर उडाले. जिथे ते पडले, तिथे चटके बसले.



| | |
|---|---|
| द्वारकी | परिवर्धा |
| आणि | आणि |
| बाळू | कोंढाण |

# एक होता वाळू

**कामण**

एक उजाड, रखरखीत, भकास खेडे. वसई तालुक्यातील जंगलाचा हा भाग. वसईपासून सुमारे दहा-बारा मैलांवर, मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय हमरस्त्यावरून कामणकडे एक फाटा जातो. जेथे हा फाटा सुरू होतो, तेथे भजनसन्सचा एक आधुनिक कॅटल फार्म उभा राहातो आहे. पण यावरून कामण खेडे वा आसपासच्या भागाकडे प्रगतीचे वारे वाहत असल्याचे अनुमान काढायचे ठरविले तर ते साफ चुकीचे ठरेल. जेथे जेथे रस्ता, तेथपर्यंत एस. टी. ची बस, हे एस. टी. चे धोरण. व म्हणूनच कामणपर्यंत एस. टी. ची बस जाते. कामणपुढे मात्र बस जाण्याची सोयच नाही.

जंगलाकडले छोटे खेडे असले तरी अनेक रामायणं, महाभारतं तेथे घडली आहेत. दहा-बारा मैलांवरील वसईला त्यांचा पत्ता नसतो तेथे पुण्या-मुंबईची काय कथा !

कामण गावापेक्षा तेथील आदिवासी वारल्यांचा पाडा (दहा-बारा झोपडयांची वस्ती) अधिकच उजाड ! अर्ध पोटी, अर्ध नग्न असणाऱ्या माणसांचे सांगाडे त्या झोपडयातून राहातात म्हणूनच त्यांना घरे म्हणायची. एरवी गुरांचे गोठेच ते !

पाडयामधील एका खोपटात द्वारकीबाई बरफ ही एक वारली बाई राहाते. म्हातारी आंधळी आई व पाच मुले यांच्या पालन-पोषणाची जबाबदारी क्रूर नियतीने द्वारकीवर सोपवली आहे. वर्ष दीड वर्षांपूर्वी द्वारकीबाईचा नवरा बाळू ही जबाबदारी पार पाडीत होता. पण एके दिवशी आजारी नसलेला धडधाकट बाळू मेला. त्याला 'ठार मारण्यात' आले असे गावातले लोक खाजगीत कुजबुजतात.

मी कामणमध्ये मुक्काम केला. सत्यस्थितीची शहानिशा करून घेण्यासाठी अनेकांना भेटलो. त्यांच्याशी बोललो. द्वारकीबाईचीही भेट घेतली.

सूर्य पश्चिमेकडे केव्हाच कलून गेला होता; पण द्वारकीबाईच्या कच्च्याबच्च्यांच्या पोटात अन्नाचा एक कणही गेला नव्हता. अशीच अवस्था पाड्यावरील जवळजवळ सर्वच वारल्यांची आहे. दिवसभर कष्ट करून बाप जेव्हा रात्री घरी येईल व जी काही मीठ मिरची आणील, त्या वेळी भूक शमायची नाहीतर हवा खाऊन राहायचे. वेळ प्रसंगी गव्हाच्या पिठात पाणी घालून ते खायचे. विसाव्या शतकात मुंबईसारख्या शहराजवळ हे सारे चालते यावर विश्वासही बसणे अशक्य व्हावे अशी ही अवस्था !

थोडेसे भूतकाळात डोकवावे लागेल. कूळकायदा लागू झाला त्या वेळपासून बाळू एका जमिनीचा कूळ होता. ज्या सरपंचाने कालांतराने त्याची जमीन कायदेशीररीत्या 'बळकावली' तो त्या वेळी चित्रात कुठेच नव्हता. हळुहळू लघट करून, मदत करून त्याने बाळूचा विश्वास संपादन केला. आंगठा सही पुरतेच बाळूचे शिक्षण झाले असल्याने हा मदतीचा हात त्याला आधाराचा वाटला. त्याला बिचाऱ्याला कल्पनाच नव्हती की, हळुहळू त्याची नरडी आवळली जात होती.

विश्वास संपादन केला असल्याने बाळूच्या जमिनीबाबतची सारी कागदपत्रे सरपंचाने आपल्या ताब्यात घेतली. सत्तारूढ पक्षाचा एखादा कार्यकर्ता म्हटला की तलाठी, मामलेदार, प्रांत या साऱ्यांचे त्यांच्याशी घनिष्ठ संबंध असतात. तसे ते या सरपंचाशी होते.

१९६३–६४ सालच्या सुमारास बाळूच्या जाबजबाबाची मामलेदाराकडे नोंद केली गेली. मामलेदाराने काय केले, काय लिहून घेतले याची बाळूला काहीच कल्पना नव्हती. ६४ ते ७० या काळातही ती जमीन बाळूच्याच ताब्यात होती पण रेकॉर्डवर जमीन त्याच्या ताब्यात नसल्याची त्या बिचाऱ्याला काही एक कल्पना नव्हती. आपल्या जमिनीबाबत काहीतरी गोलमाल आहे याची कल्पना त्याला सत्तर सालच्या सुमारास केव्हातरी आली. तलाठ्याकडे चौकशी करताच जमीन त्याच्या नावावर नसल्याचे त्याला आढळले. आपली पूर्ण फसवणूक झाली असल्याचे त्याच्या लक्षात आले. यावरून त्याच्यात व 'त्या' सरपंचात बाचाबाची झाली. धमक्या देण्यात आल्या.

कागद पत्रांच्या नकला मिळाव्यात म्हणून बाळूने मामलेदार साहेबांकडे अर्ज केला. एका गरीब आदिवासी वारल्याची कोण दखल घेणार? मामलेदार कचेरीने बाळूला दिड-दोन महिने झुलवत ठेवले. त्यानंतर कागदपत्रे नसल्याची बतावणी केली. कागदपत्रे नसतील तर तसे लिहून द्या असे बाळूने मामलेदारांना सांगितले; आणि मामलेदारांनी अर्जावर तसे लिहून दिले. हा अर्ज व त्यावरील लिखाण अजूनही दप्तरी आहे. याच सुमारास त्या कागदपत्रे 'गायब' होण्या–

बाबतच्या प्रकाराला ठाण्याच्या 'प्रतियोगी' साप्ताहिकाने वाचा फोडली. हा दणका बसताच गायब असलेली कागदपत्रे तात्काळ हजर झाली.

नसलेली कागदपत्रे मिळाली खरी; पण त्यांच्या नकला काही बाळू पाहू शकला नाही. कारण आजारी नसलेला धडधाकट बाळू सत्तर सालातील एके दिवशी सकाळी ज्यूचंद्र येथे गेला; (की त्याला नेण्यात आले?) आणि त्याच रात्री तेथून त्याचे प्रेत आणण्यात आले.

गायब झालेली कागदपत्रे होती कुठे, गायब होती तर मग ती मिळाली कशी, बाळूचा मृत्यू कसा झाला हे सारे प्रकार आजही गूढ आहेत.

बाळूचा मृत्यू संशयास्पदरीत्या झाला असतानाही शव विच्छेदन वगैरे प्रकारांना चाट देण्यात आली. एखादा वारली मेला की त्याचे सारे नातेवाईक सरण घालण्यासाठी येईपर्यंत दोन दोन दिवस प्रेत ठेवण्याचा त्यांचा प्रघात. पण बाळूच्या प्रेताची विल्हेवाट लावण्याचा लकडा पोलिस पाटलाने द्वारकीबाईकडे लावला. असे न केल्यास उगीच लफडी वाढतील वगैरे तिला सांगितले. तासाभरातच बाळूची राख झाली.

'तू जर याबाबत बोललीस तर तुझीही अवस्था बाळूसारखीच होईल' असे तिला धमकावण्यात आले. प्रांताच्या कोर्टात तिने दिलेल्या या साक्षीची नोंद आहे.

जमिनीचा दावा भिवंडी प्रांत कोर्टात चालू असतानाच बाळूच्या संशयास्पद मृत्यूबद्दलची थोडी फार चौकशी सुरू झाली. पोलिस चौकशीला येत. पोलिस पाटलाकडे द्वारकीबाईला बोलविण्यात येई. हा पोलिस पाटील सरपंचाचा मेहुणा! चौकशी कशी चालत असेल याची कल्पनाच केलेली बरी.

एकदा चौकशीसाठी आलेल्या एका पोलिस अधिकाऱ्याने द्वारकीबाईला तिच्या जमिनीचे काय झाले असा प्रश्न विचारला. तिने निकाल न झाल्याचे सांगितले. यावेळी पोलिस पाटलाने सांगितले, 'निकाल आमच्या बाजूने झाला. ही वारलट आमच्याकडून पैसे घेतात आणि मागाहून त्रास देतात, ते आम्हांला निस्तरावे लागते.' पोलिस पाटलाचे हे शब्दही कोर्टाच्या रेकॉर्डवर आहेत.

प्रांत कोर्टाने बाळूच्या जमिनीबाबत निकाल दिला नसतानाही तो सरपंचाच्या बाजूने लागल्याची आवई उठविण्यात आली व त्यानिमित्त सत्यनारायणाच्या पूजेचा घाट घालण्यात आला. लाउडस्पिकर वगैरेचा मोठा थाट होता. यावेळीही लाऊड स्पिकरवर जाहीर केले गेले. 'मिनिस्टरकडे आमची माणसे आहेत. त्यांना आम्ही भेटून निकालपत्र आमच्या बाजूने करून घेतले.'

पण प्रत्यक्षात यावेळी निकाल झालेलाच नव्हता.

टेनन्सी कोर्टाबाबतची एक गोष्ट अशी, की निकाल कोर्टात सांगितला जात नाही तर काही दिवसांनी संबंधितांना पत्राने कळविला जातो. याचा सरळ सरळ अर्थ असा होता, की ही कोर्टाची बेअदबी होती व म्हणून द्वारकीबाईतर्फे कोर्टाची

बेअदबी झाल्याबद्दलचा एक लेखी अर्ज देण्यात आला. यावर प्रांताने बेअदबी करणाऱ्यावर नोटीस काढतो असे सांगितले. प्रत्यक्षात नोटीस काढली गेलीच नाही. यासंदर्भात नोटीस काढली का, यासंबंधीची विचारणा व प्रांताचे यावर गुळमुळीत उत्तर यांची जुगलबंदी काही दिवस चालूच राहिली. ही गोष्ट कलेक्टरांच्याही नजरेला वेळोवेळी आणून दिली गेली. कलेक्टरने प्रांताला यासंबंधी डिपार्टमेंटल ऑर्डर्स दिल्या पण प्रांताने त्याचा साधा खुलासाही कलेक्टरकडे दिला नाही.

याबाबत अर्जदाराने पुन्हा विचारणा केली असता प्रांताने सांगितले बेअदबी कोर्टाची झाली आहे; सबब कोर्ट व बेअदबी करणारे ते पाहून घेतील.

दरम्यान प्रांताने निकालपत्र दिले. निकाल अर्थातच बाईविरुद्ध होता. निकालपत्रात कोर्टाच्या बेअदबीबद्दल एका शब्दाचाही उल्लेख नव्हता. यासंबंधी चौकशीची मागणी करणारा लेखी अर्ज करण्यात आला. त्याची नक्कल मागण्यासाठीही अर्ज करण्यात आला पण तो गायब होण्याची तिथेही लागण झाली होतीच.

बाळूच्या या केसमध्ये आणखी एक महत्त्वाची गोष्ट आहे. बाळूकडे जमीन नसल्याचे व तो भूमिहीन असल्याचे खोटे जाब जबाब संबंधितांनी मामलेदाराकडे नोंद करून घेतले. पण हा 'भूमिहीन' असलेला बाळू ५७ ते ६३ सालापर्यंत जमिनीचा सारा भरत होता ही दप्तरी नोंद असलेली वस्तुस्थिती आहे.

ती जमीन बाळूचीच होती याचा दुसरा पुरावाही उपलब्ध आहे. 'कामण सेवा सहकारी सोसायटी'कडे कर्ज मिळविण्यासाठी बाळूने १९५९–६० साली अर्ज केला. ज्याची स्वत:ची जमीन असेल त्यालाच त्या जमिनीच्या तारणपत्रावर कर्ज दिले जाते. सोसायटी ॲक्टप्रमाणे तसा नियम आहे. याच नियमाप्रमाणे त्या जमिनीवर कर्ज मागणाऱ्याची कायदेशीर मालकी आहे किंवा नाही याची चौकशी तलाठी, सोसायटीची मॅनेजिंग कमिटी व सोसायटीचा सेक्रेटरी (हा सरकारी नोकर असतो) हे करतात; व त्याची खात्री पटल्यावरच कर्ज दिले जाते. बाळूकडे जमीन होती म्हणूनच तर सोसायटीने त्याला रु. १८८·४० एवढी रक्कम कर्जाऊ दिली. बाळूने त्याची परत फेडही केली. त्यासाठी त्याने 'इ' करारपत्र व जिंदगी करारही केले. हे सारे कायदेशीररीत्या असूनही बाळूला 'भूमिहीन' ठरविण्यात आले.

या घटनांमध्ये सरकारी नोकरशाहीने सरपंचाला सर्वतोपरी मदत केली हे स्पष्ट दिसते आहे. वरच्या दबावामुळे 'न्यायबुद्धीच्या महसूल अधिकाऱ्यालाही आपली न्यायबुद्धी गहाण टाकावी लागते' – असे उद्गार पश्चातापदग्ध अशा त्या प्रांताने एकदा खाजगी बैठकीत काढल्याचे ऐकिवात आहे.

कामण गावातील एक नि:पक्षपाती माणूस मला म्हणाला, बाळूची जमीन गिळंकृत करण्यात आली हे शंभर टक्के सत्य आहे. बाळू संशयास्पदरीतीने मेला. त्याचा खून झाला असल्याचीही दाट शक्यता आहे. काही गोष्टी मनात असूनही बोलता येत नाहीत. या केसमध्ये इतकी गुंतागुंत आहे की बाळू व द्वारकीवर


ही पहा-
कपडे धुण्यासाठीं
डिटर्जंट शक्तिशाली वडी
कितीहि चोळले स्वच्छ निघतच गुळी. मला वाटतं, होत असावं असं.
अग, पण मी याच पाण्यानं धुते ना कपडे ? मग माझे कपडे कसे स्वच्छ निघतात? अं, पण मी साबण मात्र वापरीत नाही.
असं ! मग वापरतेस तरी काय तू !
आता मिळू लागलेली डिटर्जंट वडी.
काय असतं तीत एवढं ?
तिच्यात असते डिटर्जंट शक्ति. तिचं फेस तर चांगला येतोच पण शिवाय साबणापेक्षा ती कितीतरी प्रभावी असते. तिनं कपडे स्वच्छ नि उजळ निघतात. नीळ किंवा इतर तसलं काही वापरण्याची आवश्यकता नसते.
अगदी खरं ! डिटर्जंट वडीनं साबणापेक्षा दीडपट कपडे धुतले जातात. त्यामुळे तिचा वापर करणं खूप काटकसरीचं होतं !
NEW det
डेट डिटर्जंट वडी
५०% कपडे अधिक धुणारी
अन् तेही साबणापेक्षा अधिक शुभ्र.
पाणी कसेहि असो–अगदीं

झालेल्या अन्यायाचे परिमार्जन होणे, केवळ अशक्यच वाटते. तरी या गरीब वारली बाईला न्याय मिळवून देण्यासाठी जे काही शक्य होईल ते करा. निदान याला वाचा तरी फोडा.'

वारल्यांवर होणारा अन्याय किती जबरदस्त आहे हे जाणून घेण्यासाठी पुढील एक अत्यंत कडवी प्रतिक्रिया वाचा –

'मी स्वत: शाकाहारी आहे पण या नराधमांचे मांस जर मला कोणी शिजवून दिले तर मी ते आनंदाने खाईन.'

द्वारकीबाईच्या जावेवरही असाच प्रसंग आला. तिच्याही नवऱ्याला म्हणे 'आत्महत्त्या' करावी लागली.

जमिनी बळकावण्याबरोबरच आर्थिक पिळवणूकही फार आहे. आदिवासींच्या अज्ञानाचा किती म्हणून फायदा घ्यायचा! चांगल्या माणसालाही शंभर रुपये देताना जिथे शंभरवेळा विचार केला जातो तिथे एका लंगोटच्या आदिवासीला व त्याच्या बायकोला दहा हजार रुपये कोण देणार? पण खोटे नाटे कागदपत्र करून असे कर्ज घेतल्याचे पुरावे उपलब्ध केले जातात. असाच एक दावा सध्या येथे चालू आहे.

आभाळाइतकी अफाट गरिबी. त्यामुळे आदिवासींना थोडक्यात विकत घेतले जाते. थोडा पैसा आणि दारूची बाटली एवढ्यावर काहीही कृत्य त्यांच्याकडून करून घेता येणे शक्य असते. अगदी त्यांच्या उपकारकर्त्यांची विल्हेवाट लावण्यापर्यंतचीही कामे मग सहज पार पडतात.

अनेक वर्षांच्या अन्यायाने दबलेल्या या आदिवासीत याविरुद्ध उभे राहण्याची ताकदच नाही. सावकार, जमीनदार त्यांना सांगतात–होळी होऊन जाईपर्यंत कैऱ्या खाऊ नका. त्या तुम्हांला बाधतील. दिवाळीपर्यंत चवळी खाऊ नका, तुमच्या पोराबाळांना ती बाधेल; आणि मग त्या कैऱ्या व चवळी त्याने सावकाराकडे पोचवायची. जी कैरी वा चवळी सावकाराच्या पोराला बाधत नाही, ती आपल्या लेकराला कशी बाधेल, हा विचारच तो आदिवासी करू शकत नाही. कोणी सांगायचा प्रयत्न केला, तर ते त्याला पटत नाही.

याच भागात इब्राहिम शेट नावाचा एक माणूस आहे. येथील दीड-दोन मैलांच्या परिसरातील सारी आंब्यांची झाडे त्याच्या मालकीची आहेत म्हणे. म्हणजे प्रकार असा चालतो म्हणे, की शेठने आंब्याच्या झाडाकडे बोट दाखवून फक्त तोंडाने ते झाड आपले असल्याचे म्हणायचे आणि वारल्याच्या मालकीचे ते झाड त्याचे होते. मग फळ उतरवलं की त्या वारल्याने इमाने इतबारे त्यातील अर्धी फळं शेठला घरपोच करायची. हा तेथील वर्षानुवर्षे चालत आलेला खाक्या.

श्री. गो. बा. सामंत यांच्यासारखा तळमळीचा कार्यकर्ता हे सारे प्रकार मोडून काढायचा प्रयत्न करतो आहे. आदिवासींचे प्रश्न ते आस्थेने लढवत आहेत. परिणाम

काय झाला ? एकदा त्यांच्या खुनाचा कट करण्यात आला. बेकायदेशीर रीत्या बळकावलेल्या आदिवासीच्या जमिनीतले पीक कापून नेण्यास ते आदिवासींना प्रवृत्त करतात, म्हणून सरकारने त्यांना नक्षलवादी ठरविले !

याचा आणखी थोडा पाढा वाचता येईल.

जवळच्या भागात फकी कुटुंबाने ८० पेक्षा अधिक वारल्यांच्या जमिनी घेतल्या असे कळते. हे खरे असेल तर अगदी तलाठी, मामलेदारांना हाताशी धरून हे सारे झाले असणार हे उघड आहे. तलाठी प्रकाश म्हात्रे याच्यावर तात्काळ कारवाई करण्याचा कलेक्टरचा हुकूम असूनही, अजून कारवाई झालेली नाही.

काही नवबौद्धांच्या जमिनीही सावकारांकडे याच प्रकारे गेल्या आहेत. जानू दिडू नावाच्या एका वारल्याला तीन मैल बांधून आणले आणि त्याला चावडीत कोंडले. ' मला तुझी जमीन दे, नाही तर बघ ! ' अशी धमकी त्याला दिली गेली.

सरकारतर्फे म्हणे कायदेशीर मदत देण्याची तरतूद आहे. पण या अशिक्षित



आदिवासींना कोर्टकचेऱ्यांची काही माहिती नसते. अत्यंत बुजरे असे हे लोक. केस उभी राहिली की, हेलपाटे घालणे त्यांना शक्य नसते. पैसा नसल्याने कोर्टापर्यंत काही मैल चालत जावे लागते. एक दिवसाची मजुरी बुडते. हातावर पोटे घेऊन दिवस ओढणारे हे लोक, दुसऱ्या सुनावणीच्या वेळीच टेकीस येतात आणि सावकाराला सांगतात, 'बाबा, तू जमीन घे.'

-वाळूच्या जमिनीच्या प्रकरणानिमित्ताने हे इतर प्रकार सांगितले.

आता तेथील कलेक्टर व प्रांत बदलले आहेत. बाळूच्या जमिनीबाबत १९६३–६४ मधील तहशीलच्या रेकॉर्ड ऑफ राईट्स्मध्ये कसा बदल झाला याच्या चौकशीचा हुकूम कलेक्टरने नुकताच प्रांताला दिला आहे असे कळते. द्वारकी मात्र जंगलात वणवण भटकून अजून लाकूडफाटा गोळा करतेच आहे.

**–माणूस प्रतिनिधी**

---

# एकरी चारशे ! एकरी चाळीस हजार !

---

ठाणे जिल्हा हा महाराष्ट्रातील आदिवासी वस्तीचा सर्वांत मोठा जिल्हा आहे. २१ लाख वस्तीपैकी सुमारे ७॥ लाख वस्ती आदिवासी जमातींची आहे. सरकारच्या प्रसिद्धी खात्याकडून, आणि सरकारपक्षाचा ढोल बडविणाऱ्या वृत्तपत्रातून बाह्य महाराष्ट्रात असा प्रचार केला जातो, की ठाणे जिल्ह्यातील आदिवासी आता गेल्या १० वर्षांपासून सुखी आणि समृद्ध होऊ लागले आहेत. काही पत्रपंडितांनी तर एवढी मजल मारली आहे, की 'विद्यमान महसूल मंत्री श्री. ह. गो. वर्तक यांनी १० वर्षात ठाणे जिल्ह्याचे चित्र पार बदलून टाकले आहे. आता तिथे तिथे दारिद्र्य कसे असते ते शोधून देखील सापडणार नाही.' जिल्हा प्रसिद्धी अधिकारी किंवा राज्यप्रसिद्धी अधिकारी यांच्या कचेरीत बसून मंत्र्यांच्या स्तुतीखातर ज्यांना स्वतःच्या लेखणीचा आणि स्वाभिमानाचा लिलाव करावयाचा असेल त्यांनी तो खुशाल करावा पण अशाने वस्तुस्थिती लपत नाही.

गेल्या १० वर्षांत ठाणे जिल्ह्यात महत्त्वाचे दोन बदल झाले. १ : या जिल्ह्यात दोन महत्त्वाचे हायवे सुरू झालेत. २ : त्यामुळे कारखानदारी झपाट्याने वाढली.

या दोन कारणामुळे भिवंडी–वसई–पालघर तालुक्यातील जमिनींचे भाव अवाच्या सवा वाढले. ५-६ वर्षांपूर्वी ३००–४०० रुपये एकर मिळणारी जमीन आता ४० हजार रुपये एकराने जाऊ लागली आहे. यामुळे जमीनदार वर्गाने आणि बाहेरील दलाल वर्गाने, मामलेदार, प्रांत, सर्कल, तलाठी यांना हाताशी धरून हजारो वारल्यांना सक्तीने भूमिहीन केले आहे आणि करीत आहेत.

हा दलालवर्ग एकरी ५ पासून १० हजारपर्यंत दलाली घेतो. या दलालीत तो मामलेदार, प्रांत, सर्कल, तलाठी यांना भागी देतो. हे अधिकारी वारल्यांचे रेकॉर्ड ऑफ राइटमध्ये खोडाखोडी, खोट्या नोंदी, सक्तीचे जाबजबाब, कचेरीतील पुराव्याचे कागद नष्ट करणे, प्रसंगी सगळी केस नष्ट करणे, एवढ्यापर्यंत मजल मारतात. दलाल लोक अर्थात खादीधारी आणि रूढीप्रमाणे पालक मंत्र्यांचे कार्यकर्ते म्हणवून घेणारे असतात. त्यामुळे सचिवालयापर्यंत जाऊनही वारल्यांना दाद मिळत नाही.

खोट्या नोंदी व पुराव्याचे कागद नष्ट करणे, याबद्दल तर खुद्द कलेक्टरावर हैराण होण्याची पाळी येते.

यामुळे वारल्यांकडील जमिनी झपाट्याने निघून जात आहेत व ते भूमिहीन होत आहे.

सरकारचे प्रसिद्धीखाते, जिल्हा प्रसिद्धी अधिकाऱ्यांची कचेरी हे प्रकार प्रकाशात येणार नाही याबद्दल डोळ्यात तेल घालून दक्ष असते.

वारल्यांकडील जमिनींची हस्तांतरे घडवून आणण्यात हितसंबंधी वर्ग खऱ्या अर्थाने फौजदारी गुन्हा करीत असतो. पण दुर्दैव असे, की ठाणे जिल्ह्याचे पोलिस, दलाल आणि सावकार लोकांच्या बाजूने राहून वारल्यांची क्रूर ससेहोलपट करीत असतात. जो वारली आपल्या जमिनीवरील हक्क सोडीत नसेल, त्यास चॅप्टर आणि लॉकअपने हैराण केले जाते.

खरा प्रकार असा आहे, की कुळाकडील जमीन कूळ कायद्याच्या ४३ व्या कलमानुसार कलेक्टरच्या परवानगीवाचून कुणालाही घेता येत नाही. पण शासनाकडील वशिले, खेड्यातील दहशत दमदाटी व प्रसंगी वारल्यांची हत्त्या घडवून बडा वर्ग वारल्यांकडील जमिनी लुटीत आहे.

गेल्या दहा वर्षांत ही लूटमार वाढत आहे आणि गेली दहा वर्षे या जिल्ह्याचे पालक मंत्री ना. ह. गो. वर्तक आहेत. मी ना. वर्तकांना नावे ठेवण्यासाठी हे लिहीत नाही. पण वस्तुस्थिती कोणालाही नाकारता येण्यासारखी नाही.

या दहा वर्षात कित्येक वारली कुटुंबे जमिनीचे कब्जे गेल्यावरही पोट आवळून वरिष्ठ कोर्टापर्यंत झगडली. काहींना न्यायालयीन निकालपत्रातून कब्जे मिळाले. पण महसूल अधिकाऱ्यांनी जागेवर मात्र वारल्यांना कब्जे दिले नाहीत. खुद्द वसई तालुक्यात असे प्रकार जास्त आहेत.

वसई हा ना. वर्तकांचा मतदारसंघ खरा; पण तिथे आणखी काही चमत्कारिक प्रकार घडले आहेत.

कुळाने जमिनीचे हप्ते भरले. सरकारने मालकिचे सर्टिफिकेट कुळाला दिले. कुळ रीतसर जमिनीचा पूर्ण मालक झाला. तरी मामलेदार म्हणतो, जमिनीचा कुळाशी काही सबंध नाही. ती मालकाला परत करावी. कलेक्टर थक्क होतात ! मामलेदार म्हणतो, मी मंत्र्यांच्या विश्वासातला आहे...

मग सवतीच्या भूमिहीनांची संख्या का वाढणार नाही.

**गो. बा. सामंत, वसई.**

---

# परिवर्ध्यातील संघर्ष

---

**'अरे अरे......काय रे, मालकाची माणुसकी......मेली रे'**

टाळ्यांचा ताल धरत शेतमजूर नारे देत होते. गुरे चारून पोट भरणाऱ्या पोरांनी ढोल बडवायला सुरुवात केली होती. वर्षभर मालदाराकडे स्वतःला विकणाऱ्या सालदारांनी मालकाचे जू भिरकावून दिले होते. लेकराला छातीशी घेऊन पाजणाऱ्या बायांनीदेखील हात उंचावून उच्च स्वरात घोषणा देण्याचा सपाटा लावला होता.

शहादे तालुक्यातील परिवर्धे गावात भूमिहीनदीनांनी मोर्चा काढून जमीनदारांच्या घरासमोर धरणे धरले होते. परिवर्ध्याच्या इतिहासात धरणे धरून बसण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. परिवर्धे हे गावच मुळी भूमिहीन कष्टकऱ्यांचे आहे. या कष्टकऱ्यांच्या श्रमांच्या मोबदल्यात त्यांच्या अंगावर भाकरीचे तुकडे फेकणाऱ्या सधन जमीनदारांची संख्यासुद्धा काही कमी नाही. परंतु सधनांच्या सहानुभूतीवर (?) जगणारे भूमिहीन आजपर्यंत दुखरे जिणे निमूटपणे सहन करीत आले. स्वतःच्या लाजिरवाण्या दारिद्र्याची लाज झाकत या कष्टकऱ्यांनी आपली तोंडे बंद ठेवली. मालदाराचे अत्याचार उच्चारण्याचा गाढवपणा त्यांनी आजपावेतो केला नव्हता. शेतावर राबराब राबावे, मालकाच्या घरातील कामे करावीत, त्याने दिलेल्या शिव्या शांतपणे ऐकून घ्याव्यात, आपल्या आयाबहिणींच्या-

वर पडणारे हात खुशाल पडू द्यावेत, आशा आणि आकांक्षा यांचा विचारसुद्धा मनात आणू नये आणि मालकाची मालमत्ता फुगवता फुगवता एक दिवस अचानक या जगातून नाहीसे व्हावे; ही खरी म्हणजे या भूमिहीनांची परंपरा. आणि ही परंपरा बरोबर पाळली जाते की नाही, याकडे काटेकोरपणे लक्ष पुरवणे हा मालकांचा धर्म.

मग परंपरेला झुगारून देऊन मालकांच्या धर्मपालनात अडथळा आणण्याचा आक्रस्ताळेपणा या परिवर्ध्याच्या मजुरांनी का म्हणून करावा ?

शहादे-तळोदे तालुक्यातील इतर गावातून शेतमजुरांनी मजुरी वाढवून घेण्यासाठी संप पुकारले होते, तेव्हा परिवर्ध्यातले वातावरण अगदी शांत असे होते. शहादे तालुक्यात काम करणाऱ्या ग्राम स्वराज्य समितीच्या कार्यकर्त्यांनी परिवर्धा येथे एक जाहीर सभा घेतली. जाहीर सभेनंतर गावचे सरपंच श्री. मुराल पुना हे कार्यकर्त्यांना भेटले. गावामधील मजुरीचा प्रश्न शांततेने व प्रेमाने आपापसात मिटविण्याची इच्छा त्यांनी दाखवली. वर्षभर श्रमणाऱ्या सालदाराला ११०० रु. साल देण्याचे त्यांनी कबूल केले. कार्यकर्त्यांनी सालदार – शेतमजुरांची एक समिती आधीच लोकांच्याकडून निवडून तयार केली होती. या समितीत पुरुष आणि स्त्रिया दोघांचाही सहभाग होता. या समितीने जमीनदारांच्या प्रातिनिधिक समितीबरोबर बोलणी करावीत व आपल्या मागण्या मांडाव्यात आणि तडजोडीने प्रश्न सोडवावा असे ठरले. परंतु ठरल्याप्रमाणे घडले मात्र नाही. प्रथम ज्या वेळी बोलणी करण्यास समित्या बसल्या त्या वेळी बोलणी फिसकटली—जमीनदारांच्या आढीबाजीमुळे.

दरवर्षी इकडे सालदार लावण्याची पद्धत असते. म्हणजे कष्टकरी मालदाराकडे मे महिन्यामध्ये जातो. वर्षभर एकाच मालदाराच्या जमिनीवर श्रम करण्याचा करार होतो. या ३६५ दिवसांच्या श्रमाच्या मोबदल्यात मालदार सालदाराला ठराविक रक्कम देऊ करतो. शहादे तालुक्यातील ६३ गावातील सालदारांचा सर्व्हे केल्यावर ही वर्षभराच्या श्रमाची रक्कम सरासरी ६०० रुपये असल्याचे आढळून आले. इतक्या अल्प मिळकतीत सालदाराला जिवंत ठेवण्याचे पुण्यकर्म मालदार करीत असतात.

नेहमीची पद्धत अशी, की सालदार होऊ इच्छिणाऱ्याने व्यक्तिशः मे महिन्यात केव्हाही मालदाराकडे जावे आणि सालदार म्हणून लागावे. परंतु यावर्षी परिवर्ध्यामधील सगळ्या कष्टकरी माणसांनी ठरविले, की साल नक्की करण्यापूर्वी आपल्या मागण्या मान्य करून घ्यायच्या. जोपर्यंत सधन वर्गातील शेतकरी मालदार आपल्या मागण्या मान्य करीत नाहीत, तोपर्यंत कोणीही सालदार म्हणून लागायचे नाही. तथापी गावातल्या काही मजुरांनी रात्रीच्या वेळी जाऊन साले ठरविली. साल ठरवून हे काहीजण कामावर नवीन वर्षासाठी रूजू झाले. त्यामुळे गावातले काही लोक कामावर घेतले गेले आहेत, काहीजण काम नसल्यामुळे घरी बसले

आहेत अशी स्थिती झाली. मालदार लोक कमी माल देत असल्यामुळे सालदाराचा वर्ष अखेरीस जेव्हा हिशेब केला जातो त्या वेळी सालदाराच्या अंगावर पैसे काढले जातात. हिशेब पूर्णपणे मालदार सांगेल तसाच होतो. कारण अशिक्षित सालदारांना हिशेब लिहिता येत नाहीत. मालदार मात्र वहीमध्ये वर्षभराचा व्यवहार टिपून ठेवतो. तो त्यात काय काय खरे खोटे लिहितो ते सालदाराला माहीत नसते. हिशेब केल्यावर इतके पैसे आपल्या अंगावर कसे निघाले, याचा धक्का त्याला बसतो. पण अंगावर निघालेले पैसे मुकाट मान्य करून पुढच्या वर्षीच्या श्रमातून फेडण्याची पद्धत सालदार वर्षानुवर्षे पाळत आले आहेत. परिवर्ध्यांमधील काही सालदारांना या वर्षी मालदारांनी सुनावले, 'तुमच्या अंगावर निघालेले पैसे कुठूनही आणून द्या. मगच नव्या सालाला लावून घेण्याचा विचार करू. तुम्ही जोपर्यंत पैसे आणून देत नाही तोपर्यंत गावातील कोणत्याही मालकाकडे तुम्हाला कामावर घेतले जाणार नाही.' या मालकांनी गावातल्या इतर मालदारांना फर्मावले, 'कोणचाही मालक अशा बहिष्कृत सालदारांना कामावर घेईल तर त्या मालकाला १५१ रु. दंड करण्यात येईल.'

केवढी ही मग्रूरी! उपेक्षितांच्या उपेक्षेने किती उग्र स्वरूप घ्यावे याला शहादे-तळोदे तालुक्यात मर्यादाच नाही. माणुसकी हजार कोस दूर राहिली, साध्या व्यवहाराचा विवेकदेखील इथल्या सधन शेतकऱ्यांना नाही. गर्वाने तट्ट फुगलेले हे मालदारांचे फुगे सालदार काय फोडू शकत नाही? जमीनदारांच्या या काळचा कारभाराला उलथवून लावणे परंपरेने निःसत्व बनवलेल्या शेतमजुराला अशक्य आहे काय? एका दणक्यान या पशुतेचा भुगा करण्याचे सामर्थ्य इथल्या शेत-मजुरात आहे. परंतु हिंसेशी भागीदारी करायची नाही, शांततेचा भंग होऊ द्यायचा नाही, प्रेमाचा मार्ग सोडायचा नाही, असा निश्चय परिवर्ध्यातील गरिबांनी केला होता.

दि. २० मे ७२ ला सकाळी परिवर्ध्यातील मजुरांनी सालदारांवर करण्यात आलेल्या अन्यायाच्या निषेधार्थ कामावर जाणे बंद केले. पुरुषांनी शेतावर जाऊन जमीन वखरायचे नाकारले. परिवर्ध्यातले औत बंद पडले. पोरे गुरे चारायला गेली नाहीत. बायांनी पाणी भरले नाही. खळ्यातले काम थंड झाले. शेतामधले विजेचे पंप लाइन गेल्यासारखे निपचित पडले. ऑइल इंजिनांची 'पक-पक' गप्प झाली. गावात शेणाचा पसारा पडला. शेण कोणी उचललेच नाही. जमीनदारांच्या पोरांचा गुरांना चरायला नेण्याचा केविलवाणा प्रयत्न गुरांनी उधळून लावला. गोठ्यातली गुरे जमीनदारांनी सोडून दिली. पण सोडलेली गुरे उधळतील आणि आणि दाणादाण माजवतील हे बिचाऱ्यांच्या लक्षातच आले नाही. अखेर गुरेसुद्धा साथ कुणाला देणार? आपले रोजचे साथी आज नाहीत हे त्यांना कळले. त्यांनी स्वैरपणे उड्या मारीत जिकडे तिकडे उंडारत मजुरांच्या मागण्यांना पाठिंबा दिला.

जमीनदारांना नाकीनऊ आले. सगळी कामे नेहमी कशी आपसुक होत. त्रास नसे. हुकूम सोडायचे. शिव्या द्यायच्या. डाफरायचे. हा कित्येक वर्षे करत आलेला धंदा एकदम बसला हो! वाटले होते धंद्यात बरकत होईल. पण इथे तर खोट बसायला लागली. नुसता चडफडाट झाला.

आणि या चडफडाटाने आपले गुण दाखवायला सुरुवात केली. उत्पादनाची साधने धारण करणारा हा सधन, माणसाच्या गरजेच्या वस्तूंचा पण साठा करतो. सोयीची साधने याच्याच ताब्यात असतात. मजुरांना जगवणे – मारणे सारे हाच ठरवीत असतो. समाज व्यवस्थेचे सगळे लाभ अशा मालक-मजूर तणावाच्या वेळी मिळणे त्याला सहज शक्य होते. मजुरांच्या न्याय्य मागण्यांना 'उफराटी चाल' ठरवून मजुरांना नागवणे, हा आपला जन्मसिद्ध हक्क मानतो. माना मोडण्याचे काम बगळ्याच्या निश्चलतेने करण्यात हा पटाईत असतो.

परिवर्ध्यातल्या मजुरांना शह देण्यासाठी इथल्या जमीनदारांनी काय करायचे शिल्लक ठेवले ?

गावातील दुकाने बंद ठेवण्याकरिता दुकानदारांना दम दिला. दुकाने बंद करण्यात आली. गावातली पिठाची चक्की बंद ठेवण्यात आली. २२ मे ला संध्या-काळी चक्कीची 'कूक – कूक' ऐकू आली. ग्राम स्वराज्य समितीच्या कार्य-कर्त्यांचा मुक्काम परिवर्ध्यातच होता. कार्यकर्त्यांनी एका मजुराच्या मुलाला मुद्दाम दळण आणण्यासाठी चक्कीवर पाठवले. चक्कीवर त्याला सांगण्यात आले, 'चक्की तुझ्यासाठी सुरू केलेली नाहीय. चालता हो.' गावातले सरपंच श्री. मुराल पुना यांनी समितीशी बोलणी करण्याचे साफ नाकारले. पूर्वी देत होतो तेवढीसुद्धा मजुरी देणार नाही असे ते म्हणाले. २३ मे ला रात्री दहा वाजता कोतवालाकडून मजुरांच्या समितीने सरपंचांना बोलणी करून प्रश्न मिटवण्याचे आवाहन केले. कोतवाल सरपंचाकडून निरोप घेऊन आला, 'त्यांना सांग, की बोलणीबिलणी बंद. एक पैसाही मजुरी वाढवून मिळणार नाही. करा संप. येऊ नका कामावर आमची कामे आम्ही करू. आमच्या जमिनी पडून राहतील. किती दिवस घरी बसाल तुम्ही उपाशी मेलात तरी फिकोर नाही!'

चार दिवसांच्या रिकामपणामुळे आणि उपासमारीने मजुरांची मनःस्थिती फार विचित्र झाली होती. हातावर पोट असणारे हे मजूर व त्यांची दीनवाणी पोरेसोरे अक्षरशः उपाशी राहिली होती. साठवलेले धान्य जमीनदारांच्या घरात होते. गरिबांच्या घरातील मडकी हवेने भरली होती. चार दिवस परिवर्ध्यातल्या लोकांनी कसे काढले हे त्यांचे त्यांनाच माहीत. कोतवालाने आणलेला निरोप पोटात पडलेल्या खड्डयाच्या जिव्हारी लागला. जिव्हारी लागलेला मार दुबळ्यालाही संतापाने पेटवून उठवतो. रात्रीचे ११॥ वाजले होते. भिलाटीमध्ये परिवर्धा आणि शेजारच्या कोठली गावाचे लोक एकत्र जमले होते. भिलाटीत

असलेल्या एकुलत्या एका विजेच्या खांबावरचा बल्ब न पेटता कितीतरी दिवस अंधार देत होता. रात्रीचा गार वारा बेफामपणे बाहेर अंथरलेली फाटकी चिरगुटे उडवीत होता. 'ठक – ठक – ठक – ठक'–काठ्या घेतलेली जमीनदारांची पोरे गस्त घालत होती. पोलिसांच्याकडे खोट्या तक्रारी नोंदवून जमीनदारांनी गावामध्ये हवालदार आणून ठेवले होते. त्यांनी गावातल्या मजुरांना नाहक दम देऊन दटावण्याचा कार्यक्रम आधीच पार पाडला होता. आदल्या दिवशी रात्री हवालदारांनी गरिबांच्या तरुण पोरांना बोलवून घेऊन विचारले होते, 'शेतावर झोपडी बांधून राहणाऱ्या जागल्यांना कामावरून बंद करण्यासाठी तुम्ही दम देऊन त्यांना मारहाण केलीत की नाही? यापुढे असे काही कराल आणि शांततेचा भंग कराल तर याद राखा.' न केलेले गुन्हे लादून आरोपी ठरविण्याचा विडा शहादे-तळोदे तालुक्यातील पोलिसांनी उचलला आहे काय, अशी शंका वाटावी, असे वर्तन गेले सहा महिने इथली पोलिसयंत्रणा करत आहे. असे वर्तन करण्याचे आदेश आणि त्या आदेशाचा बोलविता धनी कोण आहे?

## स्त्रियांची जागृत शक्ती

परिवर्ध्यातील स्त्रियांनी सकाळीच फार मोठी कामगिरी पार पाडली होती. गावातली कोणीच माणसे कामावर जात नसताना जमीनदारांच्या जबरदस्तीला बळी पडून किंवा स्वार्थीपणामुळे काही जागले शेतावरच्या झोपड्यात राहून राखणीचे काम करीतच होते. या संपफोड्यांना धडा शिकवण्याचे स्त्रियांनी ठरवले. शेतावरच्या झोपडीत राहणाऱ्या जागल्यांची राखण करायला पोलिसहवालदारही शेतावर जाऊन बसले होते. २५–३० स्त्रिया तावातावाने शेतात गेल्या. त्यांनी हवालदाराच्या समक्ष त्या जागल्यांना धरून, पुढे घालून, भिलाटीत आणले. आणल्यावर त्यांनी जागल्यांना धीर देऊन बजावले, 'पुन: कामावर जाऊ नका. आपल्या मागण्यासाठी जमीनदार समितीशी जेव्हा बोलणी करतील तेव्हाच जा. तुम्हाला कोणी दम दिल्यास व जबरदस्तीने कामावर नेल्यास आम्हाला सांगा. आम्ही त्याचे पाहून घेऊ.'

खाली मान घालून निंदणीचे काम करणाऱ्या आणि अतिश्रम व अतिगरीबीमुळे दबलेल्या या स्त्रिया इतक्या तडफदार कशा झाल्या? दबलेल्यांच्या, सोसलेल्या त्रासातून आलेले संतापाचे उद्रेक असेच चकित करून सोडणारे असतात. स्त्रियांचे चातुर्य आणि त्यांची मिलिटन्सी यांच्या मिश्रणातून काय काय घडेल त्याची चुणूक इथे दिसू लागली.

कोतवालाबरोबर सरपंचाने पाठवलेला निरोप आयाबहिणींच्या माथ्यात सणक उठवून गेला. चार दिवसांच्या उपाशी पोरांचे रडून रडून सुकलेले डोळे थकलेली झोप घेत असलेले त्यांनी पाहिले मात्र ... भिलाटी भरून एकच घोषणा उडाली –

## ' गरिबांच्या एकजुटीचा विजय असो '

रात्री १२ वा. भिणभिणत गेलेला हा एकीचा आवाज सरपंचाच्या घरात घुमून राहिला. पण २४ मे ची सकाळ, दुपार आणि संध्याकाळ अजून सरपंचाला व जमीनदाराला पाहायची होती. समितीने एकमताने निर्णय जाहीर केला आणि सामसूम झाली.

समितीने निर्णय घेतला होता—गावातून मोर्चा काढण्याचा आणि सरपंचाचे घरासमोर धरणे धरून बसण्याचा. जोपर्यंत जमीनदार लोक समितीशी बोलणी करणार नाहीत तोपर्यंत सगळेजण तिथेच बसून राहणार होते. शासन यंत्रणेकडून गावातील बेकार लोकांच्यासाठी कामे काढून आणायचे काम करायचे सोडून गावातच मिळणाऱ्या मजुरीला गरिबांना पारखे करण्याची सेवा सरपंच करीत होता. त्याची धुंदी उतरावी आणि त्याच्या कर्तव्याची त्याला जाणीव व्हावी म्हणून त्याच्या घरासमोर ठाण मांडून बसण्याचा निर्णय घेतला गेला.

२४ मे ची सकाळ उजाडली, तीच मुळी उत्साहाचे वारे प्यालेली. मैलभर लांब असलेल्या कोठली गावातून लोक आले. भिल्ल, कोळी, हरिजन, वडर, पावरा, माळी, दखनी, कुणबी सारे कष्टकरी जमले. डफ घुमू लागले. तीनतीनच्या रांगा केल्या गेल्या. आघाडीला होत्या, शूर ग्रामीण तडफदार कष्टकरी महिला. त्यांच्या मागे पोरेसोरे. मग पुरुष मंडळी. कपाळावर गुलालाची लाली फासण्यात आली—

## ' मजुरांच्या एकजुटीचा विजय असो '

मोर्चा चालला. शिस्तबद्धतेने घोषणांचा कल्लोळ उठवत जमीनदारांच्या दगडी भिंतीवर त्याचे प्रतिध्वनी उमटवत मोर्चा उभ्या कमानीला कापत आत निघाला. जमीनदारांची घरे म्हणजे संरक्षणाची पक्की फळी उभी करणारे कोट आहेत. सरपंचाच्या घराच्या पुढ्यात मोर्चा आला. उपाशी माणसे शांतपणे खाली बसली. आजुबाजूला आणि सरपंचाचे घराबाहेर संगिनीसह सज्ज असलेले खाकी ड्रेस ताठ उभे होते. ड्रेस न घातलेला (सॉरी, म्हणजे साध्या वेशातील) एल्. आय. बी. चा माणूस कावरा बावरा होऊन इकडे तिकडे फिरत होता. मोर्चा आणि धरणे या कार्यक्रमाची पूर्वसूचना कार्यकर्त्यांनी पी. एस्. आय. ला आधीच दिलेली होती. पण पी. एस्. आय्. कबूल करून परिवर्ध्यास आले नाहीत. त्यांच्या हजर न रहाण्याची प्रतिक्रिया एल्. आय्. बी. च्या अस्वस्थ होण्यात झाली होती. मोर्चातील मंडळींनी खाली बसून घेतल्यावर घोषणांचा तडाखा लावला. घोषणांनी धरण्यास सुरुवात झाली. कार्यकर्त्यांनी भाषणे केली. कार्यकर्त्यांना एकाकी गाठून मारण्याचे, त्यांच्यावर चोरीच्या आरोपाचे खोटे गुन्हे लादण्याचे मांडे खायला जमीनदारांनी सुरुवात केली होती. त्यांच्या या गलिच्छ विचारांचा कार्यकर्त्यांनी आपल्या भाषणात चांगलाच समाचार घेतला. मोर्चा आणि धरणे धरण्याचे उद्दिष्ट त्यांनी

समजावून सांगितले. सूर्य वर चढत होता. तापरे वारे घसट करत होते. आसपासच्या तटबंदीघरांच्या दारामागे, खिडक्यांमागे, जमीनदारांचे, त्यांच्या स्त्रियांचे, पोरांचे, कुतूहल, भीती, तुच्छता, वैरभाव व्यक्त करणारे चेहेरे डोकावत होते. तरुण मजुरांनी भजने म्हणण्यास सुरुवात केली. एकतारी सूर छेडू लागली. डफ थडथडू लागले. शंख फुंकून पोरांचे गाल फुगले. भजनगीते संपली की घोषणा घुमायच्या—

"आमची मजुरी......वाढलीच पाहिजे."

"हम भूके .. ... नही रहेंगे"

"आम्हाला ...... काम द्या"

"आमच्याशी ...... बोलणी करा"

"रघुपती राघव ... राजाराम ... पहिले दाम ... पीछे काम"

"अरे अरे...काय रे ... सरपंचाची माणुसकी ... मेलीरे"

"पुंडलीऽक वरदाऽऽ हारी विठ्ठल ...... तुकाराम...... सरपंचाला सद्बुद्धी मिळू दे ... मालकाला सद्बुद्धी मिळू दे"

चुकून एकदा एक पोरगा सद्बुद्धीच्या ऐवजी सद्गती म्हणाला. इतरांनी त्याची चूक त्याच्या लक्षात आणून दिली.

स्त्रियांनी लग्नाच्या वेळची आणि मयताच्या वेळची गाणी म्हटली. टाळ्या वाजवत आवाज गाजत होता. गर्जनांनी जमीनदार अवाक् झाले. सगळा प्रकार बसून चालला आहे, हे पाहून पोलिसांनाही हायसे वाटले. अखेर पोलिस हा देखील चाकरी बजावणारा गरीबच. त्याची सहानुभूती कष्टकऱ्यांच्या बाजूला असल्याचे स्पष्ट दिसत होते. सरपंचाशी बोलणी करायला गेलेल्या 'देशदूत'च्या बातमीदाराला सरपंचाने सांगितले 'मी बोलणी करण्यास तयार आहे. पण इतर जमीनदार नाही म्हणतात.'

बोलण्याचा सूर बदलत होता. अशक्तांच्या सशक्त आवाजाची ही किमया होती. घोषणांनी छाती कशी दडपून जाते हे पाहायचे असेल तर परिवर्ध्यातील जमीनदार व्हायला हवं.

संध्याकाळ होत आली तरी धरणे चालूच. दगडी भिंती चलबिचल करू लागल्या. एल. आय. बी. चा कावराबावरा चेहरा मोटारसायकलवरून दोन वेळा धडपडत शहाद्याला जाऊन आला. रात्रीही लोक इथेच बसून राहणार आहेत हे ऐकून काही ढुढ्ढाचार्यांचे चेहरे चिंताग्रस्त झाले. पण ही चिंता नाहिशी करायला एक माणूस धावून आला. कलसाडी गावचे सरपंच (सरपंच असाही असू शकतो!) परिवर्ध्यात काहीतरी गडबड आहे हे ऐकून लगेच आले. श्री. मोहनभाई चौधरी त्यांचे नाव. राष्ट्रसेवादलाचे संस्कार असलेला, स्वातंत्र्यचळवळीत एकवेळ जेवून देशसेवा करणारा, कुणावरही रागवू न शकणारा, परंतु परंपरेपासून मुक्त होणे कठीण आहे म्हणणारा, आपणही जमीनदार आहोत ही जाणीव सतत कुठेतरी जपणारा असा हा माणूस. परिवर्ध्यातल्या जमीनदार मित्रांना त्याने गरिबांच्या समितीशी बोलणी

करणे भाग पाडले. बोलणी झाली. तडजोड पटली. धरणे उठले. गिराण सुटले. श्री. मोहनभाईंच्या प्रयत्नाने गंभीर वातावरणात सैलपणा आला. सरपंचानी साखर वाटून उसासा सोडला. मोहनभाई आता जिल्हा परिषदेलाही निवडून आलेत. त्यांच्याबद्दलच्या लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. सामाजिक बदलाची त्यांनी घेतलेली नोंद आता विस्तारली पाहिजे. मोहनभाईंनी कमावलेला विश्वास आता पक्का केला पाहिजे.

परिवर्ध्यात जे घडले ते शहादे-तळोद्यात सतरा ठिकाणी घडले. राग तोच. आलापांच्या आळवणीचा घाट वेगळा. कष्टकरी जनतेत संचारलेले नवे स्फुरण नव्या जाणीवांचे होते. एकीतून उमललेल्या शक्तीचे होते. जड पत्थराने घेतलेल्या प्रवाही गतीचे होते. राक्षसी शक्तींना आव्हान देणारे होते. या राक्षसी उन्मत्त शक्तींचे उद्धट उच्चार ऐकायचेत ?

कलमाडी गावचे सरपंच श्री. गणपत भिका बोराळे गावातल्या लोकांनी संप केल्यावर जमीनदारांना दटावते झाले –

'बायांना बारा आण्याच्या वर एक पैसाही मजुरी जरी कोणी दिली तर त्याला ५१ रु. दंड करण्यात येईल.'

औरंगपूरचे श्री. लक्ष्मण झिपरू तडजोडी करायला बसले तेव्हा म्हणाले, 'गेल्या वर्षापेक्षा एक पैसाही जास्त साल सालदारांना दिले जाणार नाही.' बाहेरच्या तालुक्यातून सालदार आणून गावातल्या गरिबांना मजुरीपासून वंचित करणारे श्री. लक्ष्मण झिपरू सरपंच नाहीत ते त्यांच्या गावी स्वतंत्र ग्रामपंचायत नाही म्हणूनच. डी. एस. पी. आणि कलेक्टरांना खोटया गंभीर परिस्थितीच्या तारा करून गावात पोलिसांना आणून ठेवणाऱ्या व संपावर गेलेल्या मजुरांना बंडिगचे कामावर असताना शेतातील विहिरीचे पाणी पिण्यासही मनाई करणाऱ्या


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) पो. कतरी सराप (गया)**

औरंगपूरच्या सधन शेतकऱ्यांनी गावातल्या लोकांवर खोटया चॅप्टर केसेस करणे आपले महत् कर्तव्य मानले.

धूरखेडा येथील सधन वर्गाने तडजोडीत केलेले करार कधीच पाळले नाहीत. तर मोड गावातील एक महाशय तडजोडीच्या वेळी झोंबून घायाळ झालेल्या विद्ध अवस्थेत बरळले, 'बाकीच्या गावातील मालकांनी नांगी टाकली असेल म्हणून आम्ही नांगी टाकणार नाही.' नांग्या उंचावत ठेवणाऱ्या मोडच्या जमीनदारांनी पीक संरक्षक समितीच्या नावाखाली घातलेला नंगा नाच, गरीब निरपराधी कष्टकऱ्यांना किती नागवून गेला, हे आता सगळयांनाच माहीत झाले आहे.

चिखली गावातील एका नीच मनोवृत्तीच्या मालदाराने सालदार पैशाची मागणी करायला आला तेव्हा खालील अश्लील भाषा बोलून वाचेला विटाळले—

'तुला पैसे पाहिजे असतील तर तुझ्या बायकोला माझ्याकडे गहाण म्हणून ठेव!'

सालदाराच्या बायकोची प्रत्यक्ष भेट झाली तेव्हा कार्यकर्त्यांना उद्देशून तिने सांगितले, 'अशा मालकाला चपलेने फोडून काढले पाहिजे.' शहाद्यातील स्त्रियांचा संताप असाच पेटू दिला तर न विझवता येणारी आग भडकेल.

अशी किती उदाहरणे सांगावी? संपावर जाणाऱ्या मजुरांची हरतऱ्हेने कोंडी करण्याचे मालदारांचे प्रयत्न होऊनसुद्धा ठिकठिकाणचे मजूर संपावर गेले. ही शोषित निपचितांची जागृती सामान्य नाही. तिचे पडसाद भविष्याचा वेध घेणारे ठरतील. १ मे ला सालदार–शेतमजूर–गरीब शेतकरी यांची जी प्रचंड एकता परिषद झाली, तिचे निनाद दोन्ही तालुक्यात तर जागोजागी उमटलेच. शिवाय हे एकीच्या सामर्थ्याचे लोण नंदुरबार तालुक्यातील पिंपळोद गावापर्यंत पोचले.

मुजोरी मालकांच्या अमानुषी विरुद्ध आवाज उठविल्याबद्दल पहिला मानाचा मुजरा रायखेडच्या कष्टकऱ्यांना केला पाहिजे. रायखेडला पहिल्यांदा झालेल्या संपाच्या बिंदूतून उठलेल्या लाटा, सर्व तालुक्यातल्या मजुरांना जागवत गेल्या. १ मे च्या एकता परिषदेपूर्वी सालदारांनी व मजुरांनी वेतनवाढीसाठी कोणत्या मागण्या मागाव्यात यासाठी ग्रामस्वराज्य समितीतर्फे एक पत्रक वाटण्यात आले होते. त्यात म्हटले होते, "गरिबांची गरिबी दूर कोण करणार? गरिबांचे दुःख नाहीसे कोण करेल? हे सगळे गरिबांनीच करायचे आहे."

शहाद्यातील कष्टकरी गरिबांनी जमीन मालकाशी झगडून वरील सिद्धांत सिद्ध करण्यास आरंभ केला आहे. ग्रामीण भागातील शोषित जनतेचा शोषकांविरुद्धचा हा संघर्ष प्रेमाच्या आवाहनातून यापुढे सतत वाहात राहील. या प्रवाहाला महाराष्ट्रातील इतर कष्टकऱ्यांचे साथीचे बळ मिळत जाणार ही अपेक्षा अवाजवी खचितच नाही.

—कुमार

# रचनात्मक धडपड

प्रिय मेधा कोंढाण (पालघर)

माझं पहिलं पत्र मिळालं असेलच. रजनी व रेखालाही मी पत्रं पाठवली होती. कुणाचंच उत्तर नाही. रिझल्टच्या चिंतेत एकेक दिवस जातो आहे.

इथे फार मजा येऊन राहिली आहे. तू म्हणशील, रजा मिळाली असती तर मीही आले असते. खरंच यायला हवी होतीस. वसु Social Work करते म्हणजे काय करते, का करते, हे पाहायला मिळालं असतं. बरेच काही नवीन, आत्तापर्यंत कधीही कानावरून न गेलेलं असं ऐकायला मिळालं असतं. कँप सुरू झाला तेव्हापासून १२–१५ मुलं तरी असायचीच. आता गेल्या आठवड्यापासून आम्ही पाच–सहा जण आहोत. आबा पण आहेत.

आत्तापर्यंत कँप म्हटला म्हणजे शरीर पुरे म्हणेपर्यंत काम करायचं, चर्चा करायच्या, फार फार तर झोपण्यापूर्वी, मैत्रिणींचे दुखणारे पाय चेपून द्यायचे! यावेळची गोष्ट फार वेगळी आहे. वडीलधारं स्वयंपाकघरात असं कुणीच नाही. अथपासून इतिपर्यंतची सगळी जबाबदारी आपल्यावर. आपल्याला नेमून दिलेलं काम जास्तीत जास्त efficiently करणे, प्रचंड काम करणे आणि एखाद्या कामाची संपूर्ण जबाबदारी घेणे, या दोन गोष्टीत तफावत आहे. जबाबदारीने काम करण्याचं शिक्षण इथे मिळत आहे. मग त्यात आपण कुठे कमी पडतोय ते जाणवतं.

हे आपलं झालं एकूण जबाबदारीबद्दल. पण आम्ही मुलं इथं काम काय करतो ? इथल्या काही शेतकऱ्यांना कूळ कायद्याखाली मिळालेल्या जमिनी या ना त्या कारणाने बेकायदेशीरपणे सावकारांच्या घशात गेल्या होत्या. दीड-दोन वर्षांपूर्वी आंदोलन करून त्यांनी त्या परत मिळवल्या. या जमिनी हेच त्यांचे उपजीविकेचे साधन. त्यातून खरोखर त्यांचे पोट भरण्याची काही व्यवस्था नाही. कारण या जमिनी कसण्याची ताकद त्यांच्यापाशी नाही. बियाणे नाही की बैल नाहीत. मग खतं-औषधं वगैरे राहिली दूर! बियाण्याकरिता सावकाराकडून घेतलेल्या दहा रुपयाबद्दल चार महिन्यांनी त्यांना १ मण भात म्हणजे २५ रुपये परत करावे लागतात. याला पालेमोड पद्धत म्हणतात. दहा रुपयांना चार महिन्यांचं पंधरा रुपये व्याज म्हणजे व्याजाचा दर काय झाला कल्पना कर. ३००–४००–५००% अशा भरमसाठ व्याजाने इथले सावकार या शेतकऱ्यांचे शोषण करत

आहेत. या कोंढाण गावात जे आम्हाला दिसत आहे ते जवळपास प्रत्येक ठिकाणी आहे. या मिळालेल्या जमिनी सामुदायिक रीतीने लावण्याचा, त्यासाठी सुधारित जातीचे बेणे, खते, औषधे मिळवून देण्याचा कार्यक्रम आहे. त्यासाठी आमची पूर्वतयारी चालू आहे. पॉवर टिलर व लावणीचे वेळी ट्रॅक्टर–सर्व्हिस मिळवण्याचाही आम्ही प्रयत्न करत आहोत. शेतजमिनीचा सर्व्हे केला. म्हणजे प्रत्येक तुकड्याचे क्षेत्रफळ कळून किती खते लागतील वगैरेची कल्पना आली. बांधबंदिस्ती केली. दामखिड व कोंढाण या दोन गावातल्या मिळून सुमारे ५०–६० एकर जमिनीपुरता हा कार्यक्रम आहे. या सगळ्या जमिनीचे काम आम्ही केलं असं समजू नकोस. सरकारने नव्याने सुरू केलेल्या रोजगार–हमी–योजनेचा उपयोग या कामासाठी आम्ही करून घेत आहोत. शेतीला पुरेसा व हुकूमी पाणीपुरवठा हवा म्हणून इथे दोन विहिरींचे खोदकाम गावकऱ्यांमार्फत सुरू केले होते. कँप सुरू झाला तेव्हा विहिरी खणून झालेल्या होत्या. पाणीही लागलेलं होतं. पाऊस पडण्यापूर्वी त्या बांधून घेणं आवश्यक होतं. १ मेपासून आजतागायत आम्ही विहिरीच्या कामावर गुंतलेले आहोत. आबांना मधे दोन दिवस मुंबईला जायचं होतं म्हणून ३१ तारखेलाच संध्याकाळी इथल्या कोंढाणच्या विहिरीचं काम सुरू करावं असं ठरलं. त्यावेळी मजूर कोणीच हजर नव्हते. मग आम्ही सर्व मुलं लागलो कामाला. माल कालवा, तो शिडीवरून खाली पाठवा, हेदर आणा, (हेदर म्हणजे पायासाठी घडवलेले मजबूत दगड). पंपानें पाणी उपसून टाका, टेपने त्रिज्या मोजून द्या–अशी अनंत कामे ! आणि आम्ही तुटून पडलो. संध्याकाळी ५॥ नंतर कामाला सुरुवात झाली. पहिला थर पूर्ण करूनच घरी परतायचं ठरवलं होतं. काळोख पडला तशा पेट्रोमॅक्सच्या बत्त्या पेटवून आणल्या आणि काम पूर्ण केलं. बघता बघता डोळ्यासमोर विहीर वाढत होती. आज चार फूट तर उद्या सहा फूट. खाली जिवंत झरे लागले होते. आज जमिनीच्या वर दोन फूट बांधकाम झालं आहे. कोंढाण विहिरीच्या बांधकामाच्या भैरवीला सुरुवात झाली आहे. अंजठा-वेरूळची शिल्पं पहाताना जे काही समाधान-आनंद मिळतो, तोच या एरव्ही रुक्ष वाटणाऱ्या विहिरीकडे पाहून मिळतो. कारण इथल्या प्रत्येक दगडाला आमचा हात लागलेला आहे आणि तुडुंब भरलेल्या या विहिरीत इथल्या शेकडो लोकांचे जीवन फुललेले आम्हांला दिसत आहे.

दामाखिड तर इथून एक मैल लांब आहे. मजुरांकडून काम करून घेताना खूप आरडाओरडा करायला लागायचा. सकाळी सातला कामाला सुरुवात व्हायची. नऊ वाजले की 'रूम' करायचं. रूम म्हणजे आराम, दहा मिनिटांची विश्रांती. रूम उठवायचं म्हणजे भयंकर पंचाईत. बसलेले लोक उठायलाच तयार व्हायचे नाहीत. पण हे सर्व काम करत असताना, एक सुखद भावना सतत जागती असायची की, यात आपला स्वार्थ काही नाही. आपण एक व्यक्ती म्हणून न जगता एका

स्वतंत्र राष्ट्राचे नागरिक म्हणून जगायचं असेल, तर केवळ आपण आणि आपलं एक मर्यादित विश्व, यापलिकडे आपण समाजाचं काही देणं लागतो. या देण्याची जबाबदारी विशेषत: तरुण पिढीने ओळखली पाहिजे. राष्ट्रभक्ती आणि त्याग हा केवळ आघाडीवरचा जवान किंवा स्वातंत्र्यसैनिकच करत असतो असं नव्हे. या गरीब देशात, जिथे लोकांच्या अन्नपाण्याच्या साध्या गरजा पुऱ्या झालेल्या नाहीत. आणि अजून जिथे हरिजनांवर बेधडक अत्याचार होऊ शकतो, तिथे राष्ट्रभक्तीची क्षेत्रं खूप आहेत. कालचंच पहा, इथे एक भांडण रंगात आलं होतं. एक कोवळी पोरगी आणि तिला सासरी घेऊन जाण्यासाठी आलेली तिची सासू, नवरा व नणंद. मुलगी बहुतेक टी. बी. ने आजारी असावी. आठ दिवसांसाठी माहेरी आली ती सतरा दिवस झाले तरी घरी उगवली नाही म्हणून सासू हैराण. शेतीचा मोसम जवळ येत चालला, घरात कामाला माणूस पाहिजे म्हणून ही तिघं ह्या पोरीला न्यायला तिच्या माहेरी म्हणजे इथे कोंढाणला आले. नवरा मारतो, सासू हाल करते, खायला मिळत नाही, म्हणून पोरगी इथून हलायला तयार नव्हती, तर त्या लोकांनी तिला अक्षरश: फरपटत चालवली होती, शेवटी आम्ही काही लोकांनी मधे पडून तिला थांबवली. सासूचं प्रामाणिक मत होतं—लग्नात १२०० रुपये खर्च झाला आहे. तीस रुपये देऊन बापाकडून हिला आम्ही विकत घेतली आहे. शेतीच्या कामाला घरचं हक्काचं माणूस नको का ? नवऱ्याची सत्ता नाही का हिच्यावर ? नेली तिला तर काय बिघडलं ?

माणसं कसं जीवन जगत असतात कल्पना कर. दु:खाचा हा आगडोंब उसळलेला पाहिला की आपलं एका व्यक्तीचं दु:ख त्यात कुठल्या कुठे नाहीसं होतं. तापलेल्या तव्यावर टाकलेला पाण्याचा थेंब भुर्रकन जळून जावा तसं. आणि मग ध्यास लागतो – हे कमी करण्यासाठी आपण काय करू शकतो ?

माझ्या Social Work च्या मागे ही पार्श्वभूमी आहे मेधा. आपल्या कॉलेजच्या Social Science Unit ने हॉबी म्हणून केल्यासारखं चालवलेलं समाजकार्य माझ्या मनास येत नाही. पण हा फार वेगळा विषय झाला. कॉलेजचं सोडून देऊ. तुला, मला, प्रत्येक सामान्य माणसाला काय करता येईल ? प्रत्येकाने उठून एखाद्या कोंढाणला धाव घेण्याची, किंवा समाजकार्यास वाहून घेण्याची गरज नाही. आणि ते शक्य ही नाही. पण एक दृष्टी जरूर बाळगता येईल. आपण खऱ्या अर्थानं स्वतंत्र झालो आहोत का ? स्वातंत्र्याचा काही लाभ या देशातल्या बहुसंख्य लोकांना झाला आहे का ? आकडेवारी भले असं जाहीर करत असेल की आपण दरवर्षी अधिकाधिक संपन्न बनत चाललो आहोत. पण ज्याला कधीच काही मिळालं नाही त्या Have not वर्गाला या संपन्नतेची झुळुक कधी लागली का ? स्वातंत्र्यावर घाला काही फक्त परकीय आक्रमणातून येत नाही. दारिद्र्य भूक हा केवढा मोठा शत्रू देशभर पसरला आहे. नग्न भुकेपोटी हिंसा जन्म घेऊ

शकते. आणि नक्षलवादाच्या रूपात ती तत्त्वज्ञानाचे स्वरूप धारण करू शकते. हिंसा हे तत्त्वज्ञान झालं की त्याचे परिणाम किती भयंकर होतात हे मी वेगळं सांगायला नको. म्हणून या देशातल्या Have nots ची काळजी आपण Haves लोकांनी घेतली पाहिजे. म्हणजे मग आपण स्वतःसाठी किती घ्यायचं हा विचार येतो. स्वतःची तुंबडी भरण्यासाठी वाटेल ते भलेबुरे मार्ग अनुसरायचे का? लबाडीने, अप्रामाणिकपणे, कसंही करून स्वार्थ साधायचा का? बर मी सांगितलेली समष्टीची दृष्टी आणि स्वार्थी अप्पलपोटेपणा हे एकत्र संभवत नाहीत. युद्ध वगैरे सुरू असलं की तमाम जनतेच्या एका वेगळ्याच मनोवृत्तीचे दर्शन होते. संकटाचा गोवर्धन पेलायला प्रत्येकजण आपापल्या शक्तीनिशी तयार होतो. लाचलुचपत, काळ्या बाजाराची काळजी दूर होऊन प्रामाणिक देशप्रेमाची एक स्निग्ध ज्योत तेवत रहाते. त्यावेळी प्रत्येकापुढे विचार असतो राष्ट्राचा. या युद्धात विजय मिळविण्यासाठी मी काय हातभार लावू शकतो याचा.

मग हीच मनोवृत्ती इतर वेळी का असू नये? दारिद्र्याचा राक्षस आपल्यावर चाल करून आला आहे, त्याचा मुकाबला आपल्याला युद्धपातळीवर करावा लागणार आहे, याची जाण का असू नये? हे काम एकट्यादुकट्याचं नव्हे. दोन-चार पिढ्यांना यासाठी खर्ची पडावं लागेल. स्वार्थ बाजूला ठेवून वनवास पत्करावा लागेल. दारिद्र्य हा मी एवढा मोठा शत्रू समजते आहे. कारण तो जनतेच्या पोटात आग निर्माण करतो आणि ही आग हृदयापर्यंत भिडायला वेळ लागत नाही.

जमाना बदलतो आहे. कुणा एका व्यक्तीच्या अनिर्बंध अधिराज्याचा काळ संपून लोकशाही, कल्याणकारी राज्य, समाजवाद या नव्या कल्पना विकसित होत आहेत. 'तरुण पिढीने स्वतःच्या पलिकडे जाऊन समाजासाठीही जगले पाहिजे,' हा माझा विचार या बदललेल्या काळातूनच जन्मलेला आहे. सरंजामदारी किंवा साम्राज्यशाहीच्या युगात असला काही विचार माझ्या मनाला स्पर्शसुद्धा ना करता. आणि बदललेल्या काळाचा दुसरा परिणाम हाही आहे की माणूस जागा झाला आहे. Have nots चा आत्तापर्यंत सदैव उपेक्षित राहिलेला, सतत अन्याय होत राहिलेला आणि मुक्या जनावराप्रमाणे अन्याय सोसत राहिलेला वर्ग पूर्वीचा राहिलेला नाही. मला जशी माझ्या कर्तव्याची तशी त्याला त्याच्या हक्काची जाणीव नव्या युगाने करून दिली आहे.

तर सांगत काय होते, की आपल्या डोक्यावर छत्री उघडून धरून 'पाऊस थांबला' अशी समजूत कोणी करून घेऊ नये. अजून पाऊस कोसळतो आहे आणि सर्वांना निवारा उपलब्ध करून द्यायचा आहे. समाजकार्य ही फावल्या वेळात करायची वस्तू न बनता आपल्या जीवनाचा तो एक भाग बनला पाहिजे. संपन्न राष्ट्र निर्माण करायचं असेल तर प्रत्येक व्यक्तीने आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवली पाहिजे. ही जाणीव असली म्हणजे आपल्या कृतीमागचे उद्देश एकदम

उजळून निघतात बघ. तुझं बँकेतलं काम जास्तीत जास्त व्यवस्थित, प्रामाणिक आणि नेटकं करण्याचा तू प्रयत्न करशील. वाढत्या पगाराची मागणी करणारा गिरणी कामगार उत्पादन वाढविणं आणि गिरणी जास्तीत जास्त कार्यक्षम बनवणं हेही स्वत:चं कर्तव्य समजेल. भेसळ करून प्रचंड खोटी बांधकामं करणारा ठेकेदार हा विचार करू लागेल, की मी बांधलेली इमारत कोसळून चालणार नाही. माझं प्रत्येक काम हे एका निकोप समाजाच्या बांधणीतली एकेक वीट आहे. जो माणूस जिथे कुठे काम करतो आहे, तिथे त्याने ते निखळ सच्चेपणाने करणं हेच केवढं महत्त्वाचं आहे. हेच केवढं समाजकार्य आहे. कारण यातून तो आपला ढासळत चाललेला पाया सावरायला मदत करत असतो.

म्हणून तुझ्या घरी राहून, अगदी चाकोरीतलं जीवन जगत असतानाही तू समाजकार्य करू शकतेस. मग वेळ मिळाला तर तू कँपला येऊ शकतेस. घमेली-टिकावांशी, शारीरिक श्रमांशी आणि मातीत रुजलेल्या माणसांच्या सुखदु:खांशी ओळख करून घेऊ शकतेस. अनेक विचारांच्या अनेक घडणीच्या मुलांना तुझे विचार देऊ शकतेस, त्यांचे विचार समजावून घेऊ शकतेस.

तू म्हणशील, वसुने आज लावलंय तरी काय? पण एका जिव्हाळ्याच्या मैत्रिणीने लिहिलेलं पत्र म्हणून न वाचता माझं एक मुक्त चिंतन या दृष्टीने वाच. बरेच दिवस मला तुझ्याशी हा विषय बोलायचा होता. चालता चालता ठेच लागावी इतक्या नकळत आणि सहजपणे, कँपमध्ये अनेक महत्त्वाच्या चर्चा छेडल्या जातात, आणि त्या विचारांना गती देतात. त्यातूनच तुला लिहिण्याची स्फूर्ती आली.

बाकी सर्व ठीक. तुझी

१५-६-७२ वसु

□ □ □

---

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

---

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649

# जुळी मुंबई कोणासाठी ?

मुंबईच्या अपरिहार्य वाढीचा बागुलबुवा पुढे करून
आज जुळ्यामुंबईचे समर्थन करण्यात येत आहे.
ही शुद्ध फसवणूक आहे.
या वाढीचा खरा फायदा कोणास होईल
हे समजून घेतले पाहिजे.
या प्रकल्पामुळे स्थावर मालमत्तेच्या सट्टेबाजाराला अधिक वाव मिळणार.
बडे उद्योगपती अधिक बडे होणार.
कंत्राटदारांना मोठी कामे मिळणार.
मंत्र्यांना भव्य वास्तु निर्माण केल्याचे समाधान मिळणार.
समुद्रावरील पूल, गगनभेदी इमारती, भुयारी रेल्वे,
अशा अत्याधुनिक अभियांत्रिकी कसरती करून
इंजिनियर्स आणि आर्किटेक्स् जगन्मान्य होणार.

आणि हे प्रचंड स्मारक बांधले जाणार
महाराष्ट्रातील बहुसंख्य जनतेच्या हिताकडे दुर्लक्ष करून
राष्ट्रीय विकासाच्या गोंडस नावाखाली

# माणूस

# जुळी मुंबई विशेषांक

प्रसिद्धी : ८ जुलै १९७२
किंमत : पन्नास पैसे